# प्रकरण तिसरे

# " यशवंतराव चव्हाणांच्या भाषणांचे स्वरूप "

पृष्ठ क्रमांक ५८ ते १२९

# प्रकरण तिसरे
# - यशवंतराव चव्हाणांच्या भाषणांचे स्वरूप -

महाराष्ट्रामध्ये उत्तम वक्तृत्व संपन्न असा विचारवंत म्हणून यशवंतरावांचा गौरव केला जातो. त्यांनी आपल्या आयुष्यामध्ये अनेक विषयावर विचार मांडले हे त्यांच्या विविध भाषणांतून दिसून येते. 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर' आणि 'भूमिका' या तीन भाषणसंग्रहाच्या आधारे त्यांनी विविध प्रसंगी व्यक्त केलेल्या विचारांचा परामर्श इथे घ्यावयाचा आहे.

यशवंतरावांनी शिक्षण, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, साहित्य, सहकार अशा विविध विषयावर जे चिंतन केले ते त्यांच्या भाषण संग्रहाच्या वाचनातून लक्षात येते. त्यांची भाषणे वाचताना एक विवेकशील विचारवंत असणारा वक्ता म्हणून त्यांची ओळख मनास पटते. यशवंतरावांच्या भाषणास लोकांची प्रचंड गर्दी होत असे. त्यांचे बोलणे अतिशय शांत, मृदू आणि लाघवी असल्यामुळे श्रोत्यांना ते मोहवत असे. महाराष्ट्र राज्याच्या वेगवेगळ्या पदावर असताना देशाची उंची कशी वाढेल याचाच अधिक विचार त्यांनी केलेला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर त्याच्या उज्ज्वल भवितव्याचे स्वप्न यशवंतरावांनी आपल्यासमोर उभं केलं होतं. राज्याचा सर्वांगिण विकास करण्याचा विचार ते मांडताना त्यास कृतीची जोडही देत असत हे त्यांच्या भाषणांच्या वाचनातून प्रत्ययास येते.

यशवंतरावांची विविध विषयावरील भाषणे ही अतिशय गंभीर, मार्मिक पण विचाराच्या पायावर उभी असलेली दिसतात. त्यांच्या भाषणाचा केंद्रबिंदू हा व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांची उभारणी करणे हाच दिसून येतो. अतिशय चिकित्सक वृत्तीने त्यांनी समाजजीवनातील विविध प्रश्नांवर विचार मांडलेले दिसून येतात. या भाषणांना वैचारिक निबंधाचा दर्जा प्राप्त झालेला आहे.त्यांच्या भाषणांना साहित्यिक दर्जाही प्राप्त झालेला आहे. एकूणच यशवंतरावांच्या भाषणातून प्रकट झालेले विविध विषयावरील चिंतन हे देशाला सामर्थ्यवान बनवू पाहते आहे हे दिसून येते. या प्रकरणामध्ये त्यांच्या विविधांगी विषयावरील विचारांचे स्वरूप याचा परामर्श घेणार आहोत.

# अ) यशवंतराव चव्हाणांच्या भाषणांतून आलेले सामाजिक विचार

भारतीय समाजाच्या सर्वांगिण जडणघडणीमध्ये ज्यांचे मोलाचे योगदान आहे, अशा महापुरूषांमध्ये महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, न्यायमूर्ती रानडे, भांडारकर , गोपाळ गणेश आगरकर आणि यशवंतराव चव्हाण यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. यशवंतरावांनी समाजाच्या सर्वांगिण उन्नतीसाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले आणि समाजपरिवर्तनाची दिंडी अव्याहतपणे चालू ठेवली.

यशवंतराव समाजाच्या सर्वांगिण परिवर्तनाचे भोक्ते होते. त्यांना समाजाची काळजी होती, आस्था होती. सामाजिक बांधिलकी ते मानत. राजकारणात राहून समाजकारण करणारे यशवंतराव सत्ताकारणालाच समाजपरिवर्तनाचे साधन मानत. समाजातील विषमता, जातियता, वर्गसंघर्ष, याचबरोबर दैन्य, सामाजिक समस्या, सामाजिक उन्नती इ. विषयांवर अतिशय गंभीरपणे त्यांनी विचार मांडलेले आहेत. पवित्र आचरण ठेवून सदाचाराचा मार्ग त्यांनी दाखविला. आपल्या राजकीय कारकीर्दीमध्ये मंत्रीपदे भूषविलीच पण सहकारी चळवळ, शेतकऱ्यांच्या विकासाच्या योजना, पंचायत राज व जिल्हा परिषदांची स्थापना, सहकारी साखर कारखाने, दलित व दुर्बल घटकांच्या उध्दारासाठी निरनिराळे कार्यक्रम, साहित्य व सांस्कृतिक मंडळाची स्थापना, गरिबांच्या मुलांना मोफत शिक्षण इ. योजनांची महाराष्ट्रात मुहूर्तमेढ रोवली. कर्तृत्वातून नेतृत्व उभे करणारे यशवंतराव नेहमी समाजाच्या उन्नतीचा विचार करत असत.

यशवंतरावांनी आपल्या विविध विषयांवरील भाषणांमध्ये 'सामाजिक' बांधिलकी महत्वाची मानली होती. ज्या समाजात आपण वावरत असतो, वाढत असतो त्या समाजाविषयी काहितरी केले पाहिजे या भूमिकेशी ठाम राहून त्यांनी समाज जागृत करण्याचा प्रयत्न केला. लोकशिक्षण आणि समाजशिक्षण हा त्यांच्या सामाजिक विचारांचा उद्‌देश होता. आपल्या भाषणांतून प्रसंगानुरूप त्यांनी समाजातील विविध घटना, प्रसंग, रूढी, परंपरा, चालीरीती, अन्याय गुलामगिरी, भ्रष्टाचार, शिक्षण, स्त्री, सहकार अशा विविध विषयांवर प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. ते म्हणतात- '' भारत हा खेडयांचा देश आहे व म्हणून ग्रामीण भागातून सामाजिक सुधारणेचे पाट आपण कसे

खेळवतो. यावर सामाजिक क्षेत्रांतील आपल्या श्रमांचे साफल्य अवलंबून आहे.''[1] ग्रामीण समाज समोर ठेवून ते नेहमी सामाजिक सुधारणांचे पाऊल उचलत असत. बालपणापासूनच्या कारकीर्दीतील सामाजिक घडामोडींवरून त्यांची समाजाविषयीची आत्यंतिक तळमळ, आपुलकी, जिव्हाळा असल्याचे प्रत्ययास येते. विद्यार्थी दशेत प्रतिकुल परिस्थितीतही त्यांनी ज्ञानाची उपासना केली. त्या परिस्थितीची जाणीव त्यांच्या भविष्यकालीन कृतीउक्तीतून दिसून येते. ज्या समाजात त्यांचे जीवन घडत गेले त्या समाजातील घडामोडींचा परिणाम त्यांच्या जीवनावर होत होता. त्यातून त्यांना खूप काही शिकावयास मिळाले. यशवंतराव या संदर्भात म्हणतात -'' मला माझ्या वाचनाने जसे घडविले, तसेच या ग्रामीण संस्कृतीच्या अनुभवाचे जे स्त्रोत आहेत, त्यातूनही मी जडलो, घडलो असे म्हटले तरी चालेल.''[2] या अनुभवाच्या संस्काराची शिदोरी यशवंतरावांच्या पुढील यशस्वी जीवनास उपयुक्त ठरली. त्यातुन 'सामाजिक मत' तयार झाले.

यशवंतरावांच्या वागण्या-बोलण्यातून आणि कृतीतून त्यांची समाजाभिमुखता प्रकट होताना दिसते. समाजाचे ऋण मानून ते समाजसेवा करत असत. त्यांच्या मतें - ''ज्या समाजात, ज्या देशात आपण जन्मतो, त्या देशाला, समाजाला, आपल्या काहीतरी उपयोग व्हायला नको का? माणूस हा सामाजिक प्राणी असे म्हणतात, तेव्हा त्याचं सामाजिकत्व, हे त्याच्या सामाजिक बांधिलकीवरच अवलंबून असत''[3] यशवंतरावांच्या सर्वच भाषणांतून 'समाज' हा घटक महत्वाचा मानला असल्याचे प्रत्ययास येतो. प्रगत समाजातून समर्थ राष्ट्र उभे राहते त्यासाठी समाजातील आर्थिक विषमता, जातियता, शिक्षण, स्त्री-शिक्षण, सामाजिक ऐक्यभाव शेती, उद्योग, सहकार या विविध क्षेत्रांमध्ये जाणीवपूर्वक लक्ष घालणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन ते करतात. सामाजिकतेचे भान त्यांच्या भाषणांमध्ये जपलेले दिसते. समाजात, मातीत पाय रोवलेले नेतृत्व म्हणून त्यांचा उल्लेख केला जात असे. या मातीचे, समाजाचे, जनतेचे कल्याण करणे हा हेतू त्यांच्या 'राजकीय' कारकीर्दीत होता. म्हणूनच त्यांनी राजकारणाचा वापर समाजाच्या सुधारणेसाठी केला.

यशवंतरावांच्या 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर' आणि 'भूमिका' या तीन भाषणसंग्रहातील भाषणांमध्ये प्रामुख्याने 'समाज' हा मुख्य घटक केंद्रित असल्याचे प्रत्ययास येते. सर्वच भाषणांमधून सामाजिक विचारांचे सूत्र आढळून येते. तरीही या तीन भाषणसंग्रहांमध्ये 'राष्ट्र रचनेतील समाजसेवेचे महत्व', 'सामाजिक समतेचे भान',

'समाजवादाचा आमचा मार्ग', 'जगन्नाथाचा रथ', 'समाज क्रांतीचे रसायन', 'सामाजिक प्रगतीच्या प्रेरणा', 'भारतीय नागरिकत्वाची आठवण', 'भारताची सद्य:स्थिती: एक चिंतन', 'लोकमताचा कौल आणि त्याचा अर्थ', 'वर्ग, संघर्ष जातिसंघर्ष', 'जागतिक शांततेचे एकसंघ स्वरूप' इ. लेखांतून त्यांचे सामाजिक विचार प्रामुख्याने प्रकट झाले आहेत. ते पुढीलप्रमाणे :-

## (१) यशवंतरावांचे आदर्श समाजव्यवस्थेचे स्वप्न :-

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या सत्ताकारणात असताना नवसमाज निर्मितीचे ध्येय गाठण्याची भूमिका घेतली होती. 'समाज कल्याण हे साध्य आणि स्वराज्य हे साधन' या तत्वानुसार राज्य चालावे अशी त्यांची धारणा होती. बोलण्यापेक्षा कृतीला अधिक महत्व असल्याचे ते सांगतात. आपली समाजव्यवस्था ही आदर्श बनावी असे त्यांना वाटते. आदर्श समाजव्यवस्था म्हणजे नेमकी कशी असावी ही संकल्पना स्पष्ट करताना ते म्हणतात- ''ज्या समाजात आर्थिक व सामाजिक दृष्टया सर्व लोक समान पातळीवर असतात आणि ज्याला आपण समाजसेवा म्हणतो तिच्या मदतीशिवाय जीवनातील सर्व उपलब्ध सुखसोई जिथे सर्वांना सारख्या प्रमाणात उपभोग घेता येतो, अशा प्रकारचा समाजरचनेस आदर्श समाजसेवा म्हणता येईल''[४] संत, महंत, प्रबोधनकार यांची ही संकल्पना यशवंतरावांच्या विचारात आहे.

समाजामध्ये सर्व सुविधायुक्त, सुखी-समाधानी, समतेवर आधारीत जीवनप्रणालीचा स्विकार झाला पाहिजे. सामाजिक प्रश्नांचे विशाल आणि गुंतागुंतीचे स्वरूप लक्षात घेऊन समाजकार्य हाती घेतले पाहिजे. त्यासाठी अनेक संस्था, संघटना, सहकारी संस्था, अनेक संप्रदाय, समाज यांनी एकत्र येऊन यामध्ये लक्ष घातले तरच कल्याणकारी राज्य निर्माण होईल असे ते सांगतात. यामध्ये ग्रामीण क्षेत्रात कार्य करणारी 'रयत शिक्षण संस्था', 'टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस', स्त्रियांसाठी काम करणारी 'हिंगणे स्त्री शिक्षण संस्था' या सामाजिक संस्थांचा ते आवर्जून उल्लेख करून समाजासमोर आदर्श ठेवतात. यातून प्रेरणा घेऊन त्यासाठी शासनाकडून, समाजसंस्थांकडून व सामाजिक कार्यकर्त्यांकडून भरीव आणि पध्दतशीर असे प्रयत्न व्हावयास पाहिजेत असे ते प्रतिपादन करतात. त्यांनाही काही मर्यादा असल्याचे ते सांगतात. ते म्हणतात- '' जीवनाच्या एकंदर पध्दतीलाच एक नवीन वैचारिक आशय

देऊन तिच्यात बदल घडवून आणणे हे समाजसुधारणेचे उद्दिष्ट असते, तर समाजसेवा ही जीवनाच्या काही व्यवहार्य अंगापुरतीच मर्यादित असून, व्यक्तिगत किंवा व्यक्तीसमुहाचे दु:ख किंवा त्यांच्या अडचणी दूर करण्याचा हेतू तिच्या मुळाशी असतो. सामाजिक सुधारणा घडवून आणणे हे जनमताचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांचे कार्य असते, तर समाजसेवा करण्यासाठी योग्य प्रकारे शिक्षण घेतलेल्या माणसांची जरूरी असते.''[५] असा समाज सुधारणा आणि समाजसेवा यामध्ये फरक असल्याचे ते सांगतात. या दोन्हीतून समाजकल्याण साधले जावे असे त्यांना वाटते.

सामाजिक कार्य विचारपूर्वक अन् शास्त्रोक्त पध्दतीने केल्यास त्याची परिणामकारकता वाढते. नवसमाज निर्माण करण्यासाठी प्रामुख्याने सामाजिक, आर्थिक विषमता, अन्याय, अत्याचार, मागासलेपणा, अविकसितपणा, जुन्या धार्मिक रूढी व परंपरा, भिकारी, बाल गुन्हेगार, सामाजिक न्याय, ग्रामीण पुनर्रचना, समाजविकास, कुटूंबनियोजन, शिक्षण, स्त्रीजीवन, शेतकरी या बाबींवर नियोजनबध्द कार्यवाही केली तरच आदर्श समाजव्यवस्थेची आपली स्वप्ने खऱ्या अर्थाने साकार करता येतील असे यशवंतरावांना वाटते. 'समाज कल्याण विभाग व अनेक शासकीय कार्यक्रम यातून सरकारची जबाबदारी ते सांगतात. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन जर नियोजनबध्द कार्यक्रम राबविले तर निश्चित कल्याणकारी राज्य बनेल. यशवंतरावांच्या या विचारांवरून त्यांची प्रखर समाजाभिमुखता प्रकट होत असल्याचे निदर्शनास येते.

यशवंतराव समाजसुधारणेमध्ये काही महत्वपूर्ण व्यक्तींनी योगदान दिल्याचे सांगतात. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी व विसाव्या शतकाच्या प्रारंभी जे सामाजिक परिवर्तन झाले, त्यामध्ये प्रामुख्याने म. फुले, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, आगरकर, गोखले, लोकहितवादी, छत्रपती शाहू महाराज यांच्या सारख्या अनेक समाजसुधारकांनी सुधारणा केल्याचे यशवंतराव निदर्शनास आणून देतात. आजच्या पिढीकडून जर अशा प्रकारचे कार्य झाले तर निश्चितच नवसमाजनिर्मितीचे स्वप्न साकार होईल असे त्यांना वाटते. यासाठी मानव हा नियोजनाचा केंद्रबिंदु आहे. नियोजनाची नैतिक बाजू महत्वाची असल्याचे ते सांगतात. ते पुढे म्हणतात-'' ज्या नव्या समाजरचनेचे स्वप्न आपण अनेक दिवस आपल्या उराशी बाळगले आहे, तिची उभारणी आपण भक्कम पायावर करू शकू''[६] असा विश्वास ते व्यक्त करतात. या विचारावरून यशवंतरावांच्या आदर्श समाजरचनेचे विचार लक्षात येतात.

## (२) समताधिष्ठित समाजनिर्मिती :-

यशवंतरावांच्या भाषणांतून प्रकट झालेल्या विचाराचा मूळ भाग हा 'सामाजिक समता' हाच असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात समाजसुधारकांची खाण आढळून येते. जवळजवळ तीन पिढ्या या समाजसुधारकांच्या होऊन गेल्या. यामध्ये पहिली पिढी लोकहितवादी म. फुले, जगन्नाथ शंकरशेठ यांची तर दुसरी पिढी न्या. रानडे, तेलंग, भांडारकर यांची होती. तिसऱ्या पिढीमध्ये आगरकर हे प्रामुख्याने असल्याचे निदर्शनास येते. या सुधारकांची समाजात समता, ज्ञान, संस्कृती यांचे महत्व प्रतिपादन करून मानवताधिष्ठित समाजनिर्मितीचा उद्‌घोष केला. आयुष्यभर समाजसुधारणेसाठी स्वत:ला वाहून घेतले. या विचारांचा वारसा यशवंतरावांनी अंगी बाणविला आणि समाजसुधारणेमध्ये समतेचे महत्व अनन्य साधारण असल्याचे सांगितले.

यशवंतरावांच्या मते सामाजिक विषमता ही प्रगतीला अडसर ठरणारी आहे. आर्थिक विषमता, स्त्री-पुरूष, उच्च-नीच , धर्म, जात, वंश, भाषा यामधील भेद हा खऱ्या अर्थाने सामाजिक विषमता निर्माण करतो. सामाजिक विषमता ही फक्त भारतातच प्रखरतेने दिसते. बाकीच्या चीन, जपान, तुर्कस्थान, सारा युरोप आणि अमेरिका या देशांमध्ये या विषमतेचा कोणी उच्चारदेखील करत नाही. ती फक्त भारताच्या रोमरंध्रात भिनलेली आहे. ती समूळ नष्ट करणे हे आपल्या भारतवासियांचे कर्तव्य असल्याचे यशवंतराव सांगतात. कारण '' हिंदुस्थानामध्ये जातींच्या, धर्मांच्या अशा ज्या काही जुन्या परंपरा आहेत, त्या परंपरांनी सामाजिक क्रांतीला नेहमी पराभूत केले आहे.''[७] हा धोका लक्षात घेऊन समाज समताधिष्ठित बनविण्यासाठी सतर्क राहण्याचा विचार सर्वांना करावा असा विचार यशवंतराव व्यक्त करतात.

आगरकर म्हणतात- '' मनुष्याची श्रेष्ठता आणि ज्येष्ठता त्याच्या जन्मावरून न ठरविता गुणकर्मांवरूनच ठरवावी''[८] याच विचारांचा धागा यशवंतरावांनी पकडून समाजातील ही विषमता समुळ नष्ट व्हावी आणि सर्व मानवजातीला समानतेने जगण्याचा हक्क मिळावा अशी भूमिका ठेवली. भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना समान अधिकार देऊनही प्रत्यक्षात ते उपभोगता येत नसल्याची खंत यशवंतराव व्यक्त करतात. समाजातील शोषित यांच्यासाठी समाज काहीच करीत नाही. त्यामुळे ते पिढ्यांनपिढ्या मागासलेले राहिलेले आहेत. ते म्हणतात- ''शोषित आहे, तो शोषित राहू नये, असा प्रयत्न कधी झालाच नाही. शोषिताने प्रतिकार करावा इतके सामर्थ्य त्याला समाजव्यवस्थेने कधी प्राप्त होऊ दिले नाही''[९] श्रीमंत गरिबांचे शोषण करतो, शेतकरी

मजुराचे शोषण करतो, भांडवलदार - मजूर कामगारांचे शोषण करतो, उच्च समजला जाणारा समाज मागासवर्गिय समाजाचे शोषण करतो. हा वर्गसंघर्ष नष्ट होण्यासाठी वर्ग समन्वयाची भावना वाढीला लागली पाहिजे त्यासाठी समाजव्यवस्थेने प्रयत्नशिल रहावे असे मत यशवंतरावांचे होते. या दुर्बल घटकांच्यात शक्ती निर्माण करण्याचा प्रयत्न समाजातील घटकांनी करावा. या संदर्भात यशवंतराव म्हणतात - "या संघर्षासाठी समाजातील सुजाण व्यक्तींनी त्याला आपणहून सर्व प्रकारची मदतही केली पाहिजे कारण अशा संघर्षातून त्याला जो लाभ मिळेल तो चिरस्थायी राहणार आहे. कुणाच्या तरी उपकाराने किंवा उदारतेमुळे त्याला काही दिले, तर त्याने त्याचे भागायचे नाही. त्याचे समाधानही होणार नाही. कुणी त्याला दया दाखविली तर त्याने काय कोणार? अशा कृत्रीम मदतीने किंवा दयेने सामाजिक अन्याय अत्याचार कधीच दूर होत नसतात."[10] त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन कृतीशिलता दाखवावी असे त्यांना वाटते.

मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या प्राथमिक गरजा पूर्ण करणे आवश्यक आहे आज २० व्या शतकातही या गरजा पूर्ण होत नाहीत याची यशवंतरावांना खंत वाटते. गरिबी हा समाजाला लाभलेला एक शापच आहे ते या संदर्भात म्हणतात- "तिन्ही सांजेच्या वेळी मुले अन्नासाठी कासावीस झाली आणि घरात अन्नाचा कणही नसला म्हणजे आईच्या पोटात जी कळ येते ती गरिबी"[11] ही गरिबी पोट भरलेल्यांना जाणवत नसते. त्यासाठी तो अनुभवच घ्यावा लागतो अशी ही गरिबी नष्ट करण्यासाठी आर्थिकदृष्टया सबलीकरण करणे गरजेचे असल्याचे यशवंतराव सांगतात. सर्वधर्म समभाव, सामाजिक समता, हरिजन सेवा या खऱ्या सामाजिक सुधारणा करण्याची इच्छा ते व्यक्त करतात. अज्ञान, दारिद्रय, मागासलेपण या विकृतींनी संपूर्ण समाज पोखरला असल्यामुळे प्रथम यातून समाजाला बाहेर काढणे आवश्यक असल्याचा विचार त्यांच्या भाषणांतून वारंवार येताना दिसतो.

रानडयांची पुरोगामी सामाजिक सुधारणा, आगरकरांचा सामाजिक क्रांतीवाद, म. फुल्यांनी कृतीला दिलेले महत्व, महर्षी कर्वे यांची स्त्री सुधारणा, साने गुरूजींचे बलिदान, विनोबांची भूदान चळवळ इत्यादि समाजसुधारकांच्या कार्याचे मूल्यमापन करून सामाजिक सुधारणेच्या बाबतीत आपण किती झेप मारली आहे याचा अंदाज ते व्यक्त करतात. सामाजिक सुधारणा लोकांच्या मनावर बिंबल्याशिवाय अमलात आणता येणार नाही, हे सत्य ते बोलून दाखवितात. लोकाचाराला न मानणारी सुधारणा गळी उतरविणे दिव्य असल्याचे ते सांगतात. त्यासाठी सुधारणेची आस्था असलेल्या मंडळींनी

एकत्र येऊन विचारविनिमय करून संघटितरित्या सामाजिक सुधारणेच्या कार्यास वाहून घेतले तरच खऱ्या अर्थाने समाज सुधारेल असा विचार ते व्यक्त करतात . सामाजिक सुधारणा अमलात आणण्यासाठी कुठल्याही खस्ता खाऊन आणि कष्ट सोसून निर्धाराने अन् सातत्याने कार्य करणाऱ्या समाजसुधारकांची आज आपणास गरज असल्याचे ते सांगतात. त्यासाठी सामाजिक परिषदांची आवश्यकता असल्याचे ते सांगतात.

थोडक्यात, समाजात सर्वंकष समानता प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक विषमता कमी करणे आवश्यक आहे, असा समताधिष्ठित विचार यशवंतरावांनी मांडला आहे.

## (३) जातीयवादाचे निर्मूलन :-

परंपरागत चालत आलेला आणि एकमेकांविरूध्द संघटितपणे उभे करण्यास शिकविणारा जातीयवाद हा भारताला शाप ठरला असल्याचे यशवंतराव सांगतात. यासंदर्भात प्राचार्य शिवाजीराव भोसले यशवंतरावांच्या जीवनातील एक प्रसंग आवर्जून सांगतात- ''कऱ्हाडच्या हरिजनवस्तीतील शाळेच्या उद्घाटनासाठी एका थोर हरिजन सेवकास निमंत्रण देण्यासाठी चव्हाण पुण्यास गेले. त्यांना या हरिजनसेवकाने एक अट घातली. माझ्या पंगतीला काही हरिजन बसतील. तुझ्या घरच्या लोकांना हे चालेल काय विचारून पहा. चव्हाणांनी घरच्या, वडीलधाऱ्यांच्या वतीने आश्वासन दिले. मग त्या थोर हरिजन सेवकाने निमंत्रण स्विकारले, कऱ्हाडला येऊन शाळेचे उद्घाटन केले. सवर्णांचा आणि हरिजनांचा भोजनाच्या पंगतीत संगम घडवून आणला. कऱ्हाडमध्ये घडून आलेला हा दुसरा प्रीतिसंगम होता.''[१२] या वरून यशवंतरावांची समाजसन्मुखता हा स्थायीभाव असल्याचे दिसून येते.

'कोणाही जीवनाचा न घडो मत्सर, वर्म सर्वेश्वर पुजनाचे' या विठ्ठल रामजी शिंदेच्या विचारानुसार यशवंतराव सर्वधर्मसमभावाचे तत्व मानतात. अस्पृश्यांना जीवनभर उपेक्षित जीवन जगावे लागते ''अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक आहे, असे काही लोक म्हणतात. पण हिंदू धर्म कलंकित आहे, असे एकही हिंदू मानत नाही. एका माणसाला दुसऱ्या माणसाने त्याला न शिवण्याइतके पतित लेखण्याची प्रथा हिंदू धर्माखेरीज व हिंदु समाजावरील कोठेतरी सापडेल काय? हिंदू समाजाची नीती सगळया जगाच्या नीतीपेक्षा अगदी उलटी आहे.''[१३] अशी परखड टीका डॉ. आंबेडकर यांनी

केली खरे तर 'सर्व मानव समान आहेत' या भावनेतून अखिल मानवजातीनी एकत्र येऊन जीवनाचा आनंद घ्यावा असा विचार यशवंतराव मांडतात.

मनुष्य केवळ भाकरीवर जगत नाही त्याला मन आहे, भावना आहेत. यशवंतराव म्हणतात- '' हरिजनांना अन् शोषितांना त्यांच्याच बाबतीत समाज पक्षपात करतो, असे वाटू न देणे, ही सर्वात महत्वाची गोष्ट आहे. जातपात कोणतीही असो, सामाजिक प्रतिष्ठा असो वा नसो, आर्थिक स्थिती खालावलेली असो वा चांगली असो, सारा समाज आपल्याकडे 'माणूस' म्हणून पाहतो, ही भावना त्यांच्यात वाढीला लावली पाहिजे''[१४] तरच या अस्पृश्य म्हणविल्या जाणाऱ्या 'मानवा' ला न्याय मिळेल. आणि समाजातील जातिभेद समूळ नष्ट होण्यास मदत होईल असे यशवंतरावांना वाटते. जाती व्यवस्थेवर आधारलेल्या या समाजरचनेमध्ये पिढ्यानपिढ्या गुलामगिरीमध्ये, दु:खामध्ये , अज्ञान, अत्याचारामध्ये चाचपडत राहिलेल्या या उपेक्षित समाजास 'जीवन' मिळेल. जातियता समूळ नष्ट झाल्याशिवाय सामाजिक क्रांती होऊ शकणार नाही असे ते सांगतात.

ऋग्वेदकाळी ही जातीसंस्था अस्तित्वात नव्हती. कामावरून जाती निर्माण होत गेल्या. त्यानंतर त्याच घरात जन्मला म्हणून त्या जातीचा असा जन्मावरून दर्जा ठरविला गेला या हास्यास्पद पध्दतीमुळे भारतीय समाज रसातळाला गेल्याचे यशवंतराव सांगतात. ते म्हणतात-'' हा मुलगा अमुक खोलीत जन्मला म्हणून उच्च, तर दुसरा अमुक खोलीत जन्मला म्हणून कनिष्ठ असा भेदभाव आपल्या मुलांमुलांतच एखादे कुटूंब करू लागले म्हणजे ते कुटुंब रसातळाला जाणारच. अशाच प्रकारच्या जातिभेदाने आमच्या राष्ट्र कुटुंबाची हानी केली आहे''[१५] अशी माणुसकीला कलंक लावणारी रूढी तात्काळ नष्ट झाली पाहिजे असा विचार यशवंतराव स्पष्ट करतात. त्यासाठी सर्वधर्मसमभावाचे तत्व संपूर्ण मानवजातीने स्विकारले पाहिजे असे त्यांना वाटते.

'माणूस ही जात आणि मानवता हाच धर्म' या तत्वावर आपण आपआपले जीवनमार्ग निश्चित करून ऐक्याच्या भावनेतून वाटचाल केली पाहिजे तरच नवनिर्मित समाजाचे स्वप्न साकार होईल असे त्यांना वाटते. ते म्हणतात- '' जातींच्या, धर्मांच्या वेडाने आम्ही दबून गेलेलो, तुटलेलो फाटलेलो असे लोक आहोत. आमची ही दबलेली, तुटलेली, फाटलेली मने बांधली जाऊन एक बनली पाहिजेत. हिंदुस्थान हा सुखा-समाधानाने, कर्तृत्वाने आणि वैभवाने नांदणारा असा एक नवा समाज बनावा, एकजिनसी समाज बनावा, असे समाजवादी चित्र आज आमच्या डोळ्यांपुढे आहे.''[१६] या

नवनिर्मित समाजाचे ध्येय गाठण्यासाठी सर्व नागरिकांना सर्व सुख-सुविधांयुक्त जीवन प्राप्त व्हावे ही भूमिका त्यांनी ठेवली होती. न्याय, समता, बंधुता या मुलभूत तत्वांचा प्रत्येक व्यक्तीला लाभ मिळावा तरच सामाजिक प्रगतीकडे वाटचाल होईल आणि यातूनच समर्थ राष्ट्र होण्यास मदत होईल असा विचार ते व्यक्त करतात.

बालविवाह बंदी, पुनर्विवाह, स्त्री-मुक्ती, शिक्षणाची समानसंधी, अंध:श्रध्दा निर्मूलन, पिळवणूक सुटका अशा सामाजिक समस्यांवर यशवंतरावांनी कृती- उक्तीतून उपाययोजना राबविण्याचा मानस व्यक्त केलेला आहे. समाजातील सर्वांना अन्न, वस्त्र, निवारा मिळाला पाहिजे त्याचबरोबर 'मानवता' तत्वावर समाजव्यवस्था उभी रहावी असा विचार ते व्यक्त करतात. अतिशय सूक्ष्म दृष्टीने त्यांनी संपूर्ण समाजजीवनाचे निरीक्षण करून वास्तवतेवर परखड विचार मांडलेले आहेत. समाजाला पोखरून जर्जर करून टाकणाऱ्या या सामाजिक समस्यांवर यशवंतराव अतिशय प्रखर शब्दांतून टिका करतात. त्यांना समाजव्यवस्था ही न्यायी, मानवतेवर तत्वांचे पालन करणारी हवी आहे. माणसाच्या माणुसकीवर व त्याच्या अंत:सामर्थ्यावर त्यांची जबरदस्त श्रध्दा होती. मानवाच्या शक्तीवर प्रचंड विश्वास होता. त्यातूनच मानवी जीवनाचे परिवर्तन घडवून आणणे हे त्याच्यांपुढील आव्हान यांनी लक्षात घेतले होते. त्यामुळे मानवाचे कल्याण हे समाजकारणाचे अंतिम उद्दिष्ट ते स्पष्ट करतात. राजर्षि शाहू महाराज या संदर्भात म्हणतात-''अस्पृश्यांना मनुष्याप्रमाणे वागविल्याशिवाय राजकारण कसे होणार? ज्यांना राजकारण करणे आहे त्यांना मनुष्याला मनुष्याप्रमाणे म्हणजे इतर देशात वागवितात त्याप्रमाणे वागविले पाहिजे.''[१७] म्हणजेच राज्यकर्त्यांनीही विचारातून आचार करावेत असा विचार यशवंतराव मांडतात.

### (४) राजकारणातून समाजपरिवर्तन :-

यशवंतराव राजकारणात राहून सत्ताकारण करीत होते. ' समाजकल्याण हे साध्य आणि स्वराज्य हे साधन अशी त्यांची राजकारणाची धारणा होती. समाजपरिवर्तन करणे ही कुणा एका व्यक्तीला वा संस्थेला शक्य नसते, त्यासाठी एकत्रितरित्या कार्य होणे गरजेचे असल्याचे यशवंतराव सांगतात. यशवंतरावांचे नेतृत्व समर्थ तर होतेच, शिवाय ते तळमळीचे समाजसुधारक होते. राजकारणातून सत्ता हाती असताना या सत्तेचा वापर जनतेच्या हितासाठी, समाजाच्या कल्याणासाठी केला तर निश्चितच सामाजिक प्रगतीची दारे खुली होतील असे त्यांना वाटते.

यशवंतराव म्हणतात- '' राजकारण म्हणजे केवळ सत्तेच्या क्षेत्रात काही कारभार करणे वा निवडणुका लढविणे नसून, समाजपरिवर्तनाचे ते साधन आहे, हा सिध्दांत या देशातील महान नेत्यांनी देशापुढे मांडला. सामाजिक सुधारणावादाला सामाजिक समतेच्या दृष्टीने ज्या गोष्टी अपेक्षीत होत्या, त्यांचा समावेश राजकारणात झाला..... सर्वधर्मसमभाव, सामाजिक समता, हरिजन सेवा, सामाजिक न्याय इत्यादी महत्वपूर्ण सुधारणा, आमच्या राजकीय परंपरेचा अविभाज्य भाग बनल्या''[१८] सत्तेचा वापर हा यशवंतरावांनी समाजासाठी केला. त्यांनी अतिशय विचारपूर्वक ध्येय-धोरणे राबविली. ग्रामीण समाज, ग्रामीण माणूस यांच्या विकासासाठी त्यांनी अनेक उपक्रम केले. 'समान नागरी कायदा' अंमलात आणण्यासाठी धडपड केली. सामाजिक न्यायावर उभी असलेली शासनव्यवस्था व राजकीय नेतृत्वाविषयी त्यांची भूमिका आज अत्यंत महत्वाची ठरते. सत्ता स्पर्धेच्या राजकारणात नेत्याला प्रसंगी डावपेचांचा अंगीकार करावाच लागतो. यशवंतराव हे डावपेचांपासून दूर राहणे शक्यच नव्हते, परंतु सामाजिक हेतुंच्या सिध्दीसाठीच ते डावपेच खेळले हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य आहे. राजकारणाशी तडजोड करीत असतानाच गरीब समाजाची मोडतोड होणार नाही. याची ते काळजी घेत होते. यशवंतरावांनी आपल्या संपूर्ण हयातीत 'गरीब माणूस' आपल्या धोरणातून सोडलेला नाही.

यशवंतराव हे बोलघेवडे समाजसुधारक नव्हते, ते कृतीशील नेते होते. राजकारण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तींनी जनतेचे प्रश्न, समस्या, सुख-दु:खे समजून घेऊन त्यावरती उपाययोजना कराव्यात असे त्यांना वाटते ते म्हणतात- '' जो जो माणूस हिंदुस्थानचा नागरिक आहे, त्याच्या ज्या चिंता आणि दु:खे आहेत, या सगळयांची चिंता हिंदुस्थानने वाहिली पाहिजे''[१९] सगळयांची चिंता हिंदुस्थानाने वाहायची म्हणजे हिंदुस्थानात राजकारण करणाऱ्यांनी वाहावी हेच सूचित आहे. राजकीय नेतृत्वात सूज्ञपणा दाखविण्याची क्षमता भारतीय नेतृत्वात नसल्याचे प्रत्यंतर यशवंतरावांना आले होते. हा सुज्ञपणा राज्यकर्त्यांनी दाखवावा आणि विकासकामाचा कृतीशील विचार करावा असे त्यांना वाटते. राजकारण करताना समाजाला न्याय व समता देणे आवश्यक आहे. कोणत्याही जातीवर, धर्मावर आधारीत राजकारण करू नये, आपल्यावर दात्याची जबाबदारी आहे, हे ओळखून जाणीवपूर्वक पावले उचलावीत असा विचार यशवंतराव व्यक्त करतात. ते म्हणतात- "जेव्हा तुम्ही राजकारणाचा विचार करता, आणि मी हिंदु आहे व हिंदुत्वाचा मला विचार केला पाहिजे, माझ्या हिंदुत्वाला

जास्त प्रतिष्ठा मिळाला पाहिजे किंवा माझ्या इस्लामला जास्त प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. असा ज्यावेळी तुम्ही मनात विचार आणता, त्यावेळी राजकारण जातीयवादी बनते.... जे लहान-लहान अल्पसंख्यांक आहेत. त्यांच्या मनामध्ये संशय निर्माण झाला, शंका निर्माण झाली तर ती समजण्यासारखी आहे. परंतु जो बहुसंख्य समाज आहे तो जर जातीयवादी झाला तर राष्ट्र संपले म्हणून समजावे''[२०] भारताच्या राजकीय कसोटीवर, उतरलेले, पहिले नेतृत्व यशवंतरावांचे दिसते.

'लोक कल्याणकारी जाणता राजा' ही शिवछत्रपतींची लोककल्याणकारी योजना यशवंतरावांनी राजकीय जीवनात वापरात आणली. आपल्या मातीशी इमान राखून शेवटच्या श्वासापर्यंत काम करत राहाणारी राजकीय मंडळी निर्माण झाली पाहिजेत, असे मत यशवंतराव मांडतात.''दु:खात असलेल्या जनतेच्या जीवनावर सुखाची सावली निर्माण करणे, हे राजाचे कार्य प्रत्येक मराठी माणसाने केले पाहिजे.एकेक माणूस, एकेक मूल हे सावली देणारे झाड आहे असे मानून त्यास खतपाणी घातले पाहिजे.''[२१] राजकारणातून मानवी हक्कांची जपवणूक, संरक्षण राजकारणी लोकांनी केले तरच विकसनशील अर्थव्यवस्था प्राप्त होईल, असे त्यांना वाटते. त्यांच्यामते जो जनतेचे नेतृत्व करतो त्यांनी लोकांच्या गरजा, त्यांच्या परंपरा त्यांची श्रध्दास्थाने, सांस्कृतिक धारणा, जीवन जगण्याची रीत, भावी जीवनाची स्वप्ने समजून घेणे अत्यावश्यक आहे.

यशवंतराव म्हणतात, सत्तेच्या मोहापायी जनतेचे कल्याण न पाहता फक्त स्वत:चे स्वार्थ पाहणे चुकीचे आहे. सत्तेचा लाभ जनतेलाच मिळावयास हवा जनतेशी मातेचे नाते या राज्यकर्त्या पुत्राने ठेवून या मातेच्या आशीवार्दातून सर्वस्वातून, भावनेतून आणि परंपरेतून एक समर्थ नेतृत्व उभे करावे असे यशवंतरावांना वाटते. जनतेच्या प्रेमाच्या शक्तीवर त्यांची सेवा करण्याचे व्रत घेऊन, मातीशी ईमान राखून, विशाल मानवतावादी दृष्टीकोन राज्यकर्त्यांनी ठेवावा असा विचार यशवंतराव मांडतात. विचाराप्रमाणे आचार घडविण्याचे कार्य या नेतृत्त्वातून व्हावे तोच खरा होऊ शकतो असे ते म्हणतात.'' स्वातंत्र्य, मानवतेचे दु:ख आणि ज्ञानविज्ञानांचा प्रसार या आपल्या मूळ निष्ठा, मूळ प्रेरणा यांच्याशी कुठलीही तडजोड न करता त्याचा लोकजीवनामध्ये आचार घडवित असताना करावे लागणारे फेरफार ज्या माणसाला समजतात त्याला मी नेता मानतो''[२२] असा नेताच जनतेच्या आशा आकांक्षाचा विचार करेल असा विश्वास यशवंतराव व्यक्त करतात.

यशवंतरावांच्या मते, नेतृत्वाच्या कसोटीने समाजापर्यंत पोहचणे हे राज्यकर्त्यांचे कर्तव्य आहे. राजधर्म हा सर्वांत मोठा मनुष्यधर्म मानून राजकारणाची धुरा सांभाळवयास हवी. राजकारणामध्ये सामाजिक जाणिवांचे भान हवे, समाजजीवनात परिवर्तन घडवून आणणे, जनतेच्या सर्व प्रश्नांचा पाठपुरावा करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन ते करतात. यशवंतरावांचा स्वत:चाच राजकारणी पिंड होता. सामान्य माणसाचे जीवनमान उंचविणाऱ्या विकासाच्या योजना राजकारणी लोकांनी राबवाव्यात असे त्यांना वाटते. मराठी मातीत पाय रोवण्याची आणि मातीशी ईमान राखण्याची प्रवृत्ती राजकीय नेत्याची हवी. लोकशाही शासनव्यवस्थेतील महत्वाचे निर्णय घेताना पाळावयाचे सूत्र सांगताना यशवंतराव म्हणतात- '' निर्णय महत्वाचे की लोक महत्वाचे असा प्रश्न निर्माण झाला तर लोक महत्वाचे असेच मी म्हणेन आणि जेव्हा लोक आणि निर्णय यांच्यात संघर्ष निर्माण होतो. तेव्हा लोक विजयी होतात, असा इतिहास आहे''[२३] कोणत्याही निर्णयामध्ये मानवतावादी दृष्टीकोन ठेवणे हे गरजेचे असल्याचे ते सांगतात. माणुसकी हाच राजकीय व सामाजिक नेत्यांच्या सामर्थ्याचा जीवनस्त्रोत आहे. हे सामर्थ्य प्रत्येक नागरिकात निर्माण करणे, हेच राजकीय नेत्याच्या यशाचे गमक असल्याचे यशवंतराव सांगतात. ''वचने फक्त न देता कृतीयुक्त कार्यक्रम राबवावेत माझ्या शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी प्रयत्न करीन''[२४] अशी प्रत्येक नेत्याची विचारधारा असावयास हवी असे त्यांना वाटते.

''लोकमान्य टिळकांच्या नंतर भारतीय राजकारणाच्या पटावर आपला ठसा उमटविलेले यशवंतराव हे एकमेव मराठी व्यक्तिमत्व आहे''[२५] असे विचार गौरवपूर्ण उद्‌गार डॉ. शिवाजीराव चव्हाण यांनी काढलेले आहेत. असामान्य राजकीय नेत्याची प्रचिती या उद्‌गारांवरून येते. त्यांचे विचार आजच्या राजकीय परिस्थितीत भारतीय नेत्यांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरणारे आहेत. यशवंतरावांनी फलोद्यान क्रांती, हरितक्रांती, कृषि औद्योगिक क्रांती, धवलक्रांती अशा समाजाच्या विकासाच्या आघाडया उभ्या केल्या. मातीतील माणसाचे जीवनमान उंचविणाऱ्या विकासाच्या योजना त्यांनी राबविल्या. त्यांच्या विषयी नरूभाऊ लिमये म्हणतात,- ''स्वातंत्र्यपूर्व काळात स्वार्थाचा विचार सुचत नसे तथापि प्रचंड सत्ता आणि सत्तेभोवती हमेशा घोटाळणाऱ्या कनक, कांता, मदिरा, मदिराक्षी यांच्या स्वाऱ्या महासागरात पोहत असताना यशवंतरावांच्या शरीराभोवती जणू घामापासून दूर अलिप्ततेचे जन्मजात कवच लाभले होते''[२६] असे राजकारणात राहूनही पवित्र मनाने समाजकारण करणारे यशवंतराव

समाजकारण्यांनी समाजाभिमुख राजकारण करावे अशा भूमिकेशी ठाम होते. त्यांचा पिंडच राजकारणी होता. कार्यक्षम प्रशासक, मजबूत संघटक म्हणूनही त्यांची ख्याती होती. आजच्या राजकारणास दिशा देणारे, स्फुर्ती देणारे यशवंतरावांचे विचार आहेत.

## (४) शेती हा ग्रामीण विकासाचा गाभा :-

यशवंतरावांच्या परम श्रद्धेच्या स्थानांमध्ये त्यांची आई विठामाता आणि शेती ही होती. त्यांनी शेतीला 'आत्मा' मानले आहे. त्यांनी शेतीस अतिशय महत्वाचे स्थान दिलेले आहे. यशवंतरावांचा जन्म मुळी शेतकरी कुटुंबात झाल्यामुळे त्यांनी शेतीविषयी मूलगामी विचार मांडलेले आहेत. आजपर्यंत अनेक नेत्यांनी विचारवंतांनी, शेततज्ञांनी शेतीविकासाबाबत विचार मांडले परंतु यामध्ये कोणीही शेतीचा सर्वंकष विचार केल्याचे दिसून येत नाही. शेती तंत्रज्ञांचे आधुनिक ज्ञान मिळविलेल्या यशवंतरावांनी समाजाला एक विशाल मानवतावादी दृष्टीकोन दिला. महात्मा फुलेंच्या विचाराची कास धरूनच यशवंतरावांनी सामाजिक विषमतेच्या आणि अज्ञान अंधाराच्या खाईत सडत पडलेल्या या शेतकरी वर्गाविषयी आपली भूमिका निश्चित स्वरूपाची घेतली. त्यांच्या शालेय जीवनातल्या 'ग्रामसुधारणा' या विषयावरील वक्तृत्वावरून त्यांचे शेती, खेडी या विषयीचे चिंतन दिसून येते. ते म्हणतात- " मी शेतकरी परंपरेचा आहे. मी आता शेतकरी राहिलो नसलो तरी मला शेतकरी परंपरेचा अभिमान आहे. शेतकरी परंपरा राहिली पाहिजे. माझा मूळ पिंड शेतकऱ्याचा आहे हे मी काही नाकारीत नाही"[२७] ज्या मातीत जन्माला आलो त्या मातीविषयी जिव्हाळा प्रेम, कर्तव्याची भावना मनामध्ये असणे हा खरा मातृभूमीविषयीचा अभिमान होय. हाच अभिमान यशवंतरावांच्या मनामध्ये होता.

भारत हा शेतीप्रधान देश आहे. या शेतीचा शोध हा भारतीयांनीच लावला. विकासाचे साधन म्हणून या शेतीकडे पाहताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे हे लक्षात येते. तर खेड्यांचा विकास होईल. ते खेड्याचे स्वरूप सांगताना म्हणतात- "खेड्यापाड्यातून किंवा गावाच्या बाजुने दुपारी आपण गेलो तर काही हालचाल दिसत नसे. सर्व गाव जणू काही झोपल्यासारखे वाटे. शेतीवर जेथे विहीर असे तेथे विहिरीतून पाणी काढल्याचा आवाज क्वचित ऐकू यावयाचा. दुपारच्या उन्हाने थकून भागून गेलेली माणसे आणि जनावरे चूपचाप पडून असावयाची पडझड झालेली जीर्ण घरे, मोडकळीस आलेले वाडे आणि तुटलेली शेती हे त्या काळच्या महाराष्ट्रातल्या

खेड्यांचे स्वरूप होते. अद्यापही थोडीफार हीच अवस्था आहे.''[२८] ही अवस्था बदलण्यासाठी शेतीचे यांत्रिकीकरण, सामुदायिकीकरण आणि आधुनिकीकरण होणे गरजेचे असल्याचा विचार यशवंतराव मांडतात. शेतीचा प्रश्न हा अतिशय व्यापक स्वरूपाचा आहे. उत्पादन घटल्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन दारिद्र्यात खितपत पडलेले आहे. त्यामुळे नेमकी 'शेती कशी करावी' हे तंत्र अवगत करून घेणे गरजेचे असल्याचे यशवंतराव म्हणतात. त्यासाठी शैक्षणिक महत्व जाणून घ्यावे आणि या शिक्षणाचा उपयोग शेती सुधारणेत करावा असा विचार यशवंतराव मांडतात.

यशवंतराव 'शेती' हा आत्मा मानत असत. या आत्म्याचा विकास केला तर खेड्यांचा विकास होईल आणि 'स्वावलंबी खेडे' हे स्वप्न सत्यात उतरेल असा विश्वास त्यांना वाटतो. परंतु निसर्गावर आधारीत शेतीसाठी काही थेट उपाययोजना करणे गरजेचे आहे ते म्हणतात- '' शेतीचे हे ज्ञान पावसाच्या पाण्यासारखे गेले पाहिजे असे मला वाटते. वाहणारी नदी ज्या गावाच्या काठाने जाईल त्यालाच फक्त पाणी देते. पण पावसाचे पाणी हे सगळीकडे जाते. कुठे कमी तर कुठे जास्त, असे पावसाच्या पाण्यासारखे शेतीचे ज्ञान सगळीकडे पसरले पाहिजे, वाढले पाहिजे''[२९] त्यासाठी पाणी सर्व शेतीला मिळणे गरजेचे आहे, तसेच शिक्षणातून शेतीच्या विकासाचा कार्यक्रम राबविणे शेतीच्या दृष्टीने हिताचे होईल असे यशवंतरावांना वाटते. शेतीविषयक उदय पावणाऱ्या नव्या तत्वांचा तंत्रज्ञानाचा उपयोग शेतकऱ्याला करता आला पाहिजे. जाणीवपूर्वक प्रयत्न केले तरच समाजात बदल होईल, विकास होईल. हीच आदर्श समाजव्यवस्थेची पाहिली पायरी आहे. असे प्रतिपादन यशवंतराव करतात.

भारतातील कृषी महाविद्यालयांचा उपयोग प्रत्यक्ष शेतीमध्ये झाला पाहिजे. शिक्षित तरूण वर्गांनी शेतकऱ्यांच्या पर्यंत पोहचून त्यांना प्रगत तंत्रज्ञानाची, बियाणांची माहिती देणे गरजेचे आहे. शेतीमधील अपयश हा देशाचा पराभव असल्याचे लक्षात घेऊन समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अनेक प्रश्नांवरती उपाययोजना करावी. शेतीची धारणा कशी असावी? रचना कशी असावी? अवजारांचा उपयोग करावयाचा असेल तर त्याचे स्वरूप काय असावे? शेतीला लागणारे भांडवल कोणत्या पध्दतीने घ्यावे? शेताचा उपयोग कोणत्या कामासाठी करावा? शेतीवर आधारीत धंद्याचा उपयोग कसा करावा? त्याची बाजारपेठ कशी हस्तगत करावी? अशा शेती संबंधीच्या हजारो प्रश्नांची उकल करण्यासाठी शेतकऱ्याला योग्य मार्गदर्शनाची जरूरी असते. त्यासाठी या कृषीमहाविद्यालयांनी शेतकऱ्यांना उपकृत

करावे असे यशवंतराव सांगतात. या संदर्भात यशवंतराव म्हणतात- '' शेतकरी बांधवानों तुमच्या अकलेचा सुगंध जमिनीत मिसळा व देशाचे नंदनवन करा. कोर्टाच्या पायऱ्या झिजवण्यापेक्षा आधुनिक तीर्थक्षेत्र बनलेल्या कोयनानगर, भिलाई, भाक्रानानगल इ. ठिकाणांना भेटी द्या. कोयनेची वीज मोठ्या घरची लेक आहे. ती आपल्या घरी नांदावी असे वाटत असेल तर, तुमच्या घरी तांत्रिक शिक्षण घेऊन मुले तयार केली पाहिजेत''[30] शेतकऱ्याचे जीवनमान उंचावेल असे त्यांना वाटते.

यशवंतराव शेतीच्या विकासाची दोन अंगे सांगतात. पाहिले अंग पिक लागवडीच्या पध्दतीची सुधारणा होय आणि दुसरे अंग म्हणजे जमिनविषयक सुधारणा होय. पाहिले तांत्रिक स्वरूपाचे व दुसरे आर्थिक स्वरूपाचे अन् सामाजिक स्वरूपाचेही असल्याचे ते सांगतात. ''काँग्रेस ही शेतकऱ्यांची झाली पाहिजे''[31] अशी कल्याणकारी राज्याची कल्पना ते मांडतात. 'शेती कसणारा हाच शेतीचा मालक असला पाहिजे' या महात्मा फुलेंच्या विचाराचा धागा पकडून ते शेतकऱ्याचे शोषण, अज्ञानातून फसवणूक, पिढ्यानपिढ्याची गुलामगिरी, वर्षानुवर्षे दारिद्रयात पिचलेल्या शेतकऱ्याची जमीनदारांच्या विळख्यातून सुटका व्हावी, श्रीमंत शेतकरी वर्ग आणि भूमिहीन शेतमजूर यांच्यातील विषमता दूर व्हावी अशी सामाजिक विचारसारणी यशवंतरावांची होती. सामाजिक समता, न्याय या भूमिकेतून शेतीविषयक विचार यशवंतराव मांडतात. ''अज्ञान हा शब्द महाराष्ट्राच्या कोषातून आपल्याला काढावयाचा असून, त्याइतके मोठे कार्य आज दुसरे कोणतेही नाही''[32] तेच कार्य आज हाती घेतले पाहिजे असे त्यांना वाटते.

यशवंतराव या सर्व उपक्रमांतून सुंदर, सुखी समाज निर्माण करू पाहत होते. त्यांच्या कल्पनेतील खेडे निर्माण करू पाहत होते. ते म्हणतात- '' माझ्या कल्पनेतील खेडे म्हणजे केव्हा एके काळी लोक शेती करू लागले आणि तिच्याभोवती राहू लागले, म्हणून बनले ते खेडे नाही, किंवा ओढ्याच्या काठी शीळ घालीत हिंडणारा आणि कोकिळेची साद ऐकत फिरणारा कवी कल्पना करतो ते खेडे नाही. तर देशाच्या जीवनांत आपले स्थान घेणारे, सदैव विकास करणारे, या टोकापासून त्या टोकापर्यंत जीवनाचे पडसाद ज्याच्यावर पडत आहेत आणि जे आपल्या उत्पादन क्षमतेने इतरांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेत आहे, असे वर्धिष्णु गांव हे माझ्या कल्पनेतील आहे''[33] यशवंतरावांचे खेड्यासंबंधीचे स्वप्न साकार करण्यासाठी ते अविरत धडपडत राहिले. देशाची प्रगती ही खेड्यांवर अवलंबून असते आजही आपला देश आर्थिकदृष्ट्या

मागासलेला राहिला आहे. त्यासाठी शास्त्रीय ज्ञानाची गरज यशवंतराव बोलून दाखवितात.

जागतिक पातळीवरचा शेतीचा मूलभूत प्रश्न असल्याचे यशवंतराव सांगतात. तो सोडविण्यासाठी एकत्रितरित्या प्रयत्न होणे गरजेचे आहे तरच समाजजीवनातील दु:खाचा कायापालट होईल असा विचार यशवंतरावांनी मांडलेलाआहे. यशवंतरावांचे शेतीविषयीचे विचार अतिशय मूलगामी आणि वास्तववादी स्वरूपाचे आहेत.

## (७) सामाजिक एकात्मता हाच राष्ट्रीय ऐक्याचा पाया :-

महाराष्ट्राला संत मोठा वारसा लाभलेला आहे. संत, पंत, यांनी महाराष्ट्रात समाज जागृती करण्याचा अखंड प्रयत्न केला. समाजातील अन्याय, अत्याचार, जातीभेद अंधश्रध्दा निपटून काढून स्वातंत्र्य, समता, बंधुता, स्त्रीशिक्षण, विधवा विवाह, सामाजिक ऎैक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये सामाजिक ऐक्य निर्माण करणे हा महत्वाचा हेतू अनेक प्रबोधनकारांचा होता. यशवंतरावांनीही सामाजिक एकात्मता राष्ट्राच्या दृष्टीने महत्वाची असल्याचे म्हटले आहे.

यशवंतरावांनी एकात्मतेचे सामर्थ्य सांगितले आहे. सर्व मानवजीव ही एकाच परमेश्वराची मुले आहेत. व्यवसायानुसार भिन्न-भिन्न जाती पडत गेल्या, प्रांतानुसार वेगवेगळया भाषा बोलल्या जाऊ लागल्या तरीही विश्वबंधुत्वाची भावना प्रत्येकाच्या मनात रूजणे आवश्यक आहे. देशाचे जीवन समृध्द करण्यासाठी राष्ट्रीय ऐक्य निर्माण व्हावे असा विचार यशवंतराव मांडतात. धर्म, जात, भाषा, प्रांत याचा विचार करणारे लोक देशाच्या प्रगतीत अडसर निर्माण करतात. त्यामुळे जाणीवपूर्वक या प्रश्नाकडे अधिक लक्ष देऊन एकतेचे रक्षण केले पाहिजे असे प्रतिपादन यशवंतराव करतात. ते म्हणतात- ''एकतेच्या प्रश्नाबाबत एकच धोका मला सगळयात जबरदस्त वाटतो आणि तो म्हणजे भाषाभिमान आणि भाषांच्या अभिमानावर आधारलेले प्रांताचे अभिमान''[३४] मातृभाषेचा अभिमान माणसे विसरत नाहीत. राज्याराज्यातून आज भाषाभिमान बाळगला जातो. कर्नाटक, तामीळनाडूचे ते एक उदाहरण सांगतात, त्या राज्यात मराठी भाषेचा उच्चार करणे नाही किंवा एखाद्या व्यवसायाच्या पाटीवर मराठी शब्दही लिहिला जात नाही जरी एखाद्याने या नियमाचा भंग केला तर लगेच संघर्षाला आमंत्रण मिळते. अशा प्रवृत्तीच्या लोकांना बंधुत्वाची भावना कशी समजणार? ही बंधुत्वाची भावना लोकांपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी समाजाची असल्याचे यशवंतराव सांगतात.

देशाच्या सामर्थ्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेचे महत्व सर्व जनतेने लक्षात घेऊनच सामाजिक एकात्मता निर्माण केली पाहिजे. राज्यकर्त्यांनीही राजकीय ऐक्य निर्माण करून वैश्विक राजकारण केले पाहिजे तरच देशाचा आर्थिक सामाजिक विकास घडविता येतो असे यशवंतरावांना वाटते. या संदर्भात ते म्हणतात- " देशाच्या एकतेची ही जी भावना आहे, ती तुम्हा आम्हाला कायम ठेवली पाहिजे, टिकविली पाहिजे, या भावनेला थोडासा का होईना तडा गेला आहे, असे ज्या दिवशी शत्रूला वाटेल. त्या दिवशी या देशावर पुन्हा निश्चित संकट येईल हे आपण समजले पाहिजे .... ही एकतेची भावना हीच तुमची आमची खरी शक्ती आहे."[35] देशाचे संरक्षण आणि संवर्धन हे राष्ट्रीय ऐक्यातूनच शक्य असते असे यशवंतराव सांगतात. आपली मायभूमी, कर्मभूमी, एकच आहे. तिचे संरक्षण करणे, सेवा करणे हे आपले सर्व नागरिकांचे आद्य कर्तव्य आहे त्यासाठी सर्वांनी एकमेकांच्या भावना समजून घेऊन, सुख-दु:खामध्ये सहभागी झाले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने समर्थ राष्ट्र निर्माण होईल असे यशवंतरावांना वाटते.

एकतेचे सामर्थ्य अतिशय बलवान असते हे सांगताना यशवंतराव परकीय आक्रमणाचे उदाहरण देतात. ते म्हणतात, -" चीनने आमच्यावर आक्रमण करताच संबंध देशातील जनता एक मनाने, एक मुठीने या देशाच्या संरक्षणाकरिता उभी राहिली. हा एक नवीन अनुभव आला. हिंदुस्थानच्या एकतेचा हा नवीन अनुभव म्हणजे, तुमच्या आमच्या जीवनातली सगळयात मोठी शक्ती आहे"[36] याच शक्तीच्या जोरावर आपला देश उभा असल्याचे यशवंतराव सांगतात. आज या विचारांची जरूरी खऱ्या अर्थाने देशाला आहे. या विचारांचा आदर्श आजच्या समाजास मार्गदर्शक ठरणारा आहे.

विविधतेतून एकता निर्माण व्हावी असे यशवंतरावांना वाटते. जरी विभिन्न भाषा, स्थळे, स्वभाव असले तरी आपण एकाच देशामध्ये सामावलेलो आहोत ही भावना मनामनात असावी सर्व राज्याचे वेगळेपण ते सांगतात, तरीही ही सर्व राज्य एकच आहेत. निरनिराळया भागांत लोकांच्या बाबतीतही ही विविधता आहे. पण या विविधतेतच खरे सौंदर्य आहे. यातच जीवनाचे सौंदर्य साठलेले आहे. ही विविधता नसेल तर जीवन नीरस व रंगहीन होईल परंतु या विविधतेत महत्वाची बाजू असणे अत्यंत आवश्यक आहे ती म्हणजे 'एकता' असा ऐक्यभाव असेल, तर खऱ्या अर्थाने देश सामर्थ्यवान बनेल. यशवंतराव म्हणतात- " विविधतेने जीवनाला जसे सौंदर्य येते तसे एकतेत जीवनाचे सामर्थ्य प्रतीत होते"[37] या सामर्थ्याच्या शक्तीवर देश स्वतंत्रपणे राहू शकतो. असे त्यांना वाटते.

यशवंतरावांच्या मते एकता टिकविण्यासाठीही एकत्रित येणे जरूरीचे आहे. त्यासाठी त्यागाची भावना प्रत्येक नागरिकांमध्ये असावी लागते तरच समाज निर्माण होतो ते म्हणतात- ''ज्या ज्या गोष्टीमुळे राष्ट्र अधिक एकात्म बनेल, अधिक एकजिनसी बनेल, अशी प्रत्येक गोष्ट करण्यासाठी तुम्ही- आम्ही हिरीरीने पुढे आले पाहिजे. व्यक्ती म्हणून, समाज म्हणून, राज्य म्हणून आणि राष्ट्र म्हणून''[३८] समाजातील प्रत्येक घटकांतून ही एकता प्रस्थापित झाली तरच राष्ट्रीय ऐक्य निर्माण होण्यास मदत होईल असे यशवंतरावांना वाटते.

नवनिर्मित महाराष्ट्र राज्याची एकता आपण अधिक मजबुत केली पाहिजे असे मराठी माणसांना यशवंतराव सांगतात. महाराष्ट्राच्या निर्मितीने मराठी माणूस एकत्र आला आहे. दळणवळणाच्या साधनांनी अंतर कमी झाले असले तरी मनामनातील अंतर कमी व्हावे असे त्यांना वाटते. सामाजिक आर्थिक कामे करत असताना विरोध विधायक असावा तो आंधळा किंवा विरोधासाठी विरोध नसावा. वैयक्तिक व पक्षीय हेवे दावे, मतभेदात येता कामा नयेत असा ऐक्याबाबत विचार यशवंतराव वस्तुनिष्ठ असे मांडतात. महाराष्ट्र हे बंधुभावाने चालावे, विविधतेतून एकता वाढीस लागावी अशी भावना यशवंतराव व्यक्त करतात.

यशवंतरावांच्या एकात्मतेबाब लेखक केशव वसेकर म्हणतात - ''यशवंतरावांच्या विचाराचे एक खास वैशिष्टय म्हणजे एकात्मतेवर त्यांचा अधिक भर आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात त्यांनी अनेक वेळा आपले विचार बोलून दाखविलेले आहेत. संस्कृतीतील एकजिनसीपणा, भाषिक ऐक्य, भौगोलिक एकात्मता आणि मनांना जोडण्यावर ते अधिक भर देतात.''[३९] त्यांच्या विचारांचे मूळ हे सामाजिक ऐक्य साधणे हेच असल्याचे प्रत्ययास येते.

यशवंतरावांच्या भाषणांतून प्रकट झालेल्या सामाजिक विचारामध्ये महत्वाचे वैशिष्ट्य हे की, त्यांनी सामाजिक व्यवस्था ही आधुनिक दृष्टीकोनातून व्हावी, तसेच दीन-दलित यांच्या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे, अस्पृश्यता निवारण करणे आवश्यक आहे, समाजामध्ये समानतेचे तत्व प्रस्थापित व्हावे, शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न व्हावा, संस्कृतीतून समाज निर्माण व्हावा, देशामध्ये ऐक्य भावना वाढीस लागावी असा नव्या समाजरचनेचा विचार त्यांच्या विवेचनातून प्रत्ययास येतो. या सर्वांमध्ये 'माणूस' हा महत्वाचा घटक असल्याचे यशवंतराव सांगतात. या सामाजिक

स्वरूपाच्या विचारांचा आदर्श आजच्या समाजास निश्चितच प्रेरणा आणि दिशा देणारा ठरेल असे वाटते.

यशवंतरावांच्या बाबत लेखक केशव बा. वसेकर म्हणतात- '' राजकारणाचे बोट धरून ते समाजकारण करतात आणि समाजाच्या अडीअडचणी, सुख-दुःखे दूर करण्यासाठी राजकारणाचा ते उपयोग करून घेतात, राजकारणाला वेठीस बांधतात. म्हणजे राजकारण हे साधन व समाजकारण हे साध्य असा त्यांचा याकडे बघण्याचा कल दिसतो''[४०]

प्रसिध्द लेखक तात्यासाहेब केळकर त्यांच्या सामाजिक विचार व कार्याविषयी म्हणतात- '' किर्ती ही समुद्राच्या लाटासारखी आहे. एका लाटेतून दुसरी उठते, दुसरीतून तिसरी उठते व पसरत जाते. अशी महाराष्ट्रात यशवंतरावांच्या कर्तृत्वाची उठलेली लाट पुढे हळूहळू देशात पसरत गेली व त्या लाटेने आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्र समाजास एकात्म व प्रगत करण्याचा सतत प्रयत्न केला''[४१] असे वैविध्यपूर्ण व्यक्तीमत्व आपल्या विचारांतून समृध्द समाज निर्मिती करू पाहत आहे याची जाणीव वारंवार होते.

# ब) यशवंतराव चव्हाणांच्या भाषणांतून आलेले आर्थिक विचार

आर्थिक सुबत्ता हा देशाचा कणा असतो. देशाचा विकास, उन्नती ही आर्थिक पायावर उभी असते. आपला भारत आजही आर्थिक दृष्टया मागासलेला मानला जातो. म्हणूनच देशातील प्रत्येक घटकाने देशाची प्रगती साधण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्नशील राहिले पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळापासून आजपर्यंत देशातील विचारवंत, शास्त्रज्ञ, कलावंत, शेतकरी, व्यापारी, उद्योगपती, राज्यकर्ते यांनी देशाची आर्थिक बाजू सांभाळण्याचा आपापल्या परीने प्रयत्न केला आहे. या सर्वांनी कृती उक्तीतून देशाला आर्थिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. असेच विचारांतून, कृतीतून आर्थिक अधिष्ठान स्व. यशवंतराव चव्हाण यांनीही दिले. आर्थिक सुबत्तेतून समाजाचा सर्वांगिण विकास साधणे हाच मुख्य हेतू यशवंतरावांच्या राजनीतीचा होता.

यशवंतरावांनी कल्याणकारी राज्यव्यवस्था स्विकारली होती. शिवरायांच्या कल्याणकारी राज्याचा आदर्श त्यांच्या समोर होता. सामाजिक विकासाचा निदर्शक म्हणून या राज्याकडे पाहिले जात असे. गतिमान सामाजिक विकासातून समाज जीवनाच्या अगोपांगाना व्यापून टाकले जाते. व्यक्तीचे व्यक्तिमत्व, मन आणि व्यक्तीचे जीवनमान या तीन गोष्टींना या 'आर्थिक' कल्पनेत महत्व दिले जाते. व्यक्तीचे जीवनमान उंचावणे हा आर्थिक विकासाचा महत्वाचा हेतू असतो. कोणत्याही विकासात्मक उपक्रमांमध्ये 'माणूस' हाच विकासाचा लक्ष असावा या मताचे यशवंतराव होते. कारण व्यक्तीचा विकास हा सामाजिक विकासाचा पाया असतो. म्हणून व्यक्तीला महत्व द्यावे लागते. सामाजिक विकासातून राज्याचा देशाचा विकास साधला जातो. भारत हा अविकसित देश म्हणून ओळखला जातो या देशाचा विकास साधण्याचा विचार यशवंतराव अतिशय नियोजनबध्द रित्या करीत असत.

यशवंतरावांनी प्रसंगानुरून केलेल्या भाषणांतून 'आर्थिक' विषयाला अनन्यसाधारण असे महत्व दिलेले होते. देशातील अर्थव्यवस्था, गतिमान आर्थिक विकास, आर्थिक शोषण, आर्थिक सामर्थ्य, प्रशासनातून कल्याणकारी उपक्रम शेतीतून आर्थिक विकास असा विचार त्यांनी मांडला. त्यांनी शेती, मनुष्यबळ, उद्योगधंदे यांना आर्थिकतेत महत्व दिले आहे. भारतासारख्या देशाला नियोजनबध्द आर्थिक विकासाची

गरज आहे. असे त्यांना वाटते या विकासाचे वाटपही समानतेच्या भूमिकेतून व्हावे. असे यशवंतरावांना वाटते. त्यांनी स्वत:च्या राजकीय कारकीर्दीमध्ये अतिशय नियोजनबध्द आर्थिक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. कोणतीही योजना राबवित असताना प्रथम समाज, व्यक्ती यांचा विचार अधिक केलेला दिसून येतो. शासनाने अनेक उपक्रम राबविले असता निश्चितच राज्याचा, देशाचा विकास होत राहतो. याची प्रचिती यशवंतरावांच्या प्रगतशील विचारांवरून कार्यावरून येते. नेत्यांनी घोषणाबाजी करायची आणि कृती मात्र शून्य या वृत्तीची यशवंतरावांना मनस्वी चिड होती. उपलब्ध साधनसंपत्ती आणि प्रशासन यांचा मेळ घालून विकासात्मक योजना त्यांनी राबविल्या. समाज व्यवस्था सुधारणे हा त्यांच्या राजकारणाचा उद्‌देश होता. म्हणून त्यांचे अर्थविषयक विचार हे उद्‌बोधक ठरणारे आहेत.

महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतर स्वतंत्र महाराष्ट्राला सामर्थ्यवान बनविण्यासाठी निश्चित दिशा दाखविण्याचे नियोजनात्मक कार्य यशवंतरावांनी केले. 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर' आणि 'भूमिका' या त्यांच्या भाषणसंग्रहामध्ये प्रसंगानुरूप त्यांनी अर्थविषयक विचार मांडलेले आहेत. यामध्ये 'अविकसित देशाचा आर्थिक विकास', 'औद्योगिक विकासाच्या नव्या दिशा', 'लोकशाहीतील नियोजन', 'विकासाची शर्यत', 'आर्थिक प्रश्नांचे राजकीय स्वरूप', 'पुरोगामी आर्थिक धोरण',' आमचा आर्थिक पवित्रा', 'नाणेसुधारणा व विकसनशील देश', 'नियोजन, मनुष्यबळ व शेती ' इ. लेखांतून यशवंतरावांनी आर्थिक विचारमंथन केल्याचे दिसून येते. यशवंतरावांच्या भाषणांतून त्यांचा आर्थिक पवित्रा सामाजिक दृष्टीकोनातून प्रकट झाल्याचे प्रत्ययास येते. त्यांच्या भाषणांतून प्रकट झालेले आर्थिक विचारांचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

## १) 'माणूस' हाच विकासाचा केंद्रबिंदू :-

'मानव' हाच विकासाचे लक्ष असावा या विचाराशी यशवंतराव ठाम होते. मानवी मनाच्या मूलभूत प्रवृत्तीमध्ये सुहृदयतेला अतिशय महत्वाचे स्थान असते. मानवाच्या सुख-दु:खाशी, भावभावनांशी समरस होऊन त्यांच्या दु:खावर फुंकर घालण्याने त्यांच्या मनावरील ताण कमी होतो. माणसाला सहजीवनाची प्रेरणा देणारी सहृदयता ही एक शक्ती ठरते. अशी शक्ती समाजाला एकसंघ करू शकते. या शक्तीमध्ये देशाला बलवान करण्याचे सामर्थ्य असते. त्यामुळे राजकारणाचे अंतीम उद्‌दिष्ट सर्व मानवजातीचे कल्याण करणे ही भूमिका यशवंतरावांची होती. सहृदयी नेताच जनतेशी एकरूप होऊ

शकतो. मग तो मानव कोणत्याही जातीचा असो, धर्माचा असो अगर पंथाचा असो, श्रीमंत असो वा गरीब असो, उच्च वा नीच असो, स्त्री असो वा पुरूष यामध्ये महत्वाचा 'माणूस' आहे. त्याचे कल्याण साधणे हेच राजकारणाचे संमाजकारणाचे आणि अर्थकारणाचे अंतिम उद्दिष्ट मानले पाहिजे असा विचार यशवंतराव व्यक्त करतात.

स्थानिक राजकारणापासून देशाच्या राजकारणापर्यंत विकास करीत असताना 'मानवी जीवनाचा' विकास हा महत्वाचा यशवंतरावांनी मानला होता. ते म्हणतात- ''विकासाच्या कुठल्याही योजनेमध्ये माणूस हा अत्यंत महत्वाचा भाग आपण मानला पाहिजे. कारण विकास हा जरी विकासाची साधने निर्माण करण्यामुळे मुख्यत: होत असला तरी त्या साधनांचा वापर करणारा जो मनुष्य आहे त्याचा विकास हीच योजनेतील शेवटी फार महत्वाची गोष्ट आहे.''[४२] विकासाचा जास्तीत जास्त लाभ समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींना झाला पाहिजे असा विचार यशवंतराव मांडतात. संपूर्ण भारतीय मानवी समाजाचे कल्याण हे आपले अंतिम ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. आर्थिक विकास हे कल्याणाचे साधन आहे असे त्यांचे मत आहे. हा विकास करण्यासाठी ज्या कुटुंबाचा, गावाचा, भागाचा, प्रदेशाचा, राज्याचा विकास साधावयाचा आहे. त्या त्या ठिकाणच्या स्थानिक साधनांचा विचार त्यांना महत्वाचा वाटतो.

यशवंतरावांनी विकासामागील आपला दृष्टीकोन स्पष्ट करतानाच विकासाचे उद्दिष्टही निश्चित केलेले आढळते. देशाला स्वातंत्र्य मिळून अर्धशतक संपुष्टात आले तरीही गतिमानतेतून विकास अजुनही साधला जात नाही. त्यासाठी मनुष्यबळ अधिक महत्वाचे असल्याचे यशवंतराव सांगतात. मानवी जीवनात सुख-समृध्दी आणण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी कार्यरत राहणे आवश्यक असल्याचे मत ते मांडतात. त्यासाठी प्रत्येकाने मनाशी पक्का निर्धार केला पाहिजे की, '' मी गरीब राहणार नाही, मी उपाशी राहणार नाही, मी कोणाचा लाचार राहणार नाही. मी या देशाचा मालक आहे, मी स्वतंत्र देशाचा मालक आहे. मी लोकशाहीचा मालक आहे. मला या देशामध्ये लोकशाही टिकविली पाहिजे, स्वातंत्र्याची शक्ती मोठी केली पाहिजे, माझे स्वत:चे जे व्यक्तिमत्व आहे, माझे स्वत:चे जे सामर्थ्य आहे. ते मी देशाच्या कामाला लावले पाहिजे त्यासाठी मला जो जो मार्ग मोकळा दिसेल तो तो मार्ग अंगिकारला पाहिजे''[४३] या ध्येयाने प्रेरित होऊन जिद्दिच्या कष्टाच्या जोरावर आर्थिक सुबत्ता निर्माण करणे गरजेचे आहे असा विचार यशवंतराव मांडतात.

आर्थिक विकासामध्ये विशाल मानवतावादी दृष्टीकोन असावा असे यशवंतराव म्हणतात. श्रीमंत गरिब, उच्च-नीच हा भेदभाव नष्ट होऊन मानवतेवर आधारीत समाजप्रणाली प्रस्थापित व्हावी, ग्रामीण भागांतून समाजाचा, व्यक्तीचा विकास व्हावा, असे त्यांना वाटते. मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य या प्राथमिक स्वरूपाच्या गरजा पूर्ण होण्यासाठी धडपड केली पाहिजे. नवनिर्मित समाजामध्ये आर्थिक बंधमुक्ती, समता, सामाजिक व आर्थिक न्याय, शोषणमुक्ती या सकारात्मक भूमिकेतून जनतेचा विकास साधला जावा असे यशवंतरावांना वाटते. ते म्हणतात- ''पिढयानपिढया आमच्या मानगुटीवर बसलेले हे गरिबीचे भूत उठले पाहिजे. जातींच्या धर्मांच्या वेडाने आम्ही दबून गेलेलो, तुटलेलो, फाटलेलो असे लोक आहोत. आमची ही दबलेली, तुटलेली, फाटलेली मने बांधली जाऊन एक बनली पाहिजेत. हिंदुस्थान हा सुखा समाधानाने, कर्तृत्वाने आणि वैभवाने नांदणारा असा एक नवा समाज बनावा, एकजिनसी समाज बनावा'' [४४] असे समाजवादी चित्र यशवंतरावांच्या डोळयासमोर होते. नवीन समाजाची निर्मिती करण्यासाठी स्वयंप्रेरणेने, स्वबळावर आणि स्वकष्टाने त्यांनी प्रयत्न केल्याचे त्यांच्या कार्यावरून प्रत्ययास येते. आणि तेच त्यांनी आपल्या विचारांतूनही प्रगट केलेले आहे.

यशवंतरावांनी शरीरातील रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत मानवतावादी कास धरण्याचे वचन दिलेले होते. त्या वचनपूर्तीसाठी ते सतत जागरूक राहिले. समाजातील उपेक्षीत व्यक्तींकडे अधिक लक्ष देऊन त्यांना प्रथम शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे, तसेच त्यांच्या जीवनामध्ये अत्यावश्यक सुविधा त्यांना लाभल्या पाहिजेत असे ते म्हणतात. त्यांच्या मते - ''एकमेकांच्या वैरानं बसलेले, दारिद्रयात निराश झालेले, आजपर्यंत एकसारखा कुणीतरी आपल्यावरती अन्याय केला या भावनेने इतरांकडे संशयांनं पाहणारे असे गांव वसण्यापेक्षा, एकमेकांकडं सहृदयतेने मदत करण्याच्या भावनेने पाहणारा बंधु- बंधुचा असा एक निराळा समाज खेड्यातून आपल्याला उभा करावयाचा आहे.'' [४५] त्यासाठी सर्वांनी एकत्रितरित्या संघटीत होऊन कार्य केले पाहिजे असे यशवंतरावांना वाटते.

यशवंतरावांनी मानवाच्या कल्याणासाठी शासनाचा निधी खर्ची व्हावा हा विचार नमूद करताना त्यामध्ये भ्रष्टाचार होऊ नये असे त्यांना वाटते. असा उदारमतवादी, समाजवादी अन मानवतावादी यशवंतरावांच्या आर्थिक विकासामागे दृष्टीकोन होता. याबाबत डॉ. शिवाजी चव्हाण म्हणतात - '' लोककल्याणकारी राज्यात प्रथम

माणसाच्या व्यक्तिमत्व विकासाला प्राधान्य द्यावे लागते. त्याचे साधन असते शिक्षण. त्यानंतर हया विकासाच्या कार्यक्रमात व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या आर्थिक विकासांचा विचार महत्वाचा ठरतो. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य निर्मिती बरोबरच त्यांच्या आर्थिक विकासाबाबतही शिक्षणाप्रमाणेच अत्यंत मूलगामी आर्थिक विकासाचे साधन, विकासाचे परिणाम म्हणून सहकारी तत्वावरील आर्थिक विकासाचा विचार केलेला आढळतो.''[४६] यावरूनच यशवंतरावांचा आर्थिक विकासातील मानवतावादी दृष्टीकोन किती दृढ होता हे दिसून येते. आधुनिक भारताच्या उभारणीसाठी त्यांनी दिलेले योगदान म्हणजे मराठी मातीने त्यांना दाखविलेला मानवसेवेचा दीपस्तंभ होता. आजच्या दुभंगलेल्या भारतीय समाजव्यवस्थेला सांधण्यासाठी या दीपस्तंभाच्या प्रकाशात रस्ता सापडू शकेल असा विश्वास वाटतो.

## २) आर्थिक सुबत्ता हाच देशाचा कणा :-

आर्थिक सुबत्ता हा देशाचा 'कणा' असतो, तो मजबूत करण्यासाठी यशवंतराव काही मूलगामी स्वरूपाचे विचार मांडतात. याबाबत त्यांनी काही महत्वाच्या बाबी सांगितल्या आहेत. कोणा एका व्यक्तिचे वा संस्थेचे हे काम नाही. संघटीतरित्या हे कार्य होणे गरजेचे ते मानतात. आर्थिक स्थिती मजबूत करावयाची असेल तर प्रत्येक नागरिकाने सतर्क राहिले पाहिजे. ते म्हणतात- ''वैयक्तिक जीवनामध्ये जशी आपण प्रगती करतो तशीच ती सार्वजनिक जीवनामध्येही करावयाची असते. राज्यकारभारामध्ये सुधारणा व प्रगती करण्याचे ठरवून तुम्ही आणि मी जर काम करणार असलो, तरी आत्मसंशोधनाची आत्मटीकेची आपल्याला फार जरूरी आहे.''[४७] असा वैयक्तिक धंदा, व्यवसाय यातून देशाच्या अर्थव्यवस्थेत भर पडू शकते तो धंदा प्रत्येकांनी आपआपल्या परिने केला पाहिजे असे त्यांना वाटते.

संमीश्र अर्थव्यवस्थेचे धोरण स्विकारले तर निश्चितच अधिक मजबूत अर्थव्यवस्था होऊ शकते असे यशवंतरावांना वाटते. योजनेच्या निर्मात्यांनी या संमीश्र योजनेची उभारणी करताना अर्थरचनेत सहकारी क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र अशा विभागात केली तर सहकारी क्षेत्राची वाढ अधिक होत आहे हे लक्षात येते. स्थानिक पातळीवर साधनांचा वापर करणे आवश्यक असल्याचे ते सांगतात . सामाजिक आणि आर्थिक विकासामुळे निर्माण होणारी शक्ती हीच लोकशाही व प्रशासन यांची प्रेरक शक्ती आहे. या शक्तीला जोपासण्यासाठी राज्यकारभार कार्यक्षम आणि अतिशय प्रामाणिकपणे केला

पाहिजे. जनतेचे कल्याण, समाधान लक्षात घेऊन ध्येयधोरणे राबवावीत असे यशवंतरावांना वाटते.

राष्ट्राच्या उन्नतीवर देशाचे संवर्धन, संरक्षण अवलंबून असते. जागतिक पातळीवर देशाचे अस्तित्व कायम ठेवण्यासाठी आपल्या देशाची आर्थिक बाजू मजबूतच असणे आवश्यक आहे. समाजाच्या सर्व घटकांना विकासाची सर्व दारे उघडी करणे, दुबळयांना सबळ करणे, श्रमणाऱ्या कष्टकरी जनतेच्या परिश्रमास फळ मिळवून देणे इ. महत्वाची कामे शासनाला करावयाची असल्याचे ते सांगतात. भारत हा अविकसित देश असल्यामुळे प्रामुख्याने देशात भांडवल उभे करणे अवघड आहे. मनुष्यबळ हीच खरी या देशाची संपत्ती हे अर्धसत्य असल्याचे ते सांगतात. त्यासाठी प्रामुख्याने शेती, मनुष्यबळ, नागरीकरण आणि औद्योगिकरण इ. प्रश्नांची यशवंतराव चर्चा करतात. भारतासारख्या अविकसित देशाच्या दृष्टीने हे अत्यंत महत्वाचे प्रश्न असल्याचे ते सांगतात. लोकसंख्येचा प्रश्न जेथे भेडसावत असतो तेथे अन्न धान्याचा प्रश्न सतावत असतो, हे भारताच्या अनुभवाने ते सांगतात. या संदर्भात ते म्हणतात- '' आज वस्तुस्थिती अशी आहे की, सधन देश अधिक सधन व अधिक प्रगत होत असून, गरीब देशांचा विकास त्यांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे एक तर थांबला आहे किंवा तो अतिशय मंदगतिने होत आहे. प्रगत आणि अविकसित देशामध्ये ही जी विषमता आहे, ती कमी करण्याच्या दृष्टीने उपाय शोधून काढणे हीच आजची खरी गरज आहे.''[४८] त्यासाठी विकसित देश आणि अविकसित देश यांच्यामध्ये समानता आणणे गरजेचे असल्याचे यशवंतराव सांगतात.

### ३) विकासात्मक नियोजनातून राष्ट्राची उन्नती :-

आर्थिक सामाजिक किंवा राजकीय परिस्थिती कशीही असली तरी एखाद्या देशास नियोजनाचे महत्त्व न समजल्यास त्याला आर्थिक प्रगती करणे अशक्य असल्याचे ते सांगतात. ते म्हणतात- '' एखाद्या देशाची आर्थिक , सामाजिक किंवा राजकीय पध्दती कोणती का असेना, आर्थिक विकासातील नियोजनाचे महत्व त्या देशाला कळले नसेल तर त्याला आर्थिक क्षेत्रात प्रगति करणे फार अवघड होऊन जाईल .''[४९] नियोजनाचे अनन्यसाधारण महत्व विकासाच्या क्षेत्रामध्ये असल्याचे यशवंतराव सांगतात. आपले कुटुंब गाव, समाज, राष्ट्र यांचा प्रगतीची भव्य इमारत उभी करायची असेल तर ती

लोकशाही, नियोजन व समाजवाद या तीन स्तंभावर उभी राहते. हीच विकासाची त्रिसुत्री असल्याचे यशवंतराव सांगतात.

अविकसित राष्ट्रांना आर्थिक प्रगती करताना तर नियोजनाचे अधिक महत्व असते. भारताने हे उदाहरण घालून दिले आहे. दोन पंचवार्षिक योजना पूर्ण करून भारत तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या उंबरठ्यावर उभा असल्याचे १९६१ मध्ये यशवंतराव अर्थतज्ञांना सांगतात. ते म्हणतात- '' भारतासारख्या अविकसित देशाला आर्थिक नियोजनाचे हे कार्य प्रचंड स्वरूपाचे वाटत असले तरी नियोजनाची आखणी व अमंल बजावंणी करण्याचे कार्य त्यांनी अंगावर घेतले आहे. त्यांच्या दृष्टीने तो एक प्रकारचा रोमहर्षक असाच अनुभव आहे.'',[५०] यातून आर्थिक विकासास निश्चित अशी दिशा मिळते असा विचार यशवंतराव मांडतात. परंतु विकासाचे नियोजन केल्यानंतर ती कामे पूर्ण केली आहेत की नाही हे पाहणे अत्यावश्यक असल्याचे ते सांगतात. कारण राज्यकर्ते अनेक कामांची घोषणा फक्त करतात. मात्र प्रत्यक्षात त्या घोषणाच राहतात. त्यासाठी कामाची पाहणी करणे, त्याबाबत एकत्र येऊन चर्चा करणे, काही निर्णय घेणे ते निर्णय कृतीत आणणे महत्वाचे असल्याचे यशवंतराव सांगतात. विकासाच्या क्षेत्रांत ज्या प्रमाणे झालेल्या कार्यांची पाहणी व अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेची आवश्यकता असते. त्या प्रमाणेच योजनांची तयारी करून उद्दिष्टांचा तपशील ठरविण्या करीताही स्वतंत्र यंत्रणेची अधिक गरज असल्याचे ते सांगतात.

यशवंतरावांनी विकास कार्यात पक्ष किंवा जात, वर्ग किंवा धर्म या गोष्टींचा विचार गौण मानला आहे. उदा. युती सरकारचा 'एनरॉन प्रकल्प' किंवा मंडल आयोगांची विकासकामे ही पक्षीय, जातीय विचारांमुळे अयशस्वी ठरली, कोटयावधी रूपयांचे नुकसान देशाला सहन करावे लागले. त्यामुळे आर्थिक विकास कार्यामध्ये देशाच्या, समाजाच्या, व्यक्तीच्या विकासात्मक दृष्टीकोनातून निर्णय घेणे हिताचे ठरेल. असे यशवंतरावांना वाटते. शासकीय कार्याइतकेच किंबहुना त्यापेक्षा अधिक सामाजिक कार्यावर भर द्यावा असे प्रतिपादन यशवंतराव करतात. 'मानव' हाच नियोजनाचा केंद्रबिंदु असतो, आपल्या नियोजनाची नैतिक बाजू महत्वाची असते. मागासलेल्या आपल्या देशामध्ये आजही अनेक सुविधापांसून जनता वंचित आहे. त्यासाठी समाजातील सर्वच घटकांनी म्हणजेच शासन, सहकारी संस्था, व्यापारी वर्ग, शेतकरी वर्ग, नागरिक यांनी एकत्र येऊन आर्थिक विकासाबाबत कृतीशीलतेचे तत्व अंगीकारले पाहिजे असे त्यांना वाटते.

यशवंतरावांनी नियोजनात्मक विकासकामे करीत असताना महत्वाची जबाबदारी शासनयंत्रणेची असल्याचे सांगितले आहे. त्यासाठी योग्य प्रशासनाची व कार्यक्षमतेची जरूरी असते. अतिशय प्रामाणिक, निष्ठावान अन् कर्तव्यदक्ष प्रशासन असणे आवश्यक आहे. उत्तम आणि चोख अशी प्रशासन यंत्रणा असावी असा विचार यशवंतराव मांडतात. प्रशासन यंत्रणेपुढे राज्यकारभार करताना जे जे प्रश्न उद्भवतील ते ते सोडविणे यालाच योजनाबध्द कारभार म्हणता येईल. असा आदर्श राज्यकारभार करावा असे ते सांगतात. यशवंतराव आदर्श राज्यकारभाराच्या कसोट्या सांगतात. या सर्वांच्या नियोजन बध्द ध्येयधोरणांतून आर्थिक विकास साधला जावा असा अर्थविषयक दृष्टीकोन आपल्या विचारातून ते व्यक्त करतात.

## ४) आर्थिक प्रश्नांचे राजकीय स्वरूप :-

यशवंतराव विकास म्हणजे नेमके काय हे सांगताना ते म्हणतात - " विकास म्हणजे तरी काय? विकास याचा अर्थ प्रथमत: आपल्या गरजा भागविण्यासाठी आपल्या अर्थव्यवस्थेची माल आणि साधनांची उत्पादनक्षमता तयार करणे. त्याचप्रमाणे लोकांच्या कल्याणासाठी व समाधानासाठी जरूर ती साधनसामुग्री उपलब्ध करून देणे होय. अशा तऱ्हेचे स्वयंपूर्णता हे विकासाचे अपरिहार्य ध्येय ठरते."[३१] हे ध्येय गाठण्यासाठी आणि विकसित राष्ट्र बनविण्यासाठी प्रथमत: आर्थिक प्रश्नांचे स्वरूप समजावून घेऊन अंमलबजावणी करणे आणि यामध्ये राजकीय पातळीवरून प्रयत्न होणे हेच खऱ्या अर्थाने आवश्यक असल्याचे प्रतिपादन यशवंतराव करतात.

प्रशासन हे नेहमी सामान्य माणसाकरिता असले पाहिजे असे यशवंतराव म्हणतात. कोणताही आर्थिक प्रश्न हाताळीत असताना आपण मनुष्य मात्रांना हाताळीत असतो ही जाणीव प्रशासनाला असली पाहिजे. राजकीय पार्श्वभूमीवर आर्थिक धोरण राबविताना आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी राज्यकर्त्यांनी जे मुलभूत प्रश्न आहेत, त्यांच्याकडे अधिक लक्ष देवून जनतेचा विकास केला पाहिजे असे ते म्हणतात. त्यांच्या मते राज्यकर्ते आणि प्रशासक म्हणून आपण निर्जीव वस्तुंवर राज्य चालवीत नसतो, तर गतिमान सामाजिक घटना आपणच हाताळवयाच्या असतात, मानवी प्राण्यांचे प्रश्न सोडवायचे असतात. याची जाणीव यशवंतराव करून देतात. यासाठी प्रामुख्याने आर्थिक प्रश्न हाताळण्याचे ते दोन मार्ग सांगतात. विशिष्ट पध्दतीने आकडेवारी गोळा करणे, भांडवल गुंतविण्याच्या बाबतीत शास्त्रशुध्द रीतीने अग्रक्रम ठरविणे, विकासाची

गती निश्चित करणे आणि अशा रीतीने प्रश्नांचे उत्तर मिळाल्याचे आपल्या सद्सद्विवेक बुध्दिला सांगणे आणि दुसरा मार्ग म्हणजे आपल्या भोवतीच्या प्रश्नांची सविस्तर पाहणी करून त्यातील कोणते प्रश्न आपण सोडविले आहेत याची तपासणी करणे हा होय. या पध्दतीने जर प्रशासनाने आर्थिक प्रश्न हाताळले तर निश्चितच आपले ध्येय साध्य होईल, असे यशवंतरावांना वाटते.

आर्थिक सामर्थ्य हे राजकीय सामर्थ्यापेक्षा बलवान असते असे यशवंतराव म्हणतात. सरकार चांगले असून चालत नाही तर आर्थिक तोडगे काढून ते कृतीत आणले पाहिजे. समाज उपयोगी योजना, छोटे मोठे उद्योगधंदे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची मदत, यातून उत्पादनक्षमता वाढविली जावी असे ते सांगतात. साधने हातात असतील तर आर्थिक प्रश्न सुटू शकतात म्हणून राज्यकर्त्यांनी प्रथम साधने उपलब्ध करावीत त्याच्या सहाय्याने आर्थिक प्रश्न सोडवावेत असा विचार यशवंतराव मांडतात. खऱ्या अर्थाने आर्थिक प्रश्नांचे राजकीय स्वरूप हे कृतीयुक्त विकासकामे करणे होय असे ते म्हणतात. '' आपल्याला जनतेची सेवा करावयाची आहे. ती अधिकारावर असलेल्या सरकारच्या कार्यक्रमामार्फत करावयाची आहे. याचसाठी सरकारच्या धोरणांच्या बाबतीत तुमची संपूर्ण निष्ठा असावी.''[१२] अशी अपेक्षा यशवंतराव ठेवतात. म्हणजेच राजकीय पातळीवर आर्थिक प्रश्न सोडवावेत असा विचार यशवंतराव व्यक्त करतात.

राजकारणाचे स्वरूप हे समाजकारणाचे असावे. त्यातून लोककल्याण, समाजकल्याण करण्याचा प्रयत्न राज्यकर्त्यांनी करावा, जनतेची सेवा ही परमेश्वराची सेवा मानावी हे सांगताना यशवंतराव राज्यकर्त्यांनी नेमके काय करावे हे सांगतात- ''हिंदुस्थानात अजून उघडी-नागडी हिंडणारी गरिबी ही जर अशीच हिंडत राहणार असेल तर या स्वातंत्र्याला आणि आज आपण करीत असलेल्या प्रयत्नांना काहीच अर्थ राहणार नाही. आम्हाला ही गरिबी हटविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मनाची गुलामगिरी हटविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्या समाजामध्ये प्रत्येक मनुष्य स्वाभिमानाने आपली उंच मान करून निर्भयपणे वावरू शकेल, त्याला पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळेल, त्याला आपल्या बुध्दिचा आणि शीलाचा विकास करण्याची संधी मिळेल अशा प्रकारचा समाज आपल्याला निर्माण करावयाचा आहे.''[१३] राजकीय नेत्यांनी या दृष्टीकोनातून कार्य करावे आणि देशाचे अर्थकारण मजबूत करावे तरच समाजात आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल असा विचार यशवंतराव व्यक्त करतात.

५) आर्थिक समानता :-

यशवंतराव समाजातील आर्थिक विषमता कमी करून समानता प्रस्थापित व्हावी असा विचार मांडतात. त्यासाठी आर्थिक पुनर्रचनेची गरज आहे. देशामध्ये एका बाजूला श्रीमंत आणि दुसऱ्या बाजूला गरीब वर्ग अशी आर्थिक विषमता दिसून येते. भांडवलदार आणि मजूर, यांच्यातील आर्थिक दरी भरून काढण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रित येऊन प्रयत्न केले पाहिजेत असा विचार ते मांडतात. देशातील गरिबी कमी करण्यासाठी ते म्हणतात-" आर्थिक विकासाच्या या कार्यात करोडो लोकांचा सहभाग निर्माण करावा लागणार आहे. कारण या करोडो हातांच्या परिश्रमातून, त्यागातून आणि सहकार्यातून देशाची गरिबी हंटवता येणार आहे. दारिद्र्या विरूध्दची लढाई जिंकायची आहे. करोडो लोकांनी एकजुटीने आणि जिद्दीने दिलेल्या लढ्यामुळेच स्वातंत्र्य मिळविणे शक्य झाले आहे. दारिद्र्याविरूध्दचा लढाही असाच राष्ट्रीय दृष्टीकोणातून व प्रदीर्घ परिश्रम करून आणि वर्षानुवर्षे संघटित प्रयत्न करूनच सोडवायचा आहे."[३४] विकासाच्या गतीमान वाढीतून देशाची अर्थव्यवस्था वाढीस लागेल, अन् गरिबी थोड्याफार प्रमाणात कमी होईल असे यशवंतरावांना वाटते.

अर्थव्यवस्थेमध्ये समन्वय साधावयाच्या दृष्टीकोणातून उत्पन्नाचा समान वाटा प्रत्येक नागरिकाला मिळावा असा विचार यशवंतराव व्यक्त करतात. त्यांच्यामते - "विकासाच्या लाभाचे न्यायोचित वाटप झाले पाहिजे, अशी दक्षता घेऊन राष्ट्रीय धोरण आम्ही आखले पाहिजे. विकसनशील अर्थव्यवस्थेत सामाजिक संघर्ष अधिक सुलभतेने मिटविता येतात अशी माझी धारणा आहे."[३५] शासनाने कोणताही भेदभाव न ठेवता समाजाच्या सर्व घटकांना विकासाची सर्व दारे उघडी ठेवली पाहिजेत. आर्थिक दुर्बलांना सबळ करणारे शासन असावे असे ते म्हणतात. विकासात सामाजिक न्यायाचा तराजू हातात घेऊन यशवंतरावांनी विकासाचा आराखडा तयार करण्याचा निश्चय केला होता. यातून त्यांना सामाजिक एकात्मता साधावयाची होती. औद्योगिक क्षेत्रातही विकास साधताना कामागारांना न्याय मिळाला पाहिजे व उद्योगधंद्यांची वाढ झाली पाहिजे अशी भूमिका त्यांनी घेतली होती. सर्व सामान्य घटकांचा सर्वांगीण विकास आणि सामाजिक न्याय प्राप्त करून देण्यासाठी शासनयंत्रणाही त्याच मनोवृत्तीने साथ देणारी असावी लागते. असा विचार यशवंतराव व्यक्त करतात.

अशा रीतीने यशवंतरावांनी कल्याणकारी राज्यातील विकासाची विधायक भूमिका मांडलेली होती. अविकसित देशाच्या किंवा राज्याच्या विकासात सामाजिक एकात्मता आणि सामाजिक न्यायाचा दृष्टीकोन असेल याची ग्वाही दिली होती. ग्रामीण जनतेने या दृष्टीनेच विचार करून त्यांना जर योग्य न्याय मिळत नसेल तर शासना विरूध्द बंड पुकारले पाहिजे असाही सल्ला यशवंतराव देतात. कारण उत्पादनाच्या समान वाटपाची व्यवस्था झाली नाही तर विकासाचा रथ रूतून बसतो असे ते सांगतात. महाराष्ट्रात आज सर्वत्र नैराश्य आणि विफलता माणसाला ग्रासून राहिली आहे. यातून जनतेला बाहेर काढून प्रोत्साहन दिले पाहिजे आणि विकासाची समान संधी व सामाजिक न्यायाची ग्वाही त्यांना दिली पाहिजे असा सामाजिक दृष्टीकोन यशवंतराव व्यक्त करतात.

## ६) 'शेती' आर्थिक विकासाचा आत्मा :-

भारत हा शेतीप्रधान देश आहे. जवळ जवळ ८०% लोक शेतीव्यवसाय करतात पारंपारिक शेती व्यवसायामुळे शेतीचे उत्पन्न घटल्याचे दिसून येते. त्यासाठी शेतीचे आधुनिकीकरण करून उत्पन्न वाढविले पाहिजे असा विचार यशवंतराव मांडतात.ते म्हणतात- '' शेतीचा धंदा हा एक प्रमुख व महत्वाचा धंदा आहे. परंतु ज्यांना दुसरे कांही करता येत नाही अशांचा हा धंदा आहे. तो अडाणी लोकांचा, सामान्य लोकांचा धंदा आहे. असे समजले जाते हे मोठे दुर्दैव आहे. या समजूतीमुळेच आम्ही आमची आर्थिक आत्महत्या करून घेतली आहे.''[१६] अशी शेतीची अवस्था असल्याचे ते सांगतात. म्हणून प्रथम शेतीसाठी कॅनॉल, तलाव, धरणे यांच्या माध्यमातून पाणी उपलब्ध करून देणे, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना देणे त्यांच्यापर्यंत पोहचून त्यांच्या समस्या, अडचणी यांवरती उपाययोजना करणे, त्यांना प्रगत बियाणे, औषधे याची माहिती देणे, त्याचा पुरवठा करणे, त्यांच्या मालाला सहकारी बाजारपेठ मिळवून देणे, यासाठी वेगळा निधी उभा करणे इ. कामे प्रशासनाने जाणीवपूर्वक केली तर निश्चितच शेतीचे उत्पन्न वाढेल आणि याचा फायदा राज्याला, देशाला होईल असे यशवंतराव म्हणतात.

नियोजनबध्द विकास कार्यक्रम प्रशासनाच्या समोर असावा अशी भूमिका यशवंतराव मांडतात. शेतीच्या विकासाबाबत यशवंतराव म्हणतात- '' शेतीच्या विकासाची स्थूलमानाने दोन अंगे आहेत. एक म्हणजे शेतीच्या म्हणजे पर्यायाने पीक

लागवडीच्या पध्दतीची सुधारणा व दुसरे म्हणजे जमिन विषयक सुधारणा, पाहिले अंग तांत्रिक स्वरूपाचे तर दुसऱ्याचे स्वरूप आर्थिक तसेच सामाजिक आहे.''[४७] या पध्दतीने शेतीचा विकास व्हावा असे मत यशवंतरावांचे होते. व्यापारी वर्गांकडून शेतकऱ्याची होणारी पिळवणूक, फसवणूक थांबविण्यासाठी समाजवादी तत्वावर शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून द्यावा असे ते म्हणतात . आपण ज्या शक्तिमान नवसमाजाची उभारणी करू इच्छितो त्या समाजाचा, शेतांत, कष्ट करणारा, राबणारा शेतकरी समाज हा जणू 'कणाच' आहे . याची जाणीव यशवंतराव करून देतात.

शेती व्यवसायाला जोडून छोट्या- मोठ्या उद्योगधंद्याची निर्मिती झाली तर खेडयांचाही विकास होईल आणि शहरांकडे 'धाव घेण्याची वृत्ती कमी होईल असे यशवंतरावांना वाटते. कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, हस्तव्यवसाय, सुतकाम, विणकाम, मातकाम इ. लघुउद्योगांतून खेड्यांची प्रगती होईल यातून खेडी स्वयंपूर्ण करण्याचा विचार यशवंतरावांचा दिसून येतो. 'शेती की उद्योग' असा विरोध द्वंद्व समास नसून या दोहोची सांगड घातली पाहिजे असेही ते सांगतात. , मार्क्सवादी तत्व यशवंतरांवानी स्विकारल्याचे दिसून येते.

असा शेती हाच ग्रामीण विकासाचा गाभा असल्याचा विचार यशवंतराव मांडतात. या गाभ्याभोवती छोट्या मोठ्या उद्योगधंद्याची इमारत उभी केली पाहिजे, तांत्रिक बाबींचा वापर या व्यवसायांमध्ये केला तर निश्चितच ग्रामीण भागाचा विकास होईल. यशवंतरावांनी शेतीच्या तांत्रिक अंगाने जो विकास करण्याची गरज व महत्व आहे त्याची मांडणी केली आहे. त्यामागील त्यांची तळमळ आंतरिक उमाळ्याची परिणती आहे.

## ७) औद्योगिकरणातून प्रगतीची पावले :-

देशाचा आर्थिक विकास आपणास द्रुतगतीने आणि भक्कम उभा करायचा असेल तर त्यासाठी औद्योगिकीकरण करणे अधिक महत्वाचे असल्याचे यशवंतराव सांगतात. समाज व्यवस्थेचा पाया घालण्यासाठी प्रथम ग्रामीण भागात उद्योगधंदे काढून ग्रामीण जीवनाशी ते एकजीव करावयाचे आणि शेती व ग्रामीण उद्योगधंदे यांची सांगड घालावयाची असे ते प्रतिपादन करतात. ग्रामीण भागात शेतीमालावर प्रक्रिया करण्यासाठी उद्योगधंदे काढले तर शेतकऱ्यांची शहरी भागातील वाहतूक, परिश्रम वाचेल आणि त्यांना रोजगाराचे साधन मिळेल असे यशवंतरावांना वाटते.

मनुष्यबळ ही महाराष्ट्राची अतिशय चांगली साधनसंपत्ती असल्याचे ते सांगतात. या साधनसंपत्तीच्या बळावर अनेक कामे करता येतात. औद्योगिकरणाचा वेग वाढविता येतो, उत्पादन प्रक्रियेत वाढ करता येते, त्यांच्या बौध्दिक क्षमतेचा वापर करून नवनवीन तंत्रज्ञानाचा शोध लावता येतो यातून निश्चितच फायदा होतो. सरकारने औद्योगिक विकासाचा जो 'मास्टर प्लॅन' तयार केलेला आहे. त्यातून कोण-कोणत्या भागात कोणत्या उद्योगधंद्याचा विकास होऊ शकेल यासंबंधी मार्गदर्शन केलेले आहे. या संदर्भात यशवंतराव म्हणतात- '' गेल्या दहा वर्षात देशांतील इतर राज्यांच्या मानाने आपली प्रगती अगदीच यथातथा झाली असल्यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झालेली आहे. म्हणून जे भाग अद्यापि मागासलेले म्हणून ओळखले जातात त्या भागात उद्योगधंदे काढून औद्योगीकरणाचे क्षेत्र वाढविणे अगत्याचे ठरते ''[५८] अशा विचाराचे यशवंतराव अतिशय सखोल विचार करून उद्योगधंद्याविषयीचे महत्व प्रतिपादन करतात.

शहरी भागातील उद्योगांसंबंधी ते बोलताना भौगोलिक कारणांमुळे उद्योगधंद्याच्या वाढीस मर्यादा पडत असल्याचे सांगतात. तरीही ज्या-ज्या ठिकाणी जमीन, पाणी, वीज आणि कच्चा माल या गोष्टी जेथे उपलब्ध होऊ शकतील त्या ठिकाणी नवीन उद्योगधंदे उभा करावेत असे सांगतात . उत्पन्नाबाबत ते सांगतात की, या उत्पन्नाला परदेशीय बाजारपेठ मिळवून दिली पाहिजे. तसेच परदेशी साधनसामुग्रीही मिळवून देणे गरजेचे असल्याचे ते सांगतात.

अशा रीतीने यशवंतरावांनी औद्योगिकरणातून आर्थिक प्रगतीची पावले उचलण्यास सांगितल्याचे दिसून येते.

## समारोप :-

यशवंतरावांनी अर्थविषयक मांडलेले विचार निश्चितच एका विधायक दृष्टीकोनातून मांडले असल्याचे दिसून येते. आर्थिक विकास हा विकसनशील देशाचे जिवंतपणाचे लक्षण होय. या विकासामध्ये 'मानव' हा केंद्रबिंदू ठेवून योजना राबवाव्या लागतात . शेती, उद्योगधंदे, सहकार, शिक्षण यातून उत्पादन वाढवित असताना यामध्ये प्रशासनाची भूमिका अतिशय महत्वाची असते. चोख प्रशासन हेच आर्थिक विकासाचे अधिष्ठान म्हणता येईल. देशाला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी आजच्या राजकारणास, समाजकारणास आणि अर्थकारणास यशवंतरावांचे हे विचार आदर्शवत ठरणारे आहेत. महाराष्ट्र समृध्द आणि संपन्न बनविण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र आले

पाहिजे आणि प्रगतीची दारे खुली करावीत तरच विकसित राष्ट्र म्हणून आपला देश ओळखला जाईल. महाराष्ट्राने उद्योगधंद्याच्या निकडीची गरज लक्षात घे ऊन नियोजन केले तरच महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य बनेल. त्यासाठी यशवंतरावांच्या विचाराची आज गरज आहे असे मला वाटते.

या संदर्भात विठ्ठलराव पाटील आपल्या ' महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण' या ग्रंथात म्हणतात- ''यशवंतरावांना महाराष्ट्राचे आधुनिक शिल्पकार म्हणतात याचे कारण महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा पाया त्यांनी घातला. कृषी, औद्योगिक रचनेबरोबर समाजाच्या सांस्कृतिक परिवर्तनासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. बहुजन समाज सर्वार्थाने प्रगत व्हावं अशी त्यांची धारणा होती.''[११]

समाज हा आर्थिक सामाजिक दृष्टया प्रगत व्हावा हाच दृष्टीकोन यशवंतरावांच्या विचारांमध्ये दिसून येतो.

# क) यशवंतराव चव्हाणांच्या भाषणांतून आलेले शैक्षणिक विचार

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे. शिक्षणातून व्यक्ती, समाज आणि देश यांची जडणघडण होत असते. समाजाच्या पुर्नबांधणीचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. शिक्षणातून केवळ साक्षरता निर्माण करावयाची नाही तर त्यातून सुसंस्कृत 'माणूस' निर्माण करावयाचा असतो. मनुष्याची बुध्दी, हृदय व भावना यांच्या विकासालाच शिक्षण म्हटले जाते. माणसाने माणूस बनावे, माणसासारखे जगावे या गोष्टींचा अर्थ समजून सांगण्याचे कार्य शिक्षणाचे असते. शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्व यशवंतरावांनीही सांगितले आहे. शिक्षणाने वैचारिक प्रगल्भता येते, व्यक्तिमत्व विकास होतो, नीतीमूल्यांची जोपासना होते, जीवनाचे तत्वज्ञान समजते, जीवनाचा अन्वयार्थ लावता येतो असे मत यशवंतराव मांडतात.

ज्ञानार्जन म्हणजे शिक्षण नव्हे असे सांगून शिक्षणाचा मानवी जीवनाशी अतिशय जवळचा संबंध असल्याचे यशवंतराव सांगतात. 'मानवाचा' विकास हा शिक्षणाचा हेतू आहे. मानवाच्या सुप्त गुणांना वाव शिक्षणामुळे मिळत असतो. हे सांगताना शिक्षणातून समाजपरिवर्तन होत असल्याचेही ते सांगतात. ग्रामीण भागाचा विकास हा शिक्षणातून होत असतो. तसेच नवतरूणांना दिशा देण्याचे कार्य शिक्षण करीत असते. समाजातील अज्ञान, अंधःश्रध्दा, जातीयता, आर्थिक, सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी शिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण असल्याचा विचार यशवंतराव व्यक्त करतात. संस्कृतीचे संवर्धन, समाजातील अनिष्ट प्रवृत्तींना प्रतिबंध, नीतीमूल्यांची रूजवणूक, सर्वधर्म-समभावाचे तत्व, हक्क आणि कर्तव्यांची जाणीव, संवेदनशीलता, स्वांतत्र्य, समता, बंधुता या तत्वांची जोपासना, ज्ञान- विज्ञान क्षेत्रातील माहिती इ. गोष्टी शिक्षणांमुळे साध्य होतात असा विचार यशवंतराव मांडतात.

यशवंतरावांच्या 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर' आणि 'भूमिका' या भाषणसंग्रहामधील भाषणांतून शैक्षणिक विचार प्रकट झालेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने 'ग्रामीण शिक्षणाची माझी कल्पना', 'नवपदवीधरांकडून अपेक्षा', 'माध्यमिक शिक्षणाचे महत्व', 'लोकभाषा हीच ज्ञानभाषा', 'अमृताचे कुंभ', 'तरूणांपुढील कार्याची दिशा', 'समाजाभिमुख शिक्षण' या लेखांमध्ये यांच्या शिक्षणविषयक दृष्टीकोन दिसून येतो.

शिक्षणातून मानव, समाज आणि देश यांचा उत्कर्ष साधण्याचा विचार यशवंतरावांनी व्यक्त केला आहे. यशवंतरावांच्या भाषणातून प्रकट झालेले शैक्षणिक विचारांचे स्वरूप पुढील प्रमाणे सांगता येईल.

### १) यशवंतराव प्रणित शिक्षणाची संकल्पना :-

यशवंतरावांनी शिक्षणाचा व्यापक अर्थ सांगितला आहे. 'ज्ञान मिळविणे म्हणजे शिक्षण' इतका संकुचित अर्थ यशवंतराव मान्य करीत नाहीत. या संदर्भात ते म्हणतात– ''शिक्षित व्यक्तीला स्वत:च्या भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे काही संगती लावता येते, त्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येतो, आणि त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो, आपल्या व्यक्तिमत्वावर काय घडतो, हे समजावून घेता येते आणि समजावून देता येते, त्याला मी शिक्षण मानत आलो आहे.''[६०] इतका व्यापक अर्थ यशवंतराव सांगतात. शिक्षणातून मानवी व्यक्तिमत्वाची जडण घडण होत असते. शिक्षणातून मानवी मूल्यांवर विश्वास ठेवणारे 'साक्षर' निर्माण झाले पाहिजेत, हिंसाचार, अत्याचार, अन्याय व विध्वंसक 'राक्षस' निर्माण होऊ नयेत यासाठी हे शिक्षण आवश्यक आहे. मानवाने मानवाला समजून घेण्यासाठी त्याच्या विचाराचे गुणग्रहण करण्यासाठी व त्याच्याशी सर्वोच्च पातळीवर सुसंवाद स्थापन करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता असल्याचे ते सांगतात.

विज्ञान युगात शिक्षणाचे स्थान कमी झालेले नाही. श्रमातून सहजीवन, विश्रांतीमुळे विचारस्वातंत्र्य आणि विश्वातील आत्मतत्व वाढविण्याचा प्रयत्न शिक्षणाने होतो. यासाठी विज्ञानयुगातील मानवाला सौंदर्य, आदरभाव आणि प्रेमभाव यामध्ये वेळ घालविण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. थोडक्यात माणुसकीची जोपासना हेच शिक्षणाचे अंतिम ध्येय असल्याचे यशवंतराव सांगतात.

महात्मा फुले, महर्षि कर्वे, डॉ. राधाकृष्णन, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख आणि यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षणाचे महत्व समाजास पटवून देण्याचा आणि समाज शैक्षणिकदृष्टया जागृत करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे विचार समाजास आजही आदर्शवत ठरणारे आहेत.

३) यशवंतरावांची माध्यमिक शिक्षणाबाबतची भूमिका :-

माध्यमिक शिक्षणमंडळ स्थापन झाल्याबाबत यशवंतराव शिक्षणमंडळाला धन्यवाद देतात. समाजाच्या सर्वांगिण उन्नतीसाठी शिक्षणाची गरज असल्याचे ते सांगतात. शिक्षणाच्या संस्काराने माणसाचे मन अधिक संपन्न केल्याशिवाय समाज हा खऱ्या अर्थाने समाज बनत नाही. कारण शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे खरे साधन असल्याचे ते सांगतात. यामध्ये प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षण महत्वाचे असल्याचे ते सांगतात. प्राथमिक शिक्षणाबाबत यशवंतराव अतिशय सुक्ष्म निरीक्षणातून विचार मांडतात. शाळेची इमारत एक मजली असावी, गावाच्या वेगवेगळया भागात या शाळा असाव्यात, मुलांना एकवेळची न्याहारी मिळावी, बहुजन समाजातील तळागाळातील मुलांना शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी त्यासाठी मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी अशी व्यापक भूमिका यशवंतराव व्यक्त करतात.

माध्यमिक शिक्षणाबाबत बोलताना यशवंतराव म्हणतात- " माध्यमिक शिक्षण हेच बहुसंख्य मुलांच्या जीवनातील अंतिम शिक्षण असून त्यांच्यापुरते बोलायचे झाल्यास हे शिक्षण म्हणजे त्यांच्या भावी जीवनाची खूपच मोठी शिदोरी आहे"[६१] ही शिदोरी विद्‌यार्थ्यांच्या पदरात पडते आहे किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी शिक्षणमंडळाची असल्याचे यशवंतराव सांगतात. परिस्थितीनुरूप अनेक विद्यार्थी माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहतात. अशा विद्‌यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय सरकारने उपलब्ध करून द्यावी असा महत्वपूर्ण विचार यशवंतरावांच्या भाषणातून आढळतो.

आज शिक्षणाचे महत्व हे फक्त नोकरी-चाकरी मिळविण्याचे साधन राहिले नाही किंवा प्रमाणपत्रांचेही महत्व राहिलेले नाही तर विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडतील अशा कोणत्या गोष्टी करता येणे शक्य आहे हे पाहणे गरजेचे असल्याचे ते सांगतात. माध्यमिक शिक्षणामध्ये विविधता आणली तरच लोकांच्या मनातील उदासिनता कमी होईल असेही यशवंतराव सांगतात. उद्याची भावी पिढी निर्माण करण्याचा पाया माध्यमिक शिक्षणामध्ये असल्यामुळे अशा गुणांची रूजवणूक होते का? हे पाहणे गरजेचे असल्याचे यशवंतराव सांगतात. " समाजामध्ये पहिल्या प्रतीच्या माणसाची वाढ व्हावी, गुणी माणसांची वाढ व्हावी, ज्ञानाच्या विविध क्षेत्रात पराक्रम करण्याची संधी त्यांना मिळावी हाही अर्थ त्यात अभिप्रेत आहे. त्यायोगे अशा मंडळींना वैयक्तिक पराक्रम तर करता येईलच. परंतु त्यातून देशाचेही सामर्थ्य वाढेल अशी या पाठीमागे भावना आहे. तेव्हा उच्च शिक्षणासाठी लागणाऱ्या लायकीची, गुणांची मंडळी तयार करण्याचे काम

साहजिकच माध्यमिक शिक्षणाला करावे लागेल. जीवनामध्ये स्वत:ला मदत करण्याचे सामर्थ्य आपण विद्यार्थ्यामध्ये निर्माण करतो आहोत किंवा नाही हेही पाहिले पाहिजे असा विचार यशवंतराव व्यक्त करतात.

थोडक्यात भावी पिढीच्या संपूर्ण सांस्कृतिक जीवनाची जबाबदारी या माध्यमिक शिक्षण मंडळावर असल्याचा विचार ते मांडतात. ती जबाबदारी अतिशय जाणीवपूर्वक पार पाडावी आणि विद्यार्थ्यांना सक्षम बनवावे असे ते सांगतात. देशाच्या आकांक्षाची परिपूर्ण शक्ती म्हणजेच विद्यार्थी होय. या विद्यार्थ्यांच्या माध्यमिक जीवनाचे महत्त्व जाणून घेऊन शिक्षण प्रक्रिया असावी असा महत्वपूर्ण विचार यशवंतरावांनी मांडलेला आहे.

## ३) शिक्षण हे ग्रामीण परिवर्तनाचे व विकासाचे साधन :-

शिक्षण हे ग्रामीण परिवर्तनाचे व विकासाचे साधन असल्याचे यशवंतराव सांगतात. ग्रामीण शिक्षण आणि शहरी शिक्षण हे वेगवेगळे असू शकत नाही. ग्रामीण शिक्षण म्हणजे भोवतीच्या परिसराचा विकास करण्याचे साधन जेव्हा शिक्षण बनेल तेव्हा त्यास उपयुक्त शिक्षण म्हणता येईल असे यशवंतराव सांगतात. शहर आणि खेडी यांच्यातील अंतर कमी करून शहराकडे होणारी गर्दी रोखली नाही तर त्याचे दुष्परिणाम भविष्यात भोगावे लागतील असे यशवंतरावांना वाटते.

शिक्षणातून ग्रामीण जीवनाचा कायापालट होणे असे अपेक्षीत असताना प्रत्यक्षात मात्र आजच्या शिक्षणाची शोकांतिका झाल्याचे यशवंतराव सांगतात. कारण खेड्यामधील आई-वडिल मुलाला शिक्षणासाठी शहरामध्ये पाठवितात आणि नंतर तो मुलगा शहरातच राहतो त्यामुळे त्याच्या शिक्षणाचा फायदा हा ग्रामीण भागास न होता स्वत:चे जीवनमान उंचावण्यासाठी होतो ही अतिशय खेदाची बाब असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या शिक्षणाचा उपयोग खेड्याचा विकास करण्यासाठी, शेतीचा विकास करण्यासाठी झाला पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतीमध्ये करून शेतीसुधारणा केली पाहिजे हाच ग्रामीण शिक्षणाचा हेतू यशवंतरावांनी सांगितला आहे.

यशवंतराव ग्रामीण शिक्षणाची संकल्पना सांगताना म्हणतात-" खेड्यातील ज्या कोट्यावधी जनतेचे जीवन मंगलमय करावे असा हेतु मनाशी ठेवून आपले राष्ट्र पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहे, त्या जनतेचे कल्याण करण्याचे एक साधन ह्या दृष्टीने ग्रामीण शिक्षणाच्या प्रश्नाकडे पाहण्याचा आपण प्रयत्न करूया"[६२] असा ग्रामीण

शिक्षणाचा हेतू यशवंतराव स्पष्ट करतात. तो साध्य करण्यासाठी प्रामुख्याने ग्रामीण शिक्षणाची संकल्पना समजून घेऊन लोककल्याणासाठी त्याचा उपयोग केला पाहिजे असा विचार यशवंतराव स्पष करतात. म्हणजेच ग्रामीण भागात विकासाची कामे करणारी माणसे शिक्षणातून निर्माण व्हावीत अशी भूमिका ते स्पष्ट करतात.

## ४) शिक्षणाची समाजाभिमुखता :-

समाजाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी आणि समाजात पहिल्या प्रतीच्या माणसांची वाढ होण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता असल्याचे यशवंतराव सांगतात. शिक्षणाचे हे रहस्य ओळखून त्या दिशेने प्रत्यक्ष कार्य प्रवण होणारात, महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास, म. फुलेंनाच अग्रपूजेचा मान दिला पाहिजे असे ते सांगतात. दादाभाई नौरोजी, जगन्नाथ शंकरशेट, छ. शाहू महाराज, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो. टिळक , आगरकर, महर्षि कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख अशा अखिल भारताला ललामभूत झालेल्या विभूतींनी शिक्षण प्रसाराची उज्ज्वल परंपरा निर्माण केली. आणि समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून दिले. असा विचार यशवंतराव व्यक्त करतात.

समाजातील आर्थिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील समस्या शिक्षणातून सोडविण्यात आल्या पाहिजेत असे यशवंतराव सांगतात. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग सभोवतालच्या समाजासाठी करावा या संदर्भात ते म्हणतात - '' विद्यापीठात शिक्षण घेण्याची संधी ज्या विद्यार्थ्यांना लाभली त्यांना माझी अशी विनंती आहे की, त्यांनी आपल्या भोवती घडत असलेल्या घटनांचा बारकाईने अभ्यास करावा. एवढेच नव्हे तर त्या घटनांना योग्य प्रकारे वळण लागेल अशा प्रकारे त्यांनी प्रयत्न करावेत. या प्रदेशाचे भावी नागरिक या नात्याने त्यांच्या उन्नतीसाठी व उत्कर्षासाठी प्रयत्न करणे हे त्यांचे कर्तव्यच ठरते. आपण ज्या समाजात वावरतो त्याचे गुणदोष काय आहेत याचा शोध घेऊन गुणांचा विकास व दोषांचे निराकरण करणे, आपल्या प्रदेशाचे जे निकडीचे प्रश्न असतील त्यांचा अभ्यास करणे आणि जनहिताच्या दृष्टीने हे प्रश्न सोडविण्यास साह्य करणे हीच सुशिक्षित तरूणांकडून आज अपेक्षा आहे''[६३] शिक्षण कार्य हे केवळ नैतिक कार्य आहे, असे नाही. कोणत्याही सामाजिक कार्यास नैतिकतेचे अधिष्ठान लागते. तरच ते परिणामकारक बनते असे ते सांगतात.

शिक्षणापासून हजारो वर्षे जो समाज वंचित राहिला त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. ज्ञानोपासना, ज्ञानाचे संवर्धन हे समाजात विशिष्ट जातीचे कार्य न मानता समाजातील सर्व लोकांना शिक्षण खुले झाले तरच समाजाचा कायापालट होईल आणि शिक्षणक्रांती होईल असे यशवंतरावांना वाटते. त्यासाठी शिक्षणप्रसार होणे महत्वाचे असल्याचे ते सांगतात. स्त्री शिक्षणाचे महत्व समाजास पटवून देण्याविषयी सुशिक्षित मंडळींनी प्रयत्न केले पाहिजेत असा विचार यशवंतरावांनी मांडला आहे. त्याचबरोबर आर्थिक प्रश्नामुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या वर्गास शासनाने सवलत उपलब्ध करून दिली पाहिजे असे यशवंतराव सांगतात. सामाजिक न्यायाची भूमिका स्पष्ट करताना यशवंतराव म्हणतात- " समाजात उच्च स्थान प्राप्त करून घेण्याचे साधन म्हणूनही शिक्षणाकडे त्यातील कांही लोक पाहत असतील. परंतु जातिभेदाने पछाडलेल्या आणि श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या कल्पनांवर आधारलेल्या समाजात ही वृत्ती स्वाभाविक व निकोप म्हणून समजली गेली पाहिजे"[६४] तरच सर्वांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध होईल असे ते म्हणतात.

शिक्षण हे आर्थिक विकासाचे साधन आहे हे सांगतांना यशवंतराव म्हणतात - "आमच्यामध्ये शक्ती निर्माण करण्याकरिता आमच्याजवळ मनुष्यबळाशिवाय दुसरे काही साधन नसल्यामुळे आम्हाला या साधनांचा विकास करण्यासाठी त्याला शिक्षणाची जोड द्यावयाची आहे. खेड्यात बिजली नेऊन पोहचविल्याशिवाय ज्याप्रमाणे शेतीचा विकास होणार नाही, त्याप्रमाणे आमचा नापिक पडलेला मनुष्यबळाचा हा जो मोठा थोरला साधन संपत्तीचा भाग आहे, त्यात शिक्षणाची बिजली नेल्याशिवाय नवे सामर्थ्य निर्माण होणार नाही"[६५] मनुष्यबळाच्या विकासाचे साधन जसे शिक्षण ठरते तसेच देशाचा किंवा शेतीच्या विकासाचे एक साधन मनुष्य हेच आहे त्यामुळे शिक्षणाचा समाजाशी अतिशय जवळचा संबंध आहे असे यशवंतराव सांगतात.

### ४) उच्च शिक्षित तरूणांचे कर्तव्य :-

शिक्षणाने सामाजिक जीवन संपन्न अन् समृध्द करावयाचे असते. याची जाणीव तरूणांना असणे आवश्यक असल्याचे यशवंतराव सांगतात. देशाची शक्ती म्हणून आपण या तरूणांकडे पाहत असताना त्यांच्या कर्तव्यांची जाणीव यशवंतराव करून देतात. शिक्षणातून बौध्दिक प्रगल्भता होते याचा समाजास उपयोग व्हावा. या हेतूने समाजामध्ये तरूणांनी मार्गदर्शकाची भूमिका ठेवावी असे यशवंतराव सांगतात. ते

म्हणतात- " पूर्वीच्या काळी लोक विद्वान व व्यासंगी पुरूषांकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करीत असत. आज विद्यापीठांतून शिक्षण घेतलेल्या तरूण स्त्री- पुरूषांकडून अशा मार्गदर्शनाची अपेक्षा आहे"[६६] ही महत्वाची जबाबदारी पार पाडत असताना आपल्या ज्ञानाचा उपयोग योग्य रीतीने होतो का नाही हे पाहणे आवश्यक असल्याचे यशवंतराव सांगतात.

ज्या समाजात आपण वाढलो, ज्या समाजातून घडलो, त्या समाजाची बांधिलकी आपण ठेवली पाहिजे, असे यशवंतराव म्हणतात- शिक्षणाने एक प्रकारचे मानसिक व बौध्दिक सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे एवढेच नव्हे तर या बौध्दिक व मानसिक सामर्थ्याच्या जोरावर आपल्या जीवनाचा यशस्वी मार्ग शोधत असताना, ज्या समाजाने आपल्या कल्याणासाठी या ज्ञानगंगा उघडल्या त्या समाजाचेही थोडे फार ऋण फेडण्याची शक्ती व भावना या शिक्षणाने आपल्या मनात निर्माण झाली पाहिजे ही भावना तरूणांच्या समाजकार्यात, समाजप्रबोधनात असावयास हवी. आपल्या बुध्दीचा ज्ञानाचा समाजास, देशास उपयोग झाला पाहिजे यातच शहाणपण असल्याचे यशवंतराव सांगतात. ज्ञानाबरोबर आजच्या युगात शहाणपणाची अधिक जरूरी देशाला असल्याचे यशवंतराव सांगतात. आजच्या सामाजिक जीवनपध्दतीत शहाणपण असेल तरच त्या समाजाची प्रगती, उन्नती होत असते. तरूणांच्या जवळ शहाणपण असणे गरजेचे असल्याचे यशवंतराव सांगतात.

आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये, विज्ञान जगतामध्ये तरूणांनी सतत ज्ञानाचा पाठलाग केला तरच तो प्रगतीकडे वाटचाल करू शकतो, त्यातून वैचारिक स्वांतत्र्य प्राप्त होते. त्यासाठी ज्ञानाची तहान भागविणे तरूणांनी आवश्यक मानले पाहिजे असे यशवंतराव सांगतात. ज्ञानाचे महत्व सांगताना ते म्हणतात- " असत्याकडून सत्याकडे, अंधारातून प्रकाशाकडे, मृत्यूपासून अमृताकडे 'मला' ने या अमृताच्या प्राप्तीसाठी देवांनी समुद्रमंथन केले, पण त्या समुद्रमंथनातून जे अमृत निघाले ते देव प्राशन करून बसले. आता आमच्यासाठी अमृत शिल्लकच राहिलेले नाही, म्हणून शिवाजी विद्यापीठाने घोषणा केली आहे की, 'ज्ञानमेवामृतम्' आता ज्ञान हेच अमृत आहे. या अमृताने तुम्हाला समर्थ बनावयाचे आहे, समाजजीवन समर्थ बनवावयाचे आहे"[६७] ज्ञानाच्या शक्तीवर जगामध्ये उलथापालथ होऊ शकते अशा ज्ञानाने तरूण हा परिपूर्णतेकडे जावा आणि जीवनात सुख-समृध्दी निर्माण व्हावी. त्याचबरोबर

समाजजीवनाचे ही ऋण फेडण्याचा प्रयत्न तरूणांनी करावा असा विचार यशवंतराव व्यक्त करतात.

देशावरील निष्ठा जोपासणे हे महत्वाचे कर्तव्य तरूणांचे असल्याचे यशवंतराव सांगतात. कोणत्याही कार्यामध्ये प्रथम देशहिताचा विचार तरूणांनी केला पाहिजे. आपल्या कृती उक्तीतून लोकशिक्षण दिले पाहिजे. राष्ट्रीय शिक्षण देणारे नेतृत्व आज निर्माण झाले पाहिजे,आपल्या मायभूमीच्या संरक्षणासाठी, प्रगतीसाठी आपण नेहमीच तत्पर राहिले पाहिजे. आजच्या विज्ञानयुगातील बदलत्या परिस्थितीनुसार येणाऱ्या जबाबदाऱ्या स्विकारल्या पाहिजेत. ते म्हणतात- "मानवाला भविष्यकाळात पृथ्वीतलावरच नव्हे, तर अब्जावधी योजने दूर असलेल्या ग्रहताऱ्यांचा कारभार हाकावा लागेल"[६८] हे आवाहन स्विकारण्याची तयारी तरूणांनी ठेवली पाहिजे. तरूणांनी वैज्ञानिक दृष्टी निर्माण करावी अशी अपेक्षा यशवंतराव व्यक्त करतात.

## ६) कृषिकेंद्री शिक्षण : काळाची गरज :-

शिक्षणशास्त्रामध्ये असा एक सिध्दांत आहे की, ज्याचा तो जन्मजात व्यवसाय आहे त्या व्यवसायाद्धारा शिक्षण दिल्यास त्याच्या अंगच्या सुप्त गुणांचा विकास घडविणे सहज शक्य असते त्यासाठी शेती, सुतकताई, विणकाम या उद्योगांना प्राधान्य दिलेले आहे, त्या मागील विचाराची पार्श्वभूमी कृषिप्रधान शिक्षणाचीच आहे. आपल्या देशात प्रामुख्याने 'शेती' हा व्यवसाय ८०% लोकांचा असल्यामुळे कृषिकेंद्री राष्ट्रीय शिक्षणाची गरज असल्याचे यशवंतराव सांगतात. समाजात कृषिकेंद्री शिक्षण देऊन राष्ट्राचे उत्पादन वाढविता येऊ शकते असा विचार यशवंतरावांनी व्यक्त केला आहे. ते म्हणतात- "हिंदुस्थानच्या जीवनातील कारूण्य यात आहे की, शेती ही एवढी मोठी महत्वाची गोष्ट असतांना आणि शिक्षणाचा आम्ही अजिबात संबंध तोडून टाकलेला आहे. असे करून चालणार नाही. शेतीच्या शिक्षणाचीही आवश्यकता आहे . शेतकरी आणि शेतीशी संबंध असणारा मनुष्य शहाणा असल्याशिवाय शेती शहाणी होणार नाही. यावर माझा विश्वास आहे."[६९] मनुष्यबळाच्या विकासाचे साधन जसे शिक्षण ठरते. तसेच देशाच्या विकासाचे एक साधन मनुष्य हेच ठरते. त्यामुळे या देशाच्या विकासासाठी शेती विकास होणे गरजेचे असल्याचे ते सांगतात. त्यासाठी शिक्षणातून शेतीचे आधुनिकीकरण केले तर उत्पादनात निश्चित वाढ होते म्हणूनच कृषिकेंद्री शिक्षणाची आज समाजास आवश्यकता असल्याचे यशवंतराव सांगतात.

शिक्षणाचा शेती विकासाच्या कामात उपयोग होण्यासाठी तरूण शिक्षितांनी शेती विषयक तंत्रज्ञान आत्मसात करावे आणि पुन्हा गावात येऊन त्या शिक्षणाचा उपयोग शेती करण्यासाठी करावा असे यशवंतराव सांगतात. ते म्हणतात- " गावातून शिक्षण घेऊन तयार झालेला तरूण हा गांवांतील शेतीच्या विकासाच्या, ग्रामीण जीवनाच्या विकासाच्या उपयोगी पडण्याइतका सकस नागरिक बनावा या दृष्टीने जे शिक्षण घावयाचे, त्यालाच जर ग्रामीण शिक्षण आपण म्हणणार असलो तर या तऱ्हेच्या ग्रामीण शिक्षणाचा विचार करण्याची आज जरूरी आहे यात शंका नाही."[७०] असा शिक्षण आणि शेतीचा जवळचा संबंध असल्याचे यशवंतराव सांगतात.

मात्र आज परिस्थिती वेगळी असल्याचे ते सांगतात. गरीब आई-वडिल आपली शेती गहाण ठेवून शिक्षणासाठी मुलाला शहरात पाठवितो. पण शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तो मुलगा गावाकडे परतत नाही. तो शहरात राहतो. त्यामुळे त्या मुलाच्या शिक्षणाचा उपयोग खेड्यासाठी काहीही होत नसल्याचे ते सांगतात. शहराचे आकर्षण वाटत असल्यामुळे आज ही परिस्थिती आहे. त्यामुळे शहरातील सुखसोयी आणि शहरातील रोजगारांची शाश्वती काही प्रमाणात जरी आपण खेड्यात निर्माण करू शकलो तर सध्या शहरासंबंधीचे खेड्यातल्या माणसाला वाटणारे आकर्षण काहीसे कमी होईल. असे यशवंतरावांना वाटते. खेड्यांमध्ये छोटे मोठे उद्योगधंदे काढून रोजगाराचा प्रश्न सोडविला पाहिजे असा कृषिविषयक दृष्टीकोन यशवंतरावांचा दिसून येतो.

## ७) शिक्षण परिवर्तनातील धोके :-

शिक्षणाच्या रचनात्मक पातळीवरील कोणताही बदल करताना त्याचा परिणाम हा व्यापक स्वरूपात होत असतो. त्यामुळे हा बदल एक धोका निर्माण करू शकतो. शिक्षण प्रसार करीत असताना, त्यामध्ये बदल करीत असताना, शैक्षणिक प्रश्नांची सोडवणूक करीत असताना त्याचा दर्जा खालावण्याचा धोका निर्माण होऊ शकतो असे यशवंतराव सांगतात. अभ्यासक्रमातील विषय बदलून एखादा दुसरा विषय घालावयाचा असेल तर त्यायोगे काही शिक्षक बेकार होतील, काही त्रुटी निर्माण होतील. यावरून शिक्षणाबाबतची उदासिनता समाजात निर्माण होईल. त्यामुळे कोणताही बदल करताना अतिशय विचारपूर्वक बदल करणे आणि शिक्षणाचा दर्जा उंचावेल या दृष्टीने प्रयत्नशील असावे अशी भूमिका यशवंतराव मांडतात.

शिक्षणाच्या दर्जाचा विचार करीत असताना प्रथम रूढी-परंपरेने जे काही चालत आलेले आहे, एक चौकट निर्माण झालेली आहे. त्यातून समाजाने बाहेर पडले पाहिजे, कारण हाताच्या बोटावर मोजली जाणारी मंडळी शिक्षणक्रमाचे जे स्वरूप ठरवितात ते आजच्या परिस्थितीत बदलावयास हवे असे यशवंतरावांना वाटते. ते म्हणतात- " शालेय शिक्षणक्रमाची ११ वर्षे आणि महाविद्यालयांची ४ वर्षे या ऐवजी १०+२+३ असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा यात फक्त आकडयाचे कोष्टक बदलून बेरीज सारखीच काढण्याची कल्पना अभिप्रेत आहे, असे मला वाटत नाही. शिक्षण समाजाभिमुख करण्याच्या दिशेने टाकलेले ते पहिले महत्वाचे पाऊल होय. ते फलदायी होण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमात विविध प्रकारच्या कौशल्यांना, व्यावसायिक हुन्नरांना, बौध्दिक क्षमतेला स्थान मिळाले पाहिजे आणि त्याची नव्याने उभारणी झाली पाहिजे."[७१] असा शैक्षणिक दृष्टीकोन यशवंतरावांचा दिसून येतो.

समाजाचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा उच्च असला तरच शिक्षणाचे महत्व अबाधित राहू शकते . आज तरूणांच्या मनामध्ये शिक्षणाबद्दलची उदासिनता दिसून येते. शिक्षणातून बेकारीचे प्रमाण वाढते आहे, रोजगाराच्या प्रश्नामुळे शिक्षणाबद्दलचीआस्था कमी झाल्याचे दिसून येते. या सर्व प्रश्नांची उकल करून शिक्षणाचा दर्जा व कस कायम ठेवला पाहिजे असे यशवंतरावांना वाटते आज महाराष्ट्राचे शासन अवलंबत असलेले शैक्षणिक धोरण अत्यंत गोंधळाची परिस्थिती निर्माण करून राहिले आहे. 'गुणवत्ता प्रधान शिक्षणा' ची आजच्या शासनाची भूमिका शहरी लोकांच्याच हिताची असून खेड्यापाड्यातील शाळा बंद करणारी आहे. 'परीक्षा पेपर फुटीचे प्रकार', 'प्रवेशाचा गोंधळ', 'वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश पध्दती बाबतच्या कोर्ट कचेऱ्या', 'शालेय गणवेशाच्या' प्रकारातील धर्माधिष्ठीतता', 'न्याय व्यवस्थेतील वकिलांच्या प्रवेशाबाबतची बंधने', 'शिक्षकांच्या नव नियुक्तीसाठीच्या' निवड मंडळाची संकल्पना, ह्या सर्व गोष्टीमुळे आज शैक्षणिक विश्वांत अभूतपूर्व गोंधळ निर्माण झाला आहे ह्या सर्वामागे पारंपारिक शैक्षणिक विचार दडलेला आहे. हा पारंपारिक दृष्टीकोन बदलून लोकांच्या मनामधील संभ्रम कमी करणे महत्वाचे असल्याचे यशवंतराव सांगतात. पदव्यांच्या हव्यासातून ज्ञानदानाचे पवित्र कार्य बाजूलाच पडते. गैरमार्गाचा वापर करून पदव्या मिळविल्या जातात. गुणवत्तचे उद्दिष्ट आज बाजूला पडत असल्याचे सांगून यशवंतराव या गोष्टींसाठी शैक्षणिक संस्था व शिक्षक यांना दोषी ठरवितात. शिक्षणाचा दर्जा ढासळल्यामुळे आज शिक्षणाकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टीकोन बदलला

आहे. शिक्षक आणि संस्था या गोष्टींना जबाबदार असल्याचे ते सांगतात. एकूणच शिक्षणातील या दोष पध्दती नाहिशा करून त्याचा दर्जा कायम टिकविण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे अशी यशवंतरावांची भूमिका आहे.

## ८) मातृभाषेतून शिक्षण :-

राजभाषेचा दर्जा प्राप्त झालेली मराठी भाषा आपणा सर्वांना प्रिय आहे. या भाषेचा सर्वांगिण विकास करण्याची जबाबदारी मराठीवासियांची असल्याचे यशवंतराव सांगतात. शिक्षण हे समाजात तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी मातृभाषेतून दिले पाहिजे असे ते सांगतात. मातृभाषा ही सर्वांना समजते, समाजातील सर्व स्तरांतून ती बोलली जाते म्हणून शिक्षण मातृभाषेतून दिले तर ते समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचेल असा विचार यशवंतराव व्यक्त करतात. यामुळे मराठी भाषेचाही विकास होईल. यशवंतराव म्हणतात- ''नव्या महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचे काम आम्हाला करावयाचे आहे. जुने अमृतासारखे जे शब्द आहेत ते शब्द तर आम्हाला वापरायचे आहेतच, पण तुमच्या आमच्या जुन्या पिढीला माहित नसणारे अमृतासारखे विचार अजून आपल्याला शोधून काढावयाचे आहेत. नवीन शास्त्रीय विचारांचा, शास्त्रीय ज्ञानाचा एक नवा इमला आपल्याला महाराष्ट्राच्या जीवनामध्ये उभारावयाचा आहे आणि या सगळया विचारांचे पोषण करणारे, त्यांना तोलणारे शब्द आणि भाषा तुम्हा आम्हाला निर्माण करावयाची आहे.''[७२] म्हणूनच मराठी भाषेतून शिक्षण दिले पाहिजे असा विचार यशवंतराव व्यक्त करतात. राज्याची भाषा ही तेथील लोकांची बोलीभाषा असते. लोकांची मातृभाषा ही राज्याची भाषा असते तीच भाषा शासनाची असली पाहिजे. शिक्षणाची व दैनंदिन व्यवहाराची भाषा म्हणून मातृभाषेचा उपयोग झाला पाहिजे. म्हणूनच मातृभाषा ही व्यवहाराच्या भाषेबरोबरच शिक्षणाचीही भाषा बनली पाहिजे असे ते म्हणतात.

मराठी भाषा समृध्द करण्यासाठीचा विचार यशवंतराव मांडतात. मराठी भाषेविषयीचा उदंड आणि सच्चा स्वाभिमान त्यांच्या विचारांमध्ये दिसून येतो. हा स्वाभिमान साहित्यिकांनीही उचलला पाहिजे याची जाणीव यशवंतराव करून देतात. मराठी भाषा संपन्न होण्यासाठी जगातील सर्व ज्ञान मराठीत आणले पाहिजे असे यशवंतराव सांगतात. ते म्हणतात-'' मराठी भाषेचे राज्य झाल्यानंतर ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांतील विचारांची संपदा तिने मराठी जीवनात आणली पाहिजे. ही जिम्मेदारी तिच्यावर आहे. त्याकरिता मराठी भाषा ही अधिक विचारप्रवाही, अधिक विचारवाही

झाली पाहिजे''[७३] अशी समृध्द झालेली भाषा मराठी जनतेच्या विकासाच्या सफरीत त्यांच्या विचारांचे वाहन बनली पाहिजे. असे यशवंतरावांना वाटत होते. बाळासाहेब खेर यांनी स्वातंत्र्याबरोबरच 'मॅट्रिकचे शालांत परिक्षेत' परिवर्तन घडविताना मराठीला माध्यमिक शिक्षणाचे वाहन बनविले होते. परंतु यशवंतरावांनी उच्चशिक्षणही मराठीतून झाले पाहिजे असा विचार मांडला होता ते म्हणतात-'' मानवी मनात अनेक मूळ आशा-आकांक्षा असतात, कल्पना असतात, आणि त्या प्रकटीकरणासाठी, व्यक्तीमत्वासाठी एक प्रकारे हाका मारीत असतात. शब्दासाठी त्या भुकेलेल्या असतात, तहानलेल्या असतात. त्यांच्या हाकेला ओ देऊन लेखक, विचारवंत, संशोधक व शास्त्रज्ञ त्यांना लेखनाद्धारा शब्दरूप देत असतात. मराठी भाषिक जनतेच्याहि आशा काही आशा-आकांक्षा, इच्छा असून त्या विविध प्रवाही आहेत''[७४] म्हणूनच मराठी भाषेचा प्रसार होणे गरजेचे असल्याचे ते सांगतात.

यशवंतराव मराठी भाषेचा विकास व्हावा, ती लोकजीवन समृध्द करणारी असावी, ती संपन्न बनावी असे म्हणतात. पण इतर भाषांचा ते द्वेष करीत नाहीत. ज्याला 'थ्री लँग्वेज फार्म्युला' म्हणतात त्याचे ते पुरस्कर्ते होते. मातृभाषा, मातृभाषेच्या जोडीला हिंदी आणि हिंदीच्या जोडीला काही काळ तरी इंग्रजी हिंदुस्थानमध्ये राहणे आवश्यक आहे, असे मत यशवंतराव मांडतात. पण ते असेही म्हणतात आमच्या देशातले उच्च शिक्षण हे मातृभाषेतूनच झाले पाहिजे. भारतीय भाषांच्या विकासाला अडथळा होणार नाही याची काळजीही घ्यायला यशवंतराव सांगतात, खरे तर अनेक परकीय देशांमध्ये इंग्रजी ही ज्ञानाची भाषा नाही आपल्या मातृभाषेतूनच देश संपन्न व समृध्द बनले आहेत. मग आपल्याच देशात या भाषेचा अट्टाहास का? असा प्रश्न यशवंतराव मांडतात. आपल्याच भाषांचा विकास व्हावा आणि मराठी भाषा ही ज्ञानाची भाषा बनावी असे त्यांना वाटते.

यशवंतराव लोकभाषा ही ज्ञानभाषा झाली पाहिजे या भूमिकेशी ठाम असल्याचे दिसून येते. ते म्हणतात- ''सामान्य माणसांपर्यंत महत्वाचा विचार किंवा ज्ञान आम्ही कधी जाऊच दिले नाही, ही माझी मुख्य तक्रार आहे हा मुद्दा थोडक्यात सांगावयाचा झाला तर असे मी म्हणेन की, ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही, उन्नत होत नाही, विकसित होत नाही. ज्ञानभाषा एक आणि लोकभाषा दुसरी ही हिंदुस्थानच्या जीवनाची परंपरागत कहाणी आहे''[७५] 'अमृतातेही पैजा' जिंकणारी, रसिकांची मने आकर्षित करणारी, मराठी भाषा समृध्द केली पाहिजे

असे यशवंतराव सांगतात. संस्कृतमधल्या ज्ञानाचा मक्ता सगळी विद्वान मंडळी घेऊन बसली होती. त्या विद्वानांच्या तावडीतून ज्ञानाला सोडवून मराठीत ज्ञानाचा पहिला वृक्ष ज्ञानेश्वरांनी नेवाश्याला लावला. महाराष्ट्राच्या इतिहासात लोकभाषेने ज्ञानभाषेचे पाहिले पाऊल तेथे टाकले, म्हणून महाराष्ट्राचे खरे विद्यापीठ हे नेवाश्याला असल्याचे मत यशवंतराव व्यक्त करतात.

मराठी भाषा विकसित करण्यासाठी समाजातील सर्व व्यक्तिंनी जागरूक राहिले पाहिजे. असे यशवंरावांना वाटते. ते म्हणतात- '' परक्या लोकांच्या ग्रंथाचे मराठीत भाषांतर करून मराठी भाषा वाढेल असे नाही. माझ्या मते भाषांतरी भाषा फारशी चांगली नसते. जमिनीतले पाणी, जमिनीतील सत्वे, आणि जमिनीत इतर जी काही शक्ती असेल ती घेऊन पिऊन जमिनीतून ऊस जसा वाढत जातो, तशी भाषा ही जिवंत असली पाहिजे. मराठी भाषेने मराठी मनाचा कस घेऊनच वाढले पाहिजे''[७६] नवनवे उपक्रम मराठी भाषेत होणे गरजेचे असल्याचे ते सांगतात.

अशी मराठी लोकभाषा ही ज्ञानभाषा बनविण्यासाठी, ती संपन्न करण्यासाठी आम मराठी जनतेला यशवंतरावांनी आवाहन केल्याचे दिसून येते. यावरूनच यशवंतरावांचे मराठी भाषेवरील आत्यंतिक प्रेम आणि जिव्हाळा दिसून येतो. एके ठिकाणी ते म्हणतात-'' माणसाने भाषा निर्माण केली आता भाषेला माणसे निर्माण करावी लागणार आहेत.''[७७] म्हणजेच भाषेचा विकास व्हावा असा विचार ते व्यक्त करतात. साध्या -सोप्या रचनेतून माणसांना समजेल, उमजेल अशी भाषा असावी. त्यामध्ये क्लिष्टता, संदिग्धता नसावी, व्याकरणाचे नियम यांनी ती भाषा कृत्रीम होऊ नये असेही त्यांना वाटते. भाषा अधिक साधी आणि बोलीभाषेतील असेल तर सामान्य माणसांना ती समजते. त्यामुळे शिक्षण हे लोकभाषेतून झाले तर ते अवघड वाटणार नाही. परकीय भाषा समजून घेऊन त्यातील ज्ञान समजून घेणे विद्यार्थ्यांना अवघड वाटते परंतु जर लोकभाषेतूनच त्यांना ज्ञान मिळू लागले तर ते समजण्यास अधिक सोपे होईल म्हणूनच लोकभाषा ही ज्ञानाची भाषा व्हावी असे यशवंतरावांना अभिप्रेत आहे.

थोडक्यात, सामान्य माणसाला मोठे करावयाचे असेल तर ज्ञान हे लोकभाषेतून मिळाले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने समाज जीवन विकसित होईल. परकीय भाषा शिकण्यातच आपला अधिक वेळ खर्च होतो तो वेळ वाचेल आणि त्या वेळात मराठी भाषेतून ज्ञान आत्मसात करता येईल म्हणून लोकभाषा हीच ज्ञानाची भाषाची झाली पाहिजे असा विचार यशवंतरावांनी मांडला आहे.

समारोप :-

यशवंतरावांनी शिक्षणविषयक अतिशय गांभीर्याने केलेले चिंतन निश्चितच आजच्या शिक्षण क्षेत्राला मोलाचे मार्गदर्शन करणारे आहे. माणसाचे मन शिक्षणाच्या संस्काराने संपन्न केले तर खऱ्या अर्थाने समाज बनतो. हे सांगताना यशवंतराव शिक्षणाची संधी समाजातील सर्व घटकांना मिळावी हे ही सांगतात. कारण शिक्षणाने मानव सुसंस्कृत बनत असतो, सभोवतालच्या वातावरणाशी तारतम्य साधण्याचा प्रयत्न करीत असतो, म्हणून शिक्षण हे मानवी विकासाचे केंद्र आहे. त्यातून मानवी जीवनमान उंचावत असते असे त्यांनी सांगितले आहे. शिक्षण समाजाच्या विकासाचे साधन असते आणि माध्यमही असते. समाजामध्ये उच्च प्रतीच्या माणसांची निर्मिती करावयाची असेल तर त्यासाठी शिक्षणाची गरज असते कारण शिक्षण आणि मानव यांचा परस्पर संबंध असल्याचा विचार शिक्षणविषयक चिंतनातून ते व्यक्त करतात.

म. गांधीजीच्या विचारांतील 'शिक्षणा'ची संकल्पना यशवंतरावांना अभिप्रेत असल्याचे दिसून येते. श्रोत्यांच्या बुध्दीला पटेल असे चिंतन त्यांच्या शैक्षणिक विचारांतून येते. त्यांच्या या विचारांची खोली, व्यापकता ही जीवननिष्ठ विचाराची आहे. यशवंतराव हे मुळातच सामाजिक कार्यकर्ते असल्यामुळे शिक्षणाचा समाज जीवनाशी असलेला संबंध त्यांनी समाजाला समजून सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यांचे हे विचार व्यक्ती, समाज आणि देश यांच्या जीवनाला, शक्तीला चालना देणारे आहेत. परंतु केवळ 'पदवी' घेणे याला ते शिक्षण मानत नाहीत. गुणवत्ता महत्वाची असल्याचे ते सांगतात. 'ज्ञान हे अमृत आहे' ते अमृत समाजाला संपन्न बनवेल याच दृष्टीने त्याकडे पाहिले पाहिजे हे यशवंतरावांनी अतिशय साध्या- सोप्या भाषेतून सांगितले आहे.

यशवंतरावांचा मराठी भाषेविषयीचा अभिमान त्यांच्या समग्र भाषण वाचनातून लक्षात येतो. विषय जरी गंभीर असला तरी ते अतिशय सुटसुटीत प्रभावी मराठी भाषेत ते मांडतात. वेगवेगळी उदाहरणे, दाखले, काव्यांचा वापर यातून ते समाजमनाच्या अंतरंगात पोहचतात. याचे सर्व श्रेय भाषेला आहे. भाषेवर आणि शब्दांवर त्यांची हुकुमत होती. शब्दांचे सामर्थ्य, शब्दांचे सौंदर्य त्यांनी ओळखले होते. त्यांच्या भाषेच्या वापरात एक विचार असे. त्या विचारात प्रेरणा असे, स्फुर्ती असे. समाज जीवन जागृत करण्याची उर्मी असे, एकूणच त्यांचे मराठी भाषेवर प्रभुत्व होते. या संदर्भात डॉ. शिवाजीराव चव्हाण म्हणतात-" माता, मातृभूमी आणि मातृभाषा यांच्यावर प्रेम न करणारा माणूस

शोधूनही सापडणे दुर्मिळ, असे काहिसे बोलले जाते. परंतु जे बहुतेक लोकमाता, मातृभूमी आणि मातृभाषा यांच्यावर प्रेम करतात, त्यांच्यात तरतमभाव करावयाचा झाला तर स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांना खूप वरचा क्रमांक द्यावा लागेल' आणि राष्ट्रीय नेतृत्वाचा या दृष्टीने विचार केला तर यशवंतरावांना पहिला क्रमांक द्यावा लागेल.''[७८]

यशवंतरावांच्या शिक्षणविषयक आचार-विचाराबाबत डॉ. नागनाथ हेगे म्हणतात- '' समाजाची प्रगती ही तेथील शिक्षणावरच अवलंबून असते, हे त्यांनी जाणले व हे शिक्षणच समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे हे ओळखून यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक वातावरणाला गतिमान केले. बदलत्या परिस्थितीची दखल घेत घेतच त्यांनी हे केले कारण शिक्षण हेच राष्ट्रीय एकात्मतेचे व राष्ट्रीय विकासाचे एक प्रभावी माध्यम आहे यावर त्यांचा कटाक्ष होता. शिक्षणाचा प्रसार व प्रचार करून शिक्षणासाठी जितक्या सवलती देता येतील तितक्या देऊन शिक्षणाचा हा प्रचंड प्रवाह महाराष्ट्राचा प्रत्येक शहरात व प्रत्येक खेडयात पोहचविला त्यातूनच नवीन व सुशिक्षितांची पिढी जन्माला आली.''[७९]

अशा प्रकारे यशवंतरावांनी शिक्षणाचे मानवी जीवनातील महत्व विषद केलेले आहे. व्यक्ती, समाज, देश हा शिक्षणातून उभा राहतो. हा विचार त्यांच्या चिंतनातून आलेला दिसून येतो. एखाद्या शिक्षणतज्ञाला लाजवेल अशा पध्दतीचे त्यांचे शिक्षण विषयक विचार अतिशय गांभीर्याने प्रकट होताना दिसून येतात.

# ड) यशवंतराव चव्हाणांच्या भाषणांतून आलेले साहित्यविषयक विचार

यशवंतराव जसे कुशल राजकारणी आणि संसदपटु होते तसेच ते जेष्ठ साहित्यिक आणि साहित्यप्रेमीही होते. राजकारण आणि साहित्य ही दोन वेगवेगळी क्षेत्रे असताना देखील यशवंतराव या दोन्हीही क्षेत्रात निपुण होते. मराठी साहित्यात त्यांच्या साहित्याने मोलाची भर घातलेली आहे. आपल्या जीवनातील अनुभवाच्या आधारे यशवंतरावांनी साहित्यनिर्मिती केली. काही घटना, प्रसंग, समाजातील घडामोडी, सामाजिक प्रश्न, समस्या, राजकीय, आर्थिक समस्या, धार्मिकता इ. विविध विषय त्यांनी आपल्या भाषणांतून मांडले त्याबरोबर 'साहित्य' या विषयावरील त्यांचे चिंतनही वेगवेगळ्या भाषण प्रसंगी व्यक्त झालेले दिसून येते. त्यांच्या समग्र साहित्य वाचनातून त्यांची 'साहित्यिक यशवंतराव' अशी प्रचिती येते.

यशवंतरावांना साहित्याबद्दल आत्यंतिक प्रेम होते. यातूनच त्यांनी साहित्य क्षेत्रामध्ये अनेक महत्वाची कामे करून साहित्यसृष्टीला स्फुर्ती अन् प्रेरणा दिली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी साहित्य आणि संस्कृती यांच्या वृध्दीसाठी, संवर्धनासाठी काम करणारी विद्धानांची उच्चाधिकार यंत्रणा निर्माण करून त्यांच्या ज्ञानाचा, साहित्याचा, विचारांचा उपयोग करून काम करण्याची प्रवाही योजना सिध्द व्हावी या हेतूने 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ' स्थापन केले. १९७५ साली कऱ्हाडला 'महाराष्ट्र वाङ्मय मंडळ' स्थापन करून प्रतिवर्षी एका उत्कृष्ट वाङ्मय प्रकाराला रूपये ५,००१/- 'कऱ्हाड पुरस्कार' प्रदान करण्याची मुहुर्तमेढ त्यांनी रोवली. मराठवाड्यातील कला, क्रीडागुणांना उत्तेजन देण्यासाठी मराठवाडा सांस्कृतिक मंडळाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, 'गाव तेथे ग्रंथालय आणि वाचक तेथे वाचनालय' हा ग्रंथालय कायदा त्यांनी करवून घेतला. विश्वकोशाचे प्रचंड कार्यही त्यांच्या प्रेरणेने व पुढाकाराने सुरू करण्यात आले. १९५८ च्या सुमारास झालेली नाट्य परिषद, याशिवाय नाटकांच्या पुस्तकांना तसेच विविध विषयांवरील उत्कृष्ट पुस्तकांना बक्षीसे, हौशी कलावंतांना शासनातर्फे आर्थिक सहाय्य, संगीत, नृत्य, नाट्यशाळांना अनुदान, तमाशांना पारितोषिके या गोष्टी महाराष्ट्रामध्ये त्यांनी सर्वप्रथम सुरू करून प्रशासकीय गुणाबरोबर आपल्या रसिक कलाप्रेमी वृत्तीचा परिचय

जनतेला करून दिला. लोककलांना शहरी रसिकांनी अंगीकारावे, तमाशा हा ग्रामीण कलाप्रकार ग्रामीण लोकरंजनासाठीच न राहता तो लोकप्रबोधनाचे माध्यम व्हावे यासाठी पुणे येथील हीरा बागेत आयोजित केलेल्या राज्यस्तरावरील पहिल्या तमाशापरिषदेचे उद्घाटक म्हणून ते उपस्थित होते. या साहित्यिक कार्यातून त्यांचा साहित्याशी असलेला अतुट संबंध समजतो.

यशवंतराव अनेक साहित्य परिषदा, संमेलने, मैफली, नाट्य संमेलने, इतिहास परिषदा, साहित्यिक मेळावे यांना आवर्जून उपस्थित राहत होते. कऱ्हाडच्या साहित्य संमेलनास ते रसिक म्हणून प्रेक्षकांतही बसले होते. खेड्यांमध्ये साहित्यसंमेलन भरविल्याबद्दल विदर्भ साहित्यिकांचे त्यांनी कौतुक केले होते. अनेक साहित्यिकांशी त्यांचे मैत्रीचे संबंध होते. साहित्यिकांबद्दल त्यांना जिव्हाळा वाटत असे. अधिकारपदावर असताना अनेक साहित्यिक प्रेक्षकांत बसले असतील तर त्यांना ते आपल्याजवळ बोलवून बसावयास जागा देत असत. यातून यशवंतरावांचे साहित्य आणि साहित्यिक यांच्यावरील प्रेम दिसून येते.

यशवंतरावांनी अनेक पुस्तकांचे वाचन केलेले होते. त्यातूनच त्यांची काही निश्चित अशी मते तयार झालेली होती. 'साहित्य' हे समाजपरिवर्तनाचे साधन म्हणून त्याकडे ते पाहत असत. वाचनातून अफाट माहितीचे भांडार त्यांच्याजवळ होते. वाचन मनन आणि चिंतन या त्रिवेणी संगमातून साहित्यविषयक अतिशय जबाबदारपणे त्यांनी मते मांडलेली आहेत. अनेक कार्यक्रमाप्रसंगी त्यांनी लोकांसमोर ती मांडली आहेत. अनेक ग्रंथरचनेतून ती वाचकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. अनेकविध वाङ्मयप्रकार त्यांनी हाताळलेले आहेत. लघुनिबंध, ललितनिबंध, प्रवासवर्णने, व्यक्तिचित्रे, प्रसंगचित्रे, आत्मचरित्र, वैचारिक लेखन इ.प्रकारांना सामावून घेणारी वाङ्मय निर्मिती त्यांनी केली. स्वानुभवाचे अविष्कारण त्यांच्या साहित्यातून दिसून येते.

साहित्य क्षेत्रातील यशवंतरावांचे कर्तृत्व सामान्य नाही एक सर्जनशील कलावंत व उत्तम समीक्षक म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल. 'कृष्णाकाठ', 'भूमिका', 'युगांतर', 'ऋणानुबंध', 'सह्याद्रीचे वारे', 'शिवनेरीच्या नौबती', 'विदेशदर्शन', 'शब्दाचे सामर्थ्य' यासारख्या कलाकृतीतून यशवंतरावांनी साहित्य जगतात आपली नाममुद्रा ठळकपणे उमटवली आहे. तसेच अनेक पुस्तकांना दिलेल्या प्रस्तावना ही देखील एक त्या पुस्तकांची समीक्षाच म्हणावी लागेल. साहित्यामधून शिक्षण, साहित्य, कृषी,

औद्योगिकता, सहकार, समाजकारण, राजकारण, अर्थकारण यासारखे विषय त्यांच्या लेखनातून आढळतात. यशवंतरावांनी अनेक कार्यक्रम प्रसंगी आपले चिंतन भाषणातून लोकांच्यापर्यंत पोहचविलेले होते. प्रभावी वक्तृत्वातून समाजाच्या हृदयापर्यंत आपले विचार पोहचविणारे यशवंतराव हे सामाजिक कार्यकर्तेही होते. त्यामुळे समाजाचा सर्वांगिण विकास हा त्यांच्या साहित्याचा मुख्य हेतू असल्याचे दिसून येते.

'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर' आणि 'भूमिका' या तीन पुस्तकातील भाषणांतून त्यांनी साहित्यविषयक विचार अतिशय गांभिर्याने मांडलेले आहेत. 'साहित्यिकांची जबाबदारी', 'साहित्य आणि संस्कृती', 'आजच्या साहित्याकडून अपेक्षा' या लेखांमधून त्यांनी साहित्यविषयक विचार मांडलेले दिसून येतात. त्यांच्या या विचारांना चिंतनाची बैठक लाभलेली आहे. रसिक मनाचा वेध घेणारी ही भाषणे वाचताना त्यातील शब्दाशब्दातून साहित्यिक मूल्याचा प्रत्यय येतो. लोकशिक्षण आणि समाज शिक्षण हा त्यांच्या भाषणाचा उद्‌देश असल्याचे दिसून येते. साहित्यातून 'मानव' हा महत्वाचा केंद्रबिंदू त्यांनी मानलेला आहे. मानव, समाज आणि देश यांचा विकास साधण्याचा विचार साहित्यातून यावा अशी भूमिका ते व्यक्त करतात.

साहित्यप्रेमी यशवंतरावांनी साहित्य, साहित्यिक यांच्याबाबत काही चिंतन केलेले होते. त्यांच्या भाषणातून प्रकट झालेल्या साहित्यविषयक विचारांवरून त्यांची साहित्यविषयक भूमिका लक्षात येते.

## यशवंतरावांचे साहित्यविषयक विचार :-

यशवंतरावांच्या भाषणातून प्रकट झालेले साहित्यविषयक विचाराचे स्वरूप पुढील प्रमाणे सांगता येईल.

### १) यशवंतरावांचा जीवनवादी दृष्टीकोन :-

साहित्यासंबंधी यशवंतरावांचा दृष्टीकोन हा जीवनवादी होता.साहित्य हे समाज जीवनातून निर्माण होत असते. लोकजीवनाचे प्रतिबिंब कळत नकळत साहित्यामध्ये उमटत असते. मानवी स्वभाव, भाव-भावना, मानवाच्या आशा-आकांक्षा, सुख-दु:खे, ह्याच्या संदर्भातील घटना, प्रसंग, समस्या यांचे चित्रण साहित्यामधून होत असते. यशवंतरावांची जीवनवादी भूमिका त्यांच्या विचारातून साहित्यातून दिसून येते. त्यांचा जीवनवाद अतिशय व्यापक आणि उद्‌बोधक स्वरूपाचा होता. साहित्यामध्ये 'कलेसाठी कला' आणि 'जीवनासाठी कला' असे दोन विचारप्रवाह होते. 'जीवनासाठी कला' हा

दृष्टीकोन यशवंतरावांनी स्विकारलेला होता. ते म्हणतात - ''कलेसाठी कला की जीवनासाठी कला' हा ही वाद पूर्वी फार गाजलेला आहे.मराठी साहित्यात अजूनही त्याचे पडसाद अधुनमधून उमटत असतात. माझ्यापुरते बोलायचे झाले तर माझा कल जीवनासाठी कला या तत्वाकडे झुकलेला आहे. केवळ शब्दसाहित्य आणि प्रतिमांचे सौंदर्य हीच चांगल्या साहित्याची कसोटी घेणे होय. असा कलेसाठी कला याचा अर्थ असला तर ती स्वत:ची फसवणूक करून घेणे होय.''[८०] जीवनवादी दृष्टीकोन ते व्यक्त करताना मानवी जीवनाच्या समृध्दीसाठी आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी साहित्याच्या शक्तीचा उपयोग झाला पाहिजे अशी भूमिका ते मांडतात.

साहित्य आणि समाजजीवन यांचा परस्परसंबंध असतो. या समाजातील वास्तवता, जीवनवाद हा साहित्यातून चित्रित व्हावा अशी भूमिका मांडताना ते कलावादी साहित्य मान्य करीत नाहीत. ज्या समाजात लेखक वाढत असतो, समाजाच्या संस्कारातून घडत असतो त्याचेच प्रतिबिंब साहित्यामधून उमटले पाहिजे असे त्यांना वाटते. रंजकता, काल्पनिकता, ओंगळपणा साहित्यातून येणे त्यांना मान्य नव्हते.कलावंताने आपली कला मांडताना अतिशय विचारपूर्वक, संस्कारसंपन्न आणि तत्वज्ञानाची जोड यांचा समावेश साहित्यातून व्हावा याची जाणीव ठेवली पाहिजे. शब्दलालित्य असले म्हणजे साहित्य ही व्याख्या त्यांना मान्य नाही. साहित्यातून व्यक्तीच्या अनुभव, विचार, भावनांचे अविष्कारण होत असते. ते म्हणतात - ''साहित्याचा समाजजीवनासाठी आरशासारखा उपयोग होतो. कारण या साहित्यात सर्वसाधारण लोकांच्या, सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक प्रवृत्तींचे प्रतिबिंब सापडते. त्यातच साहित्याच्या उत्पत्तीचे व जनतेच्या अभिव्यक्तीचे रहस्य दडलेले आहे हे सत्य असे आहे की, ज्याला समस्त मानवी इतिहासाचा पुरावा देता येईल.''[८१] असे त्यांना वाटते.

समाजाचे प्रबोधन करण्यासाठी साहित्याचा उपयोग होत असतो. म्हणून समाजातील घटना, प्रसंग, समस्या यावर साहित्यातून प्रकाश टाकला जावा असे त्यांना वाटते.जीवनाचे तत्वज्ञान साहित्यातून चित्रित झाले पाहिजे. मानवी जीवनातील घडामोडींचेही साहित्यामध्ये अविष्कारण झाले पाहिजे असे त्यांना वाटते. ''साहित्य हे सुध्दा एका अर्थाने जीवनाची समीक्षा आहे. साहित्यनिर्मिती करावी पण खरे म्हणजे जीवनावरचा लोभ सोडू नये. जीवनावरचे प्रेम कायम ठेवावे.''[८२] जीवनाच्या वेगवेगळया

पैलूंचे चित्रण साहित्यातून घडते. जगण्याच्या शाश्वत प्रेरणेशी इमान राखून साहित्यनिर्मिती झाली पाहिजे असे यशवंतरावांना वाटते.

सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांचा विचार करणे विज्ञानयुगाचे व नवजीवनाने निर्माण केलेल्या नवजाणिवांचा स्विकार करून त्याचा प्रसार करणे, समाजाचे प्रबोधन करणे ही साहित्याची प्रयोजने यशवंतराव सांगतात. तसेच 'मानव्याची' जोपासना करणे हे ही महत्वाचे प्रयोजन असल्याचे ते सांगतात.एकूणच बदलत्या जीवनमानाचा वेध घेऊन मानवी जीवन उंचावण्याचा प्रयत्न साहित्यातून झाला पाहिजे. ''ज्या साहित्यातून अमंगलाचा नाश आणि मंगलाची स्थापना होते तेच साहित्य उदात्त गुणांची प्रेरणा देऊन समाजाला प्रगतीच्या दिशेने गतिमान करू शकते.''[८३] असे यशवंतरावांना वाटते. समाजजीवनातील मूल्यांचा प्रत्यय साहित्यातून आला पाहिजे. जीवनाचे तत्वज्ञान, नीतीमत्ता, संस्कारसंपन्नता साहित्यातून चित्रित झाली पाहिजे. त्यांच्या मते साहित्याची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करून देणारीच असली पाहिजे. जे मानवी मूल्ये प्रतीत करते तेच अक्षर वाङ्मय ठरते. त्यांना साहित्यिक मूल्ये आणि सामाजिक-राजकीय मूल्ये अधिक महत्वाची वाटतात.

## २) यशवंतरावांची साहित्यविषयक भूमिका :-

यशवंतराव साहित्याची व्याख्या करताना, साहित्य नेमके कशाला मानावे हे सांगतात. वैयक्तिक वा सामाजिक मानवी जीवनाच्या कोणत्याही पैलूची भाषेच्या मदतीने केलेली अभिव्यक्ती म्हणजेच साहित्य मानावे अशी साहित्यविषयक भूमिका यशवंतरावांची दिसून येते. साहित्य आणि समाज यांचा परस्परसंबंध साहित्यातून चित्रित झाला पाहिजे असे त्यांना वाटते. बदलत्या समाजजीवनाचा, स्थितीचा, वास्तवाचा वेध साहित्यातून घेतला पाहिजे. त्यांच्या मते - ''साहित्य कोणत्याही रंगाचे असले तरी चालेल पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून समाजाला सर्व थरांत निर्माण झालेल्या अस्वस्थतेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे.''[८४] समाजभिमुखता ही त्यामध्ये असली पाहिजे असे त्यांना वाटते.

साहित्याची उद्दिष्टे कशा पध्दतीची असावीत हे सांगताना त्यामध्ये 'मानव' हा महत्वाचा केंद्रबिंदू असावा असे ते मत मांडतात.बुध्दीची कुवत वाढविणे, मने व्यापक करणे, जगातील नव्या प्रवाहांची समीक्षा करणे, स्वत:च्या संस्कृतीचा व परंपरेचा बुध्दिनिष्ठ अभ्यास करून नव्या परिस्थितीला सुसंगत अशा मुलभूत परिवर्तनासाठी

जनमानसाला तयार करणे अशी पुढच्या पिढीतील साहित्याची उद्दिष्टे त्यांनी सांगितलेली आहेत. ललित साहित्याची सामाजिकता निरनिराळ्या क्षेत्रांशी अधिक निकटचे संबंध प्रस्थापित केल्याशिवाय आणि जीवनामध्ये असलेले श्लेष आणि काव्य यांच्याशी अधिक जवळीक केल्याशिवाय साहित्यात फारशी मोलाची भर कोणी घालू शकेल असे मला वाटत नाही.[८७] अशी अपेक्षा ते साहित्याकडून व्यक्त करतात.

साहित्यावर सभोवतालचा परिसर, व्यक्ती, समाज, विविध घटना, प्रसंग, समाजाचे, राजकारणाचे, अर्थकारणाचे प्रश्न, सुख-दु:खे यांचा खोलवर परिणाम होत असतो. या लोकजीवनाचे प्रतिबिंब साहित्यातून उमटत असते. समाजातील विषमता, समाजाचे रीतीरिवाज, सांस्कृतिक परंपरा या विषयांचे चित्रण साहित्यातून झाले पाहिजे असे यशवंतरावांना वाटते. साहित्याचा जन्मच मुळी मानवी जीवनातील विविधांगाचे चित्रण करण्यासाठी झालेला असतो. ते म्हणतात - ''मानवी मनात अनेक मूक आशा-आकांक्षा असतात, कल्पना असतात आणि त्या प्रकटीकरणासाठी, व्यक्तिमत्वासाठी एक प्रकारे हाका मारीत असतात. शब्दासाठी त्या भुकेलेल्या असतात, तहानलेल्या असतात त्यांच्या हाकेला ओ देऊन लेखक, विचारवंत, संशोधक व शास्त्रज्ञ त्यांना लेखनद्वारा शब्दरूप देत असतात. त्याचप्रमाणे ज्ञानाच्या सरोवराचे पाट आपण लोकांच्या जीवनापर्यंत पोहचविले पाहिजेत.''[८८] हे महत्वाचे कार्य साहित्याकडून झाले पाहिजे असा विचार यशवंतराव व्यक्त करतात.

यशवंतराव साहित्य हे एक सामर्थ्य असल्याचे सांगतात. व्यक्ती, समाज, देश यांच्यामध्ये शक्ती निर्माण करण्याचे सामर्थ्य साहित्यातून झाले पाहिजे असे त्यांना वाटते. साहित्याच्या कक्षा अधिक व्यापक आणि समर्थ झाल्या पाहिजेत. साहित्यातून मानवी जीवनाचा, समाज जीवनाचा आणि देशाचा विकास साधला गेला पाहिजे इतके सामर्थ्य त्या साहित्यातून मिळाले पाहिजे अशी भूमिका यशवंतराव व्यक्त करतात. ''कारण साहित्य हे एक सामर्थ्य आहे. व्यक्तीच्या जीवनाप्रमाणेच राष्ट्राच्या जीवनात जी आव्हाने येतात ती आव्हाने झेलण्याचे सामर्थ्य जेव्हा प्रत्यक्ष अनुभवाला येते तेव्हा राष्ट्र मोठे होते असा आतापर्यंतचा अनुभव आहे. पण हे सामर्थ्य कशाने प्राप्त होते? हे सामर्थ्य शस्त्राने प्राप्त होत नाही, बंदुकीच्या गोळीने प्राप्त होत नाही. हे सामर्थ्य विचारांतून येते, संस्कारातून येते. हे विचार आणि हे संस्कार देण्याचे काम भाषेमार्फत, साहित्यामार्फत घडते. म्हणून साहित्याचे मोल जास्त आहे असे मी मानतो.''[८९] असे साहित्याचे अनन्यसाधारण सामर्थ्य यशवंतराव मान्य करतात.साहित्य हे समाज, व्यक्ति यांना

घडविण्याचे कार्य करीत असते. मानवाच्या मनामध्ये प्रेरणा, स्फुर्ती निर्माण करीत असते. मानवाला वेळप्रसंगी दिशा दाखविण्याचे कार्यही साहित्याकडून होत असते. तसेच मानवी जीवनातील सुख-दु:खाच्या प्रसंगामध्ये साहित्य वाचनातून समाधान देण्याचे कार्यही होत असते. एकूणच साहित्यातून मानवी जीवनात सामर्थ्य प्राप्त होत असते असा विचार यशवंतराव व्यक्त करतात.

साहित्यातून राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते. विशालत्व प्राप्त झालेल्या भारतामध्ये वैविध्यता आढळून येते.याचे दर्शन साहित्यातून झाले पाहिजे असे यशवंतरावांना वाटते. विविध भागातील लोकजीवन, त्यांची संस्कृती, तेथिल जीवनसौंदर्य यांचा वेध घेण्याचा प्रयत्न साहित्यातून झाला पाहिजे असे त्यांना अपेक्षित आहे. ते म्हणतात - "भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी हे जे विविधत्व आहे त्यांच्याशी आपण संपर्क जोडला पाहिजे आणि त्याच्यातून अनुस्यूत असलेल्या एक भारतीयत्वाचा आपण अनुभव घेतला पाहिजे हा अनुभव घेण्याचा आपण कदाचित प्रयत्न करीत असाल परंतु हा अनुभव आमच्या साहित्याद्धारे लोकांपर्यंत जाऊन पोहचला पाहिजे."[८८] यातून व्यक्ती स्वत:च्या जीवनात येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाऊ शकतील असे यशवंतरावांना वाटते. मानवी मूल्यांचे दर्शन साहित्यातून झाले पाहिजे तरच ते साहित्य अक्षरवाङ्मय ठरते असे ते म्हणतात. मानवी मूल्यांचा प्रत्यय हीच वाङ्मयाची आपण शेवटची कसोटी मानली पाहिजे अशी साहित्याबाबतची भूमिका यशवंतराव स्पष्ट करतात.

### ३) सामान्य जनतेचे हित करण्याचे साधन ते साहित्य :-

साहित्यातून सामान्य जनतेचे हित साधले जावे अशी भूमिका यशवंतरावांची होती. सामान्यांचे जीवनमान उंचावण्याचे कार्य अप्रत्यक्षरित्या साहित्यातून घडावे असे त्यांना वाटते. महाराष्ट्राच्या लोकजीवनात आणि लोकसंस्कृतीत वाढलेला माणूस आपल्या उन्नयनाचा विचार करणारा आहे. या मानवाचे कल्याण साधणे हे साहित्याचे प्रयोजन असावे असे त्यांना वाटते. ते या संदर्भात म्हणतात - "मी जेव्हा साहित्य म्हणतो तेव्हा ललित साहित्य म्हणतो असे नव्हे किंवा ललित साहित्य हेच तेवढे साहित्य असाही त्याचा अर्थ नाही. ललित शब्द म्हणजे साहित्य अशी माझी कल्पना नाही."[८९] शब्दसौंदर्य किंवा वाक्यसौंदर्य महत्वाचे नाही. कलाकृती कशी दिसते त्यापेक्षा कलाकृतीमधील आशय महत्वाचा असतो. या आशयातून किंवा विषयातून सामान्य

जनतेचे कल्याण साधणे हे महत्वाचे उद्दिष्ट असल्याचे ते सांगतात." साहित्य म्हणजे सामान्य जनतेचे हित करण्याचे साहित्य अशी साधीसुधी व्याख्या मी करतो."[१०] साहित्यातून मानवाचा सर्वांगिण विकास साधणे अशी भूमिका यशवंतरावांची होती.

साहित्य हे मानवाचे वैचारिक, सांस्कृतिक धन असते या धनाचा उपयोग मानवी जीवनात समृध्दी निर्माण करण्यासाठी होत असतो. सामान्य जनतेला दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरणारे साहित्य निर्माण व्हावे त्यांच्या जीवनातील चांगल्या-वाईट प्रसंगी मार्गदर्शकाप्रमाणे त्या प्रसंगाला सामोरे जाण्याची वृत्ती निर्माण व्हावी असा एकूणच साहित्यविचार यशवंतराव मांडतात. साहित्यामधून सर्व ज्ञान उपलब्ध झाले तर सामान्यजनांना त्याचा लाभ होईल असे त्यांना वाटते. ते म्हणतात - "मराठी साहित्य या विशाल सागराचा एक महत्वपूर्ण अंश आहे हे आम्ही विसरता कामा नये. ह्या सागरातील लाटा निराळ्या तटांवर आदळून एका तटाचा विशेष संदेश दुसऱ्या तटाला नेऊन पोहोचवितात. ह्या लाटांचा उठणारा ध्वनी केवळ एका प्रदेशापुरता मर्यादित रहात नाही तर त्याचा प्रतिध्वनी साऱ्या देशात उठतो आणि हा प्रतिध्वनी भारतीय साहित्य सागरातही उठलेला आढळतो."[११] इतर भाषेतील ज्ञानभांडार मराठी भाषेतून जनतेपर्यंत पोहचले पाहिजे तरच आपण परिपूर्णतेकडे निघालो आहोत असे वाटेल. मग ज्ञानकोश, विश्वकोष हे देखील फक्त ग्रंथालयाची शोभा वाढविणारे न होता ते जनतेपर्यंत पोहोचतील असे त्यांना वाटते. इतिहासाचे संशोधन करून वर्तमानकाळाकडे लक्ष देऊन भविष्यकाळाचा वेध घेण्याचा प्रयत्नही साहित्यमंडळाकडून झाला पाहिजे असे यशवंतरावांना वाटते.

महाराष्ट्रातील अतिशय विद्वान मंडळी जी आहेत त्यांच्याकडून खेड्याखेड्यातील प्रश्नावर दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे ते सांगतात. त्यांच्या विचारांचा, त्यांच्या शक्तीचा, साधनांचा उपयोग आपण करून घेतला तर निश्चितच इतिहासाचे पुनरूज्जीवन, खेड्यातील समस्या, शहरी-नागरी जीवनातील तफावत या प्रश्नांची उकल होण्यास मदत होईल आणि यातून मानवी जीवनातील सुख-दु:खे थोडीफार कमी होण्यास मदत होईल असे त्यांना वाटते. एकूणच साहित्यातून सामान्य जनतेचे हित साधले पाहिजे असे यशवंतरावांना अपेक्षीत आहे.

## ४) लेखकाची बांधिलकी :-

लेखकाने सामाजिक बांधिलकीतून लेखन करावे अशी भूमिका यशवंतराव व्यक्त करतात. ज्या समाजात लेखक जीवन जगत असतो त्या समाजाचा, सभोवतालच्या वातावरणाचा सूक्ष्म अभ्यास लेखकाने केला पाहिजे त्यांचे जीवनमान, त्यांचे प्रश्न यांची जाण साहित्यिकाला असली पाहिजे. समाजातील शोषितवर्ग, दलित वर्ग, उपेक्षित वर्ग त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरूध्दचा आवाज साहित्यिकांनी साहित्यातून उठविला पाहिजे. असे यशवंतरावांना अपेक्षित आहे. त्यांच्यामते सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने ललित साहित्याची सामाजिकताही अत्यंत महत्त्वाची आहे. जे वाङ्मय मानवाच्या मुलभूत सद्भावनांना आवाहन करते आणि मानवाला जीवन संघर्षासाठी समर्थ बनविते. त्यामुळे समाज नित्य प्रगतीला अभिमुख राहतो, तेच अक्षर वाङ्मय ठरते. अशी साहित्याबाबतची यशवंतरावांची विचारसरणी दिसून येते. असे वाङ्मय साहित्यिकांनी निर्माण करावे असे यशवंतराव सांगतात.

साहित्यातून समाजमनाचे प्रतिबिंब उमटत असते. लेखकाला सभोवतालच्या जीवनाचे ज्ञान असणे आवश्यक असल्याचे ते सांगतात. यातूनच कसदार साहित्यनिर्मिती व्हावी. समाजातील सर्व बाबींकडे साहित्यिकाने अतिशय गांभिर्याने पाहिले पाहिजे असा यशवंतरावांचा दृष्टीकोन होता. ते म्हणतात – ''ज्या समाजात, ज्या देशात आपण जन्मलो त्या देशाला, समाजाला आपला काहीतरी उपयोग व्हायला नको का? माणूस हा 'सामाजिक प्राणी' असं म्हणतात तेव्हा त्याचं सामाजिकत्व हे त्याच्या सामाजिक बांधिलकीवरच अवलंबून असतं.''[१२] अशी सामाजिक बांधिलकी साहित्यिकांची असली पाहिजे असे त्यांना वाटते. समाजजीवनातील मानवी शक्ती जागृत करण्याचा प्रयत्न साहित्यिकांनी करावयाचा असल्याचे ते सांगतात. मानवाच्या मूळ प्रेरणा आणि साहित्यिकांच्या प्रेरणा या एकरूप झाल्या तर खऱ्या अर्थाने देश एकरूप झाला असे म्हणता येईल.त्यासाठी सामाजिक शक्तींना आवाहन करण्याची गरज असल्याचे ते सांगतात.''आमच्यात ज्या सुप्त शक्ती आहेत त्या सुप्त शक्तींना आवाहन करून, त्या जागृत करून आम्ही आमचे सामर्थ्य वर्धिष्णु करू. सामर्थ्य संवर्धनाचे हे काम आज साहित्यिकांनी केले पाहिजे. साहित्यिकांची ही भूमिका असली पाहिजे.''[१३] हे काम साहित्यिकांनी पार पाडले तर आपल्यापुढे जे महत्वाचे प्रश्न आहेत त्यांची उत्तरे देण्याची शक्ती समाजाच्या जीवनामध्ये निर्माण करण्याचे काम साहित्यिकांकडून होऊ शकते असे यशवंतराव सांगतात.

देशाची उंची ही विचारधनावर वाढत असते. असे 'विचारधन' समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहचविण्याचे काम साहित्यातून होत असते. दमदार साहित्यनिर्मिती करणे ही जबाबदारी साहित्यिकाची असते ''कारण, देशातील विचारवंत, कलावंत, लेखक, शास्त्रज्ञ व संशोधक यांच्या प्रयत्नाने निर्माण होणारे 'विचारधन' हेच समाजाचे फार मोठे धन आहे असे मी आणि महाराष्ट्र शासन मानते. ते असेल तरच देश ओळखला जातो, समाज ओळखला जातो, समाजाचे जीवन प्रवाही राहते, चिरंतन राहते, समाज जिवंत राहतो तो त्याच्याजवळ असलेल्या भौतिक सामर्थ्याने नव्हे तर त्याच्याजवळ असलेल्या सांस्कृतिक मूल्यांवर आणि विचारधनावर तो जिवंत राहतो आणि वाढतो असाच इतिहासाचा दाखला आहे.''[१४] असे विचारधनाचे महत्व यशवंतराव सांगतात. साहित्यिकांनी याची जाणीव ठेवून लेखन करावे आणि समाजाला उन्नतीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी 'दीपस्तंभा' प्रमाणे मार्गदर्शक बनावे असे त्यांना वाटते. आपल्या देशातील परंपरा सुध्दा अशाच तऱ्हेची असून ती सांगावयाची झाल्यास व्यास-वाल्मिकींपासून ते आजपर्यंतच्या अनेक पंडितांची, विचारवंतांची आणि विद्वानांची नावे यशवंतराव सांगतात. या सर्व विद्वानांची, पंडितांची त्यागी संतांची आणि पराक्रमी पुरूषांची ही आपली अखंड परंपरा आहे तीच आमची खरी प्रेरणा असून त्यांच्या अर्थाची परंपरा साहित्यिकांनी चालवावी अशी भूमिका यशवंतराव व्यक्त करतात.

यशवंतरावांनी साहित्यिकांच्यावर एक महत्त्वाची जबाबदारी टाकली होती ती म्हणजे 'राष्ट्रीय एकात्मता' जोपासणे होय. लेखकांनी आपल्या लेखणीतून भावनिक एकात्मता वृध्दिंगत करावी यातच देशाची शक्ती एकवटली असल्याचे ते सांगतात. ते या संदर्भात म्हणतात - ''नव्या जमान्यात एकमेकांच्या जीवनामध्ये जी साम्यस्थळे आहेत ज्या एकजिनसी परंपरा आहेत, एकमेकांना जवळ नेणाऱ्या ज्यां गोष्टी आहेत त्यांच्यावर भर देऊन त्यांचे महत्व प्रतिपादण्याची फार आवश्यकता आहे. या एकतेवर भर देवून तिचा प्रत्यय दैनंदिन जीवनामध्ये नित्याच्या कामामध्ये आणण्याचे काम साहित्यिकांनी केले पाहिजे. हे काम कथा लेखकांचे, कवींचे आणि कादंबरीकारांचे आहे.''[१५] यातूनच प्रादेशिक एकात्मता साधली जाईल असे यशवंतरावांना वाटते. महाराष्ट्र आणि मराठवाडा यांच्या एकीकरणातून समाजामध्ये विविध विचारप्रवाह सुरू होते. यातून वितंडवाद निर्माण होऊ नये असे यशवंतरावांना वाटत होते. साहित्यिकांनी भारतातील त्या त्या विभागातील जीवनाशी समरस होण्याची आवश्यकता असल्याचे यशवंतराव सांगतात. भारतातील हवामान, मनुष्यस्वभाव, चालीरीती, उत्तुंग पर्वतराजी, खोल खोल दऱ्या

यातून वाहणाऱ्या नद्या, गारठवणारा बर्फ वर्षाव आणि भाजून काढणारा उन्हाळा यातून प्रत्ययाला येणारे भारतीय जीवन सौंदर्याचे स्त्रोत यशवंतरावांनी दाखवून दिले आहेत. या सौंदर्य स्थळातील ऐक्याचा अनुबंध दाखविण्याची जबाबदारी ते साहित्यिकांवर टाकतात.

यशवंतराव साहित्यिकांना नव्या सामाजिक परिस्थितीची जबाबदारी समजावून देतात. साहित्यद्धारा सामाजिक आणि सांस्कृतिक मने सांधण्याचा प्रयत्न करण्यावर भर देताना आढळतात ते म्हणतात - "भावनेची, संस्कृतीची आणि मनाची एकता जी आढळते त्या एकतेची जाणीव तिव्रतेने वाढविण्याची आजच्या काळात फार आवश्यकता आहे असे मला वाटते. वेगवेगळ्या राजकीय वा अन्य प्रेरणांचे पलिकडे जे सामाजिक मन आहे ते सांस्कृतिक संबंधांनी बांधले असल्यामुळे ते अलगच राहिल. या सामाजिक मनाला जागे करण्याचा प्रयत्न साहित्यिकांनी आणि त्यांच्या साहित्याने केला पाहिजे "[१६] जे साहित्यिक आहेत त्यांच्या अनुभवाच्या मर्यादा ज्या विभागात त्यांचे वास्तव्य आहे त्या विभागातील विविध क्षेत्रांपर्यंत तर पोहचल्या पाहिजेतच, परंतु त्याहीपेक्षा त्यांच्या कक्षा अधिक विस्तृत झाल्या पाहिजेत. हा अनुभव एकाच विशिष्ट विभागापुरता मर्यादित न राहता देशव्यापक झाला पाहिजे त्याशिवाय एक भारतीयत्व प्राप्त होणार नाही अशी एकात्मिक भावना ठेवून साहित्यिकांनी राष्ट्रीय ऐक्य जोपासण्याचा प्रयत्न साहित्यातून केला पाहिजे अशी आशा यशवंतराव व्यक्त करतात.

### ५) संस्कृती संवर्धन :-

यशवंतरावांनी वेगवेगळ्या प्रसंगी केलेल्या भाषणांमधून भारतीय संस्कृती जतन करण्यासाठी व तिच्या संवर्धनासाठी वाङ्मयीन विचार मांडले आहेत. साहित्य आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी यशवंतरावांनी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना केली होती. सामान्य मानवाच्या आशा-आकांक्षा साहित्यातून उमटल्या जाव्यात, खेडोपाडी ग्रंथ पोहचावेत, साहित्य-संस्कृतीची वृध्दी व्हावी यासाठी विद्धानाची यंत्रणा निर्माण करावी असे यशवंतरावांना वाटते. संस्कृतीच्या संवर्धनासाठी संशोधनाची गरज असल्याचे ते सांगतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकजीवन समृध्द करण्याची जबाबदारी साहित्यिकांची असल्याचे ते सांगतात. संस्कृतीचे पुनरूज्जीवन करणे, संस्कृतीचे संशोधन करून मानवी जीवनाचे प्रतिबिंब असलेले साहित्य, विचार, इतिहास रूपात साठविलेली ज्ञानगंगा, लोकांच्या जीवनापर्यंत पोहचविणे हे साहित्य

संस्कृती मंडळाचे कार्य असल्याचे ते सांगतात. ते म्हणतात - "वेगवेगळ्या संस्कृतीचे आणि शास्त्रांचे संशोधन करून लोकांना उपयुक्त होईल असे मार्गदर्शन केले पाहिजे. एवढेच नव्हे तर हे मंडळ सृजनशील विचार करणारे, महाराष्ट्राचे जीवन व्यापक, विस्तृत व क्रियाशील करणारे माध्यम बनावे अशी माझी कल्पना आहे."१७ अशी मंडळाची जबाबदारी यशवंतराव सांगतात.

महाराष्ट्राच्या लोकजीवनात आणि लोकसंस्कृतीत वाढलेला माणूस नेहमीच आपल्या लोकसंस्कृतीच्या उन्नयनाचा विचार करीत असतो. व्यक्ती, समाज, देश हा खऱ्या अर्थाने जिवंत राहतो, चिरंतन राहतो तो त्यांच्याजवळ असलेल्या सांस्कृतिक मूल्यांवर होय. यशवंतरावांनी हे मूल्यधन नवे साधन असल्याचे सांगितले आहे. आपल्या देशाला जी थोर सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे, महर्षी कर्वेंच्या पासून रविंद्रनाथ टागोरांसारख्या ऋषितुल्य पुरूषांपर्यंत फार मोठी अशी आमची सांस्कृतिक परंपरा आहे. महाराष्ट्राची खरी प्रेरणा ही परंपरा आहे. संस्कृतीचा जन्मच समाजासाठी होत असतो त्या संस्कृतीचे संवर्धन करण्याची जबाबदारी साहित्यिकांवर असल्याचे यशवंतराव सांगतात. समाजातील सांस्कृतिक जीवनमान उंचावण्याचा त्यांनी प्रयत्न केला पाहिजे हे सांगताना यशवंतराव म्हणतात - "सामाजिक मनाला जागे करण्याचा प्रयत्न साहित्याने केला पाहिजे. त्यामागील ज्या सांस्कृतिक प्रेरणा आहेत त्यांना जागे करण्याचे काम साहित्याने केले पाहिजे."[१८] अशी साहित्यिकांकडून ते अपेक्षा करतात.

एकूणच जगामध्ये सर्वात श्रेष्ठ संस्कृती म्हणून भारतीय संस्कृती ओळखली जाते. या संस्कृतीचे मूल्य अनन्यसाधारण असल्याचे आणि संपूर्ण जगाला सांस्कृतिकदृष्टया आकर्षित करून घेण्याबाबतचा विचार यशवंतराव मांडतात.

## (६) साहित्य आणि समाज :-

साहित्य समाजातच जन्मते, समाजातच वाढते आणि समाजालाच गंध वाहण्यात धन्यता मानते. साहित्यावर अवती-भोवतीच्या परिस्थितीचा, वातावरणाचा, घटनांचा परिणाम होत असतो. लेखकाच्या अनुभवातून, सामाजिक बांधिलकीतून ते साकारत असते. साहित्याचा समाज जीवनासाठी आरशासारखा उपयोग होत असतो अशा विचाराचे यशवंतराव साहित्य हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे असे मानतात. साहित्याचा समाज जीवनाशी अतिशय जवळचा संबंध असल्याचे ते सांगतात. साहित्य हे थर्मामीटरमधील पाऱ्यासारखे संवेदनशील असते. समाज जीवन, त्यांचे प्रश्न,

आव्हाने, सामाजिक क्रांती याविषयीचे लेखन साहित्यातून झाले पाहिजे असे यशवंतरावांना वाटते साहित्यातून समाजामध्ये नव्या विचारांची अन् सर्वांगिण ज्ञानाची बीजे टाकत राहणे हे महत्वाचे कार्य साहित्यिकाचे असल्याचे यशवंतराव सांगतात. या संदर्भात ते म्हणतात- "सामाजिकता, ही सामाजिक जाणीव, आपल्या सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा असते. म्हणून आता नव्या सामाजिक प्रबोधनाचे चिंतन करणारे साहित्य हेच उद्याच्या मराठी साहित्याचे स्वरूप असणार, अशी माझी धारणा आहे"[९९] असे समाज चिंतन साहित्यामध्ये असले पाहिजे असे विचार यशवंतराव व्यक्त करतात.

यशवंतरावांच्या मते समाजाच्या प्रबोधनासाठी, त्याचा भावपिंड घडविण्यासाठी ललित साहित्य उपयुक्त ठरते. समाजक्रांतीविषयी अनुकूल मनोभूमी तयार करावयाची असेल तर प्रस्थापित समाजातील विसंगती, अंतर्विरोध आणि त्यांमुळे निर्माण होणारी कोंडी यांच्या कलात्मक आविष्कारातून समाजावर संस्कार करता येतात. "सामाजिक प्रश्न आहेत, ते सर्व पुनर्रचनेचे प्रश्न आहेत. त्याचे संशोधन करून प्रकट चर्चा व चिंतन करणारे समाजचिंतक आणि त्यातील तत्वांचा व समाजक्रांतीचा ध्यास घेतलेले समर्थ ललित लेखक या दोघांचे ही कार्य एकमेकांस पूरक आहे. या प्रयत्नांची गरज आहे"[१००] ही अपेक्षा मराठी साहित्यिकांकडून यशवंतराव व्यक्त करतात. नवसमाज निर्मितीचे स्वप्न यशवंतराव पहात होते. समाज परिवर्तनाच्या बाबतीत ते जागरूक होते. समाजमन जागृत करण्याविषयी यशवंतराव अतिशय गांभिर्याने बोलतात. हे समाजमन साहित्यातून जागृत झाले पाहिजे अशी अपेक्षा ते व्यक्त करतात.

कोणताही कर्तृत्ववान मनुष्य समाजाला सोडून कर्तृत्व करू शकत नाही. या समाजजीवनाचा वेध साहित्यातून घेतला जावा असे यशवंतरावांना वाटते. एकूणच समाजाची बांधणी, प्रबोधन, क्रांती ही साहित्यातून व्हावा असा विचार यशवंतराव व्यक्त करतात.

### (७) भाषा समृध्दी :-

साहित्यातून मराठी भाषा समृध्द व्हावी अशी भूमिका यशवंतरावांची होती. या मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळून ती राजसिंहासनावर आरूढ झाली. "कारण राज्यभाषेचा दर्जा जेव्हा भाषेला प्राप्त होतो तेव्हा लोकजीवन समृध्द करण्याचे एक महत्वाचे साधन म्हणून आपण त्या भाषेकडे पाहत असतो"[१०१] त्यामुळे ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांतील विचारांची संपदा तिने मराठी जीवनात आणली पाहिजे असे यशवंतरावांना

वाटते. ज्ञान विज्ञान यामधील संशोधन मराठीत आणले तर ती ज्ञानाची भाषा होऊ शकते असे ते म्हणतात. त्यासाठी साहित्यिकांनी हे काम करणे गरजेचे असल्याचे यशवंतराव सांगतात.

मराठी भाषेचा अभिमान साहित्यिकांनी साहित्यातून जपला पाहिजे. मराठी भाषेचे महत्व साहित्यिकांच्या मनापर्यंत पोहोचले पाहिजे. त्याचा परिणाम चांगला होईल असे यशवंतराव सांगतात. मराठी साहित्यिकाने जाणीवपूर्वक मराठी भाषेच्या विकासासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे असे त्यांना वाटते. मराठी भाषा ही प्रथम दर्जाची भाषा बनावी यासाठी साहित्यिकांनी सतत लक्ष दिले पाहिजे. आपल्याच मातृभाषेतून दिलेले ज्ञान समजण्यास सोपे जात असल्यामुळे मराठी भाषेचे स्वरूप व्यापक केले पाहिजे असे यशवंतराव सांगतात.

भारतीय भाषांमध्ये एकभाषित्व निर्माण करण्याचा प्रयत्न साहित्यातून व्हावा असे त्यांना वाटते. भारतातील अनेक भाषिकांना एकत्र ठेवून भारताचे ऐक्य भावनात्मक बनवावयाचे आहे ते बनविण्यासाठी एकभाषिक प्रेमाने राहिले पाहिजेत, जीवनाचा आदर्श एकमेंकांनी घेतला पाहिजे आणि त्यातून मराठी भाषेचे संवर्धन करण्याचा प्रयत्न साहित्यातून व्हावा असे यशवंतरावांना वाटते. यावरून यशवंतरावाचा मराठी भाषेविषयीचा अभिमान दिसून येतो. ते म्हणतात- "मराठी भाषेमध्ये अमृताशी समान अक्षर लिहिणाऱ्या महान पंडितांना आम्ही शिरोधार्य मानतो असे आम्ही कितीही म्हटले, तरी संशोधनासाठी इंग्रजी भाषेचा पाठपुरावा करणे आम्हाला आवश्यक होते. तेव्हा इतर भाषांमध्ये जे ज्ञान भांडार असेल जे विचार असतील ते मराठी भाषेत खेचून आणण्याचा आम्हांला प्रयत्न करावा लागणार आहे"[१०२] तरच ते समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचेल असे यशवंतरावांना वाटते. मराठी भाषेच्या समृध्दीसाठी आणि संवर्धनासाठी नव-नव्या साहित्य कृतींची निर्मीती साहित्यिकांनी केली पाहिजे आणि मराठी मनातून मराठी भाषेविषयी अभिमान जागृत केला पाहिजे असे त्यांना वाटते.

अशा प्रकारे यशवंतरावांनी श्रेष्ठ साहित्यविषयक विचार मांडलेले दिसून येतात 'साहीत्यिक यशवंतरावांची साहित्यविषयक व्यापक दृष्टी दिसून येते. साहित्य विषयीची जीवनवादी भूमिका यशवंतराव स्विकारतात. व्यक्ती, समाज, देश यांचा उत्कर्ष साहित्यातून करण्यासाठी साहित्यिकांनी सतत जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत अशी अपेक्षा यशवंतरावांना आहे. साहित्य हे समाजमनाचा आरसा ते मानतात.

एकूणच यशवंतरावांनी साहित्यविषयी अतिशय विचारपूर्वक चिंतन केलेले दिसून येते. साहित्य कसे असावे? साहित्यिक व त्याचे अनुभव विश्व कसे असावे? साहित्यिकांची कर्तव्ये कोणती? या बाबतचे विचार मानवतावादी दृष्टीकोनातून मांडलेले दिसून येतात.

यशवंतरावांच्या साहित्यविषयक विचारासंदर्भात डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात-" साहित्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टी केवळ कलावादी नव्हती. जीवनाच्या समृध्दीसाठी आणि राष्ट्राच्या अभ्युदयासाठी साहित्याचा शक्तीचा उपयोग झाला पाहिजे ही त्यांची स्पष्ट भूमिका होती. पण त्याचबरोबर साहित्याच्या कलात्मक सौंदर्याचा ते रसिकतेने आस्वाद घेत असत"[१०३]

यशवंतरावांचे गाढे अभ्यासक विठ्ठलराव पाटील म्हणतात-" कलावंताची तरल संवेदनक्षमता, सर्जनशील नवनवोन्मेषशाली प्रतिभा, शब्दशक्तीच्या समर्थ किमयेच्या क्षमतेचे परिपूर्ण भान वाङ्मयात प्रवीण आणि उदंड व्यासंग, साहित्याबद्दलची चोखंदळ जाण आणि साहित्य व समाज यांच्यातील एकमेकांच्या नात्याने यथार्थ भान, चौरस अनुभवसंपन्नता आणि आस्वादक समीक्षाबुध्दी इत्यादी दुर्मिळ गुणांचा समूह यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वात होता"[१०४]

अशा रीतीने यशवंतरावांचे साहित्यविषयीचे चिंतन आजच्या साहित्यिकांना अंतर्मुख करणारे ठरेल असे मला वाटते.

समारोप :-

यशवंतरावांचे असे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि साहित्यिक विषयावरील चिंतन हे आजच्या पिढीस निश्चितच मार्गदर्शक ठरेल असे मला वाटते. या सामाजिक विचारांतून त्यांचे आदर्शसमाज व्यवस्थेबाबतचे चिंतन हे नवनिर्मित समाज व्यवस्था उभी करू पाहत आहे. समाजजीवनाचा सर्वांगिण विकास करणे हे उद्दिष्ट यशवंतरावांचे असल्याचे दिसून येते.

यशवंतरावांचे अर्थविषयक विचार हे देशाचा आर्थिक पाया भक्कम करणारे आहे.नियोजनाचे महत्व हे आर्थिक विकासामध्ये अधिक असल्याचे यशवंतराव सांगतात. 'माणूस' हा आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू त्यांनी मानला आहे.आर्थिक कणा मजबूत असेल तर देश आर्थिकदृष्टया समर्थ होत असतो एकूणच देशाचे सामर्थ्य हे 'आर्थिक' प्रगतीवर अवलंबून असते हे सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न मानवाने केला पाहिजे असे यशवंतरावांचे मत असल्याचे दिसून येते.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन असते.शिक्षणातून मानवी जीवनाचा विकास होत असतो हे यशवंतरावांनी जाणले होते.शिक्षणाचे महत्व समाजास पटवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसून येतो. शिक्षण आणि समाज यांचा परस्पर संबंध ते दाखवून देतात. समाजातील तळागाळातील स्थिती सुधारायची असेल तर त्यासाठी शिक्षण हेच महत्वाचे साधन असल्याचे यशवंतरावांनी सांगितले आहे.

साहित्यिक यशवंतरावांचे साहित्यिक कार्य हे साहित्यक्षेत्रातील मोलाचे योगदान आहे. साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध ते साहित्यातून व्यक्त करतात. साहित्याकडून समाज उभा रहावा हे कार्य साहित्यिकांनी करावे अशी त्यांची अपेक्षा असल्याचे दिसून येते.

एकूणच यशवंतरावांनी मांडलेले विविधांगी विषयावरील विचार आजच्या पिढीला मार्गदर्शक ठरणारे आहेत असे मला वाटते.

संदर्भ टीपा :-


१. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १७३.

२. 'यशोदीप' - डॉ.शिवाजीराव चव्हाण, सुशिपाज प्रकाशन, वाई, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट २000, पृ.क्र. १७८.

३. 'यशवंतराव चव्हाण : शब्दाचे सामर्थ्य' - राम प्रधान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हें.२000, पृ.क्र. ३४४.

४. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १६२-६३.

५. उ.नि. पृ.क्र. १६४.

६. उ.नि. पृ.क्र. १६७

७. 'युगांतर' - यशवंतरावचव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. २०७.

८. 'दीपमाळ' - श्यामसुंदर मुळे, ऋचा प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, सप्टेंबर, १९९६, पृ.क्र. ११८.

९. 'भूमिका' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टिज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, डिसेंबर १९७९, पृ.क्र. २४३.

१०. उ.नि. पृ.क्र. २४६

११. 'यशवंतराव चव्हाण : विविधांगी व्यक्तीमत्व' - विठ्ठलराव पाटील, दीपक वि. पाटील, कऱ्हाड, आवृत्ती दुसरी, ऑक्टोबर २००२, पृ.क्र. १७०-७१.

१२. 'दीपस्तंभ' - प्राचार्य शिवाजीराव भोसले, अक्षरब्रह्म प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, फेब्रुवारी १९९८, पृ.क्र. २१८.

१३. 'दीपमाळ' - श्यामसुंदर मुळे, ऋचा प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, सप्टेंबर, १९९६, पृ.क्र. ६५.

१४. 'भूमिका' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, डिसेंबर १९७९, पृ.क्र. २४४.

१५. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १७२.

१६. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती,

१९९९, पृ.क्र. ११३.

१७. 'ऋणानुबंध' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, द्वितीय आवृत्ती, एप्रिल १९८६, पृ.क्र. १६६.

१८. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १६४-६९.

१९. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. १६0.

२०. उ.नि. पृ.क्र. ३०३-०४.

२१. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. ४९.

२२. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. २११.

२३. उ.नि. पृ.क्र. ६५.

२४. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १९३.

२५. 'यशोदीप' - डॉ.शिवाजीराव चव्हाण, सुशिपाज प्रकाशन, वाई, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट २000, पृ.क्र. १५.

२६. 'यशवंत विचार अमृत' - सी.डी. पवार, प्रमोद प्रकाशन, नेर्ले, ता.वाळवा, जि. सांगली,प्रथम आवृत्ती, मे २00२, पृ.क्र. ५५.

२७. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १३४.

२८. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. १४९.

२९. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १३८.

३०. 'यशवंत विचार अमृत' - सी.डी. पवार, प्रमोद प्रकाशन, नेर्ले, प्रथम आवृत्ती, मे २00२, पृ.क्र. ७३.

३१. 'कृष्णाकाठ' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, फेब्रुवारी १९८४, पृ.क्र. ७0.

३२. 'शिवनेरीच्या नौबती' - यशवंतराव चव्हाण, तळवळकर गोविंद व लिमये अ.ह. प्रकाशक - पुणे, व्हीनस बुक स्टॉल १९६१, पृ.क्र. ४१.

३३. 'विचारधारा' - न.वा. लिमये, मुंबई, सागर प्रकाशन, प्रथमावृत्ती, जानेवारी १९६०, पृ.क्र. १७.

३४. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. २९१.

३५. उ.नि. पृ.क्र. २८-२९.

३६. उ.नि. पृ.क्र. २८.

३७. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. ३८.

३८. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. १०६.

३९. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. ७१.

४०. उ.नि. पृ.क्र. ४.

४१. 'यशवंतराव चव्हाण : विविधांगी व्यक्तीमत्व' - विठ्ठलराव पाटील, दीपक वि. पाटील, कऱ्हाड, आवृत्ती दुसरी, ऑक्टोबर २००२, पृ.क्र. ७७.

४२. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. ८५-८६.

४३. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. १२४.

४४. उ.नि.पृ.क्र. ११३.

४५. 'विचारधारा' - न.वा. लिमये, मुंबई, सागर प्रकाशन, प्रथमावृत्ती, जानेवारी १९६०, पृ.क्र. २१.

४६. 'यशोदीप' - डॉ.शिवाजीराव चव्हाण, सुशिपाज प्रकाशन, वाई, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट २०००, पृ.क्र. १३९.

४७. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १९९.

४८. उ.नि. पृ.क्र. ६४.

४९. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. ६४.

५०. उ.नि. पृ.क्र.६५.

५१. 'यशवंतराव चव्हाण : शब्दाचे सामर्थ्य, राम प्रधान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हें.२०००, पृ.क्र. ३६५.

५२. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. २०१.

५३. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. ५९-६०.

५४. 'भूमिका' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, डिसेंबर १९७९, पृ.क्र. ९१.

५५. 'यशोधन' - यशवंतराव चव्हाण यांचे निवडक विचार, संकलन : विनायक पाटील, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, मार्च १९८६, पृ.क्र.३०.

५६. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. ९९.

५७. 'शिवनेरीच्या नौबती' - यशवंतराव चव्हाण, तळवळकर गोविंद व लिमये अ.ह. प्रकाशक - पुणे, व्हीनस बुक स्टॉल १९६१, पृ.क्र. २५.

५८. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. ११८.

५९. 'महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण' - विठ्ठलराव पाटील, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, नोव्हें.२००२, पृ.क्र. ५२

६०. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १४०.

६१. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. १६६.

६२. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतसव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १४३.

६३. उ.नि. पृ.क्र. १४७

६४. उ.नि. पृ.क्र. १५६

६५. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १२५.

६६. उनि. पृ.क्र. १४६.

६७. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. १८४.

६८. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १४६.

६९. उ.नि. पृ. क्र. १३६.

७०. उ.नि. पृ.क्र. १४२.

७१. 'भूमिका' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, डिसेंबर १९७९, पृ.क्र. १९.

७२. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. १९.

७३. उ.नि. पृ.क्र. २९१.

७४. उ.नि. पृ.क्र. २९९.

७५. 'युगांतर' - यशवंतरावचव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. १७२-१७३.

७६. उ.नि. पृ.क्र. १७४.

७७. 'मी पाहिलेले यशवंतराव' - संपादिका : बाबर सरोजिनी, प्रकाशक, मुंबई, महाराष्ट्र राज्य महिला मराठी संस्कृती मंडळ - १९८८, पृ.क्र. १७४.

७८. 'यशोधन' - यशवंतराव चव्हाण यांचे निवडक विचार', संकलन : विनायक पाटील, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, मार्च १९८६, पृ.क्र. १२९.

७९. 'जनामनातील यशवंतराव' - डॉ. नागनाथ हेगे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २००२, पृ.क्र. १४.

८०. 'यशवंतराव चव्हाण : शब्दाचे सामर्थ्य, राम प्रधान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हें.२०००, पृ.क्र. ३२७.

८१. 'ऋणानुबंध' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, द्वितीय आवृत्ती, एप्रिल १९८६, पृ.क्र. १९५-९६.

८२. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती,

१९९९, पृ.क्र. २२३.

८३. 'यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य' - भा.ल. भोळे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९५, पृ.क्र. १४७.

८४. 'ऋणानुबंध' - यशवंतराव चव्हाण, प्रस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, द्वितीय आवृत्ती, एप्रिल १९८६, पृ.क्र. २००.

८५. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. २२३.

८६. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. २९९.

८७. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. २२६.

८८. उ.नि. पृ.क्र. २२५.

८९. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. ३००.

९०. उ.नि. पृ.क्र. ३०१.

९१. 'ऋणानुबंध' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती, एप्रिल, १९८६, पृ.क्र. १९६.

९२. 'यशवंतराव चव्हाण : शब्दाचे सामर्थ्य, राम प्रधान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हें.२०००, पृ.क्र. ३४४.

९३. 'युगांतर' - यशवंतराव चव्हाण, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९९, पृ.क्र. २२६.

९४. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. २९८.

९५. उ.नि. पृ.क्र. २९२.

९६. उ.नि. पृ.क्र. २९३.

९७. उ.नि. पृ. क्र. ३०१.

९८. उ.नि. पृ. क्र. २९३.

९९. 'ऋणानुबंध' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती, एप्रिल, १९८६, पृ.क्र. १९९.

१००. 'ऋणानुबंध' - यशवंतराव चव्हाण, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती, एप्रिल, १९८६, पृ.क्र. २०१.

१०१. 'सह्याद्रीचे वारे' - यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तिसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९२, पृ.क्र. २९१.

१०२. उ.नि. पृ.क्र. ३०१.

१०३. 'जनामनातील यशवंतराव' - डॉ. नागनाथ हेगे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २००२, पृ.क्र. ७२.

१०४. 'यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व' - विठ्ठलराव पाटील, दीपक वि. पाटील, आवृत्ती दुसरी, कऱ्हाड, ऑक्टोबर २००२, पृ.क्र. ७१.

***